रविवार
आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
रविवार, २६ फेब्रुवारी २०२३

# माय मराठी, साद मराठी, भाषांचा भावार्थ मराठी

**मराठी राजभाषा दिन विशेष**



चित्र : बाबुराव पाटील, भोकर

**महाराष्ट्राचा मराठी राजभाषा दिन आणि कविवर्य कुसुमाग्रज यांचा जन्मदिन दरवर्षी 27 फेब्रुवारी रोजी उत्साहात साजरा केला जातो. यानिमित्ताने मायमराठीचा गौरव करणारी साहित्य मैफल खास आधुनिक केसरीच्या वाचकांसाठी प्रसिद्ध करीत आहोत..**

## माय मराठीचे जतन आणि संवर्धन झालेच पाहिजे !



बाळासाहेब जोगदंड
मो. 9423051246

आपल्या माय मराठीचे जतन, संवर्धन आणि तिचे संरक्षण करणे आताच्या घडीला खूप महत्त्वाचे झाले आहे. इतर भाषेचे मराठीवर झालेले आक्रमण, मराठी भाषेच्या भरभराटीत निर्माण केलेले अडथळे, मराठी भाषेवर स्वकीयांकडूनचे लाभलेले लकवा धोरण, मराठी भाषेचे सौंदर्य कुरूप करणाऱ्या टोळ्या बघितल्या की मन विषण्ण होते. मराठीचे संवर्धनासाठी विभागावर विविध संमेलने पार पडली म्हणजे सर्व काही ठीक चालले असे म्हणता येत नाही. रोजच्या व्यवहारात मराठी माणूसच मराठीची गळचेपी करताना दिसला की मग तळपायाची आग मस्तकात गेल्याशिवाय राहत नाही. महाराज शाळा, महाविद्यालये, शासकीय कार्यालये, सार्वजनिक ठिकाणी आणि रोजच्या व्यवहारात 2500 वर्ष जुना इतिहास असलेल्या मराठीचे हाल सध्या बघितले की, जागतिकीकरणात मराठी भाषेचे आपण तारणहार होणार की मारणहार? हे आपणास ठरवायचे आहे. सर्व व्यवहार मराठीतच करायला नको का? उगाच मराठी संवर्धन करा म्हणून हा आक्रोश करण्यात काहीच अर्थ नाही. केवळ मराठी राजभाषा दिनापुरतेच एक दिवस मराठीचे गोडवे गाऊन काय उपयोग ? परंतु हा दिवस साजरा झाल्यावर उरलेल्या प्रत्येक दिवसात जिथे मिळेल तिथे मराठी भाषेचा वापर तिच्या सौंदर्याला धक्का न लागता झालाच पाहिजे. म्हणून... **माय मराठी! तुझिया पायी तन-मन-धन मी वाहियले तुझिया नामी, तुझिया धामी अखंड रंगूनि राहियले..** कवयित्री संजीवनी मराठे यांची ही माय मराठीची आपुलकी विचार करण्यास भाग पाडते. मायमराठीचा जागर सदैव करताना तिचे गतवैभव, तिच्या ध्यास, आणि तिचा सप्तरंगी सूर मनामनात गुंजविण्यासाठी आपणास प्रयत्नरत राहावे लागेल. भारत सरकारच्या राष्ट्रीय धोरण 2020 मध्ये स्थानिक भाषामध्ये शिक्षण देण्याचे ठरविण्यात आले. या पार्श्वभूमीवर आपल्या देशात या संदर्भात खूप काम करण्याची गरज आज निर्माण झाली आहे. आपल्या देशात अनेक बोली आणि भाषा बोलल्या जातात. परंतु आपल्या महाराष्ट्रापुरता विचार केला तर नंदुरबार, गडचिरोली यासारख्या आदिवासीबहुल भागात अनेक स्थानिक भाषा बोलतात. त्यामुळे इथल्या जनतेला मराठी भाषा अवगत करणे कठीण असल्याचे एका अभ्यासात आढळून आले आहे. या ठिकाणी देखील सरकार आणि सामाजिक पातळीवर महत्वपूर्ण कार्य करण्याची गरज आज निर्माण झाली आहे. परंतु इंग्रजी भाषेच्या वाढत्या आक्रमणामुळे अनेक बोली आणि इतर भाषा देखील अस्तंगत होताना दिसत आहेत. अशावेळी आपल्या माय मराठीचे हाल बघवत नाहीत. सामुहिक अन्याय जेव्हा मराठीवर केला जातो तेव्हा आपण सारे जागे किंवा होणार ? हा प्रश्न डोळ्यात खोलवर बोटे घालून जातो. म्हणूनच माय मराठी आमची मातृभाषा तिचा आदर ठेवणे आणि तिची मैत्री कदापी तुटणार नाही याची सतत काळजी घेणे प्रत्येक मराठी माणसाचे सध्यातरी महत्त्वाचे कर्तव्य आहे.

## मराठी भाषेचे भविष्य आज आणि उद्या



विजय सुर्यवंशी
मो. 9168314090

**माझ्या मराठीची बोलू कौतुके परी अमृतातेही पैजा जिंके ऐसी अक्षरे रसिका मेळविन - संत ज्ञानेश्वर**

माय मराठीचा अभिमान मनाची बाळगून संत ज्ञानेश्वर महाराज यांनी मराठी भाषेचा गोडवा गायिलेला आहे. अमृताहुनी गोड असलेली आपली मराठी मायबोली ही आपल्या महाराष्ट्राची प्रमाण भाषा आहे. महाराष्ट्र हा मराठी भाषिकांचा प्रदेश असून संत ज्ञानेश्वरांपासून अलीकडच्या नवोदित साहित्यिकांपर्यंत सर्वांनी पावलोपावली मराठी भाषेच्या प्रचार प्रसारासाठी आपले अमूल्य योगदान दिले आहे. मराठी ही आपली मातृभाषा मायबोली बरोबरच आई देखील आहे. आईची माया जशी वत्सल,प्रेमाळू, दयाळू, मायाळू, असते. तशीच ती माय मराठीची देखील आहे. महाराष्ट्रातच नव्हे तर महाराष्ट्राच्याबाहेर देखील मराठी भाषा बोलणारे, मराठी भाषेवर प्रेम करणारे अनेक भाषिक देखील राहतात. मराठी भाषेची प्रचिती खरच खूप महान आहे. कारण जन्माला येणारे बाळ देखील आधी आपल्या मराठी मातृभाषेला सलाम करतो. बाळ जेव्हा लहानपणी जन्माला येत तेव्हा प्रथम शब्द त्याच्या तोंडातून ' मॉ ' हा निघतो. ' मॉ ' म्हणजेच आई होय. कुटूंबातील सदस्यांचे वेगवेगळ्या प्रकारे कानावर पडणारे शब्द तो बाळ ऐकत असतो आणि तेच शब्द ते बाळ आपल्या तोंडून उच्चारत असतो. अशाप्रकारे आपली मराठी मायबोली अधिकाधिक विस्तारीत होत जाते. महाराष्ट्रातील अकरा कोटी लोकांची मायबोली असलेली मराठी भाषा ही भारतातील चौथ्या क्रमांकाची तर जगातील दहाव्या क्रमांकाची सर्वाधिक बोलली जाणारी भाषा आहे.

**लाभले भाग्य आम्हांस बोलतो मराठी**
**जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी**
**आमुच्या मनामनात दंगते मराठी**
**आमुच्या रगारगात रंगते मराठी - कविवर्य सुरेश भट**

काळाप्रमाणे मराठी भाषेमध्ये देखील बदल होत जातात हे खर आहे. परंतू आज ही सुक्ष्म बदलांना सोबत घेऊन माय मराठीचा प्रवास अखंडपणे सुरू आहे. कवी सुरेश भट म्हणतात की, या मराठी मायबोलीचा प्रदेश असलेल्या महाराष्ट्रात मी जन्माला आलो हे माझ भाग्य समजतो. जन्माला येऊन या माय बोलीच्या शब्दांनी मी संवाद साधू शकतो यापेक्षा अजून मोठ काय हवय मला. या मराठी मायबोलीच्या छत्रछायेखाली जन्म घेऊन मी खरच धन्य झालो!

माझ्या मराठी मायबोलीला खुप मोठी जुनी परंपरा आहे. अगदी नवव्या दहाव्या शतकापासून मराठी भाषेत कोरलेले शिलालेख आजही उपलब्ध आहेत. "तेराव्या शतकात लिहलेली ' ज्ञानेश्वरी ' हा मराठी भाषेतील प्राचीन ग्रंथ आहे." तेव्हापासून ते आजपर्यंत मराठी भाषा अनेक अंगानी समृद्ध होत गेली आहे. मराठी भाषेबद्दल शेवटी एवढचं म्हणतो

**माय मराठी माझी माऊली, अमृतधारा झरती बोली, मनात फुलती वसंत गाणी**

## राज्यात दोन मराठी साहित्य संमेलने कशासाठी?



डॉ. हर्षवर्धन कांबळे
मो. ९८२२५९३७५८

96 वे मराठी साहित्य संमेलन वर्धेमध्ये पार पडले ,सोबतच विद्रोही साहित्य संमेलन सुद्धा वर्धेतच पार पडले. या दोन्ही साहित्य संमेलनातून सर्वसामान्य जनतेला नेमकं काय मिळालं हा एक प्रश्न आज पडतोय ? सर्वसामान्य जनता साहित्यिकांकडून मार्गदर्शनाची आशा आकांक्षा आणि अपेक्षा करीत असते. मात्र झालेल्या दोन्ही संमेलनातून साहित्यिकांमध्ये असलेली दुही दिसली. यातून मराठी साहित्याची एकी दिसली नाही .मराठी साहित्य संमेलनामध्ये नागरिक -श्रोत्यांच्या विना हा कार्यक्रम करायचा होता काय? हा एक प्रश्न आहे .गर्दी अत्यंत मोजकी होती इतका लाखो रुपयांचा खर्च करून सुद्धा लोकांना त्या प्रवेशद्वारापर्यंत का घेऊन येऊ शकलो नाही ? हे मराठी साहित्य संमेलनाच्या आयोजनाच्या वर एक मोठं प्रश्नचिन्ह आहे? त्यापेक्षा जास्त श्रोते विद्रोही साहित्य संमेलनामध्ये उपस्थित होते, हे सुद्धा सत्य आहे .महाराष्ट्राच्या संत परंपरा असलेल्या भूमीमध्ये, महापुरुषांच्या भूमीमध्ये असे दोन दोन साहित्य संमेलन एकाच शहरात घ्यावी लागतात, याचाच अर्थ असा की मराठी साहित्यिकांमध्ये एकमत नाही आहे .आपले मराठी साहित्य संमेलन ,मराठी साहित्यातील सर्व विचार प्रवाहांना एकत्रित करून घेऊ शकत नाही काय? हा एक प्रश्न आहे .काय या मराठी साहित्य संमेलनाच्या मंचावर सर्व मराठी विचार वेगवेगळ्या पद्धतीने विचार करणाऱ्या लोकांना स्थान देवू शकत नाही काय? का विद्रोही साहित्य संमेलन हे वेगळ्या मैदानावर घ्यावं लागतं ?हा एक मोठा प्रश्न आहे .कमीत कमी पुढचे होणारे जे साहित्य संमेलन आहे ,त्यामध्ये तरी निदान विद्रोही साहित्य संमेलन किंवा आणखी इतर साहित्य संमेलनाचा मंडप वेगळा न लावता, दुसऱ्याही मराठी विचार प्रवाहांच्या लोकांशी बोलून सर्व समावेशक मराठी साहित्य संमेलन व्हावं यासाठी आटोकाठ प्रयत्न करावा. वैचारिक मतभेद असणे, किव्वा वैचारिक स्वरूपाचे मतप्रवाह असणे ,ही तर उलट चांगली आणि जिवंत पनाची लक्षण आहे. मराठी साहित्य हे विविध विचारसरणींनी नटलेले आणि रंगलेली आहे. या सर्व विचार प्रवाहांचा आपण सर्वांनी सन्मान ठेवून मराठी साहित्याच्या मंचावरती स्थान कसं देता येईल ,याचा विचार करावा ,मराठी साहित्य संमेलन हे काही लोकांच्या हातातील खेळण्याचे एक साधन बनवून राहता कामा नये. साहित्य हे मानवी जीवनामध्ये परिवर्तन करण्याचं एक प्रचंड मोठा साधन आहे. या साधनाचा उपयोग महाराष्ट्रातील सर्व मराठी नागरिकांना योग्य पद्धतीने होईल या दृष्टीने पावले उचलायला हवीत. मराठी भाषा या देशातील एक अत्यंत प्राचीन भाषा आहे .मराठी भाषा दिवसेंदिवस अधिक समृद्ध आणि शक्तिशाली व्हावी या दृष्टीने सर्वांनी सर्व मतप्रवाहांनी एकत्रित येऊन विचार करण्याची आणि त्या दृष्टीने कार्य करण्याची सध्या गरज आहे.

## मराठी हेच शिक्षणाचे प्रभावी साधन आहे



अनुराधा कुलकर्णी
मो. 7249205507

भाषा नष्ट झाली की संस्कृती नष्ट होते .जगातील अनेक उदाहरणे याला साक्षी आहेत .म्हणून थोर कवी कुसुमाग्रजांनी ' स्वातंत्र्य देवीची विनवणी ' या गाजलेल्या कवितेत म्हटले आहे भाषा मरता देशही मरतो संस्कृतीचाही दिवा विझे ,गुलाम आणिक होऊन आपल्या प्रगतीचे शीर कापू नका ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉक्टर अनिल काकोडकर यांच्या मते मातृभाषाच मुलांच्या शिक्षणाचे स्वाभाविक माध्यम असून त्यांचा सर्वांगीण विकास होऊ शकतो. त्यामुळे मुलांचे प्राथमिक, माध्यमिक शिक्षण मातृभाषेतूनच झाले पाहिजे. केवळ फॅशन म्हणून पालकांनी मुलाला इंग्रजी माध्यमात घालू नये.राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या मते *परकीय माध्यमामुळे बालकाचा मेंदू थकतो आणि बुद्धीला मांदय येते त्यामुळे ती केवळ घोकंपट्टी व पोपटपंची करतात .परिणामी मूलभूत विचार व संशोधन याकरता ते अपात्र बनतात. आपल्या ज्ञानाचा लाभ ते समाजाला किंवा कुटुंबाला देऊ शकत नाहीत .जर मी हुकूमशाह असतो तर परकीय माध्यमातून होणारे बालकाचे शिक्षण आजच थांबवले असते असे यंग इंडिया मध्ये गांधीजीने म्हटले आहे राष्ट्रपिता महात्मा गांधीजींचे हे स्पष्ट विचार आपण कसे विसरलो ! मायमराठीचे अप्रूप तुम्हा, आम्हाला सर्वांनाच आहे.

अमृताते पैजो जिंकीचे यथार्थ गोरवास्पद रूप आपल्या सर्वांच्या मनात आहे दैनंदिन आयुष्यात आकलनास व व्यवहारातही सहज सोपी अशी मराठी भाषा आहे. आईची माया अनुभवास देणारी आपली मातृभाषा आहे.मातृभाषेतून शिक्षण ही ज्ञानदायी असते कारण ते शिक्षण मनाच्या प्रत्येक कोपऱ्यापर्यंत रुजते हे सर्वज्ञात आहे. फिनलंडचे शिक्षण पद्धती ही सर्वश्रेष्ठ शिक्षण पद्धती मानले जाते .या शिक्षण पद्धतीचा विचार केला तर अगदी शिशुवर्गापासून ते विद्यावाचस्पती पदवी पर्यंत शिक्षण मातृभाषेतून आहे .भाषा हा सगळ्यांचाच जिव्हाळ्याचा विषय. आपली भाषा ही आपली व आपल्या संस्कृतीची ओळख असते. फक्त 'एक संपर्काचे माध्यम' इतकाच भाषेचा उपयोग आणि तिची व्याप्ती नाही. मानवी भाषेला सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, वैयक्तिक असे अनेक पदर आहेत. आणि म्हणूनच ती मानवी जीवनाचे महत्त्वाचे अंग आहे. आजूबाजूच्या जगातून मिळणाऱ्या ज्ञानाला, सौंदर्याला, आनंदाला भरभरून प्रतिसाद देण्याचे एकमेव साधन म्हणजे आपली मातृभाषा. घरच्या अंगणात खेळावं इतकी सहजता आणि इतके आपलेपण मातृभाषेत बोलताना असते. म्हणूनच कदाचित सगळ्यांसाठी मातृभाषा हा इतका भावनिक पातळीवरचा विषय होऊन बसतो. म्हणून आपण आपल्या पाल्यांना मातृभाषेतूनच म्हणजे मराठीतूनच शिक्षण देणे ही गरज आहे.

## माझा अभिमान मराठी.. !



डॉ. सोनिया कस्तुरे
मो. 9326818354


**अभंग,भजन, मराठी**
**ज्ञानोबा, तुकोबा मराठी**
**जनाई, बहिणाबाई मराठी**
**साधुसंतांचे महात्म्य मराठी..!**
**ओव्या, भारुड मराठी**
**परिवर्तनाची नांदी मराठी**
**सावित्रीमाय जोतीबांची**
**पहिली शाळा मराठी..!**
**मला आवडे मराठी**
**माझ्या ध्यानी मनी मराठी**
**माझा आचार,विचार मराठी**
**माझा स्वाभिमान मराठी..!**
**माझी अनुभूती मराठी**
**माझा शिवराय मराठी**
**मावळ्याच्या संगे राजा**
**बोलला माय मराठी..!**
**माझा उत्साह मराठी**
**वेदना, संवेदना मराठी**
**माझ्या हळव्या मनाला**
**मोठा दिलासा मराठी..!**
**माझा आदर्श मराठी**
**माझी प्रेरणा मराठी**
**माझ्या भावनेतला ओलावा**
**माझे जगणे मराठी..!**
**प्रथम गिरवू मराठी**
**मग मिरवू मराठी**
**नित्य बोलते मराठी**
**वंदू थोरवी मराठी !**

## माझी मराठी



धीरज नवलखे
मो. 9511613905

**ध्यास धरुनी पावलांचा,**
**चालते आहे मराठी**
**श्वास बनुनी अंतराचा,**
**वाहते आहे मराठी || धृ ||**
**ज्ञानियाच्या सोबतीने,**
**गुणगुणाया लागली ती**
**अन् तुक्याच्या साधनेने,**
**गीत गाया लागली ती**
**आसमानी तान आता,**
**घालते आहे मराठी || १ ||**
**श्वास बनुनी अंतराचा,**
**वाहते आहे मराठी...**
**तर्जनीमधुनी शिवाच्या,**
**आन म्हणुनी वाहिली ती**
**छत्र धरुनी छत्रपतींचे,**
**स्वाभिमानी राहिली ती**
**घेवुनी हातात भगवा,**
**गर्जते आहे मराठी || २ ||**
**श्वास बनुनी अंतराचा,**
**वाहते आहे मराठी...**
**कैक आले, कैक गेले,**
**हार कोठे मानते ती**
**अमृताला जिंकण्याची,**
**योग्यता रे ठेवते ती**
**ताठ मानेने जगाशी, बोलते आहे मराठी || ३ ||**
**श्वास बनुनी अंतराचा,**
**वाहते आहे मराठी...**



## उगवतीचे रंग


विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932



# माती भिडली आभाळा

आधुनिक केसरी

'गारंबीचा बापू' या चित्रपटात शांता शेळके यांचं एक सुरेख आणि अर्थपूर्ण गाणं आहे. 'अजब सोहळा, माती भिडली आभाळा...' रवींद्र साठे यांनी असं काही भावपूर्ण आवाजात गायिलं आहे की मला हे गीत नेहमी गूढ, गंभीर आणि रहस्यमय वाटत आलं आहे. पण त्यातील अर्थ जाणवावा, त्याचा प्रत्यय यावा असाच काहीसा अनुभव परवाच्या दिवशी आला. मी पुण्याहून गावाकडे परत येत असताना नगर-औरंगाबाद रस्त्यावर नेवासे फाटा लागतो. अनेकदा येताना जाताना या गावावरून गेलो आहे. पण परवा सहज मनात आलं की हेच ते नेवासा ना जिथे ज्ञानेश्वर माऊलींनी ज्ञानेश्वरी लिहिली ? आपण कधी गेलो का तिथे ? मग ठरवलंच की परत जायला कितीही वेळ होवो, आज आपण तिथे जायचंच आणि त्या पवित्र ठिकाणाचं दर्शन घ्यायचं. मुख्य रस्त्यापासून आणि नेवासे फाट्यापासून नेवासे गाव साधारणपणे पाच किमी आत आहे. जाताना मध्ये थोडाफार कच्चा रस्ता लागतो. पण माऊलींचं दर्शन घ्यायचं एकदा मनानं घेतलं की रस्ता कच्चा असो की चांगला, सहज पार होतो. गावात शिरता शिरता एकाला विचारलं, 'माऊली ?' एवढा एकच शब्द पुरेसा होता. त्याने लगेच मंदिराच्या दिशेकडे बोट दाखवलं. माऊली म्हटलं की झालं. कोण माऊली असा प्रश्न पडत नाही एवढी थोरवी त्या एकाच माऊलीची. मंदिराकडे जाताना सुंदर हिरवीगार शेतं मन आकर्षून घेत होती. माऊलींच्या मंदिरासमोरचा परिसर निसर्गरम्य, शांत आणि प्रसन्न भासत होता. मंदिरासमोर चिंचा लगडलेली छान चिंचेची झाडं. झाडाखालीच एक माऊली हार आणि प्रसाद विक्रीसाठी घेऊन बसलेली. तिच्याकडून दोन हार आणि प्रसाद घेतला. कमानीतून मंदिराच्या आवारात प्रवेश केला. मंदिराचे आवार प्रशस्त, शांत, स्वच्छ अन प्रसन्न.



## आनंदी पहाट

# अमृताहुनी गोड नाम तुझे देवा

आधुनिक केसरी

देवत्व प्राप्त झालेल्या व्यक्तीचं व्यक्तिमत्व चारचौघांपेक्षा निराळं असतं. हे देवत्व त्या व्यक्तीच्या विचार, वर्तन, व्यवहारातून सदैव दिसत असतं. अशीच व्यक्ती संत म्हणून देखील ओळखली जाऊ लागते. अशा व्यक्तीच्या कृतीतून, प्रकृतीतून समाजातील विकृती दूर करू शकणाऱ्या संस्कृतीचं दर्शन होत असतं. आपण जो ब्रह्मानंद सेवन करतो त्याचं सर्वांनी सेवन करावं, धन्य होऊन जावं ह्या एकाच प्रेरणेनं प्रभावित होऊन देवत्व प्राप्त झालेली व्यक्ती सर्वांना स्वतःच्या विचार, वर्तन, व्यवहाराच्या माध्यमातून अनेकविध साक्षात्कार घडवत असते. भगवंताच्या नामाची थोरवी गाता गाता आपल्या आयुष्याचा प्रत्येक क्षण विलक्षण कसा होत जात असतो, ह्याची थेट प्रचीती अशी देवत्व प्राप्त झालेली माणसं देत असतात. अमृताहुनी गोड नाम तुझे देवा.... ह्याची पदोपदी साक्षात व्यक्तिगत अनुभूती देणाऱ्या अशा व्यक्तींच्या मनात केवळ नाम असतं, त्यांना नाम दिसतं, शरीरात नाम वसत असतं. प्रापंचिक लोकांसाठी हा खटाटोप करीत असताना अशा व्यक्तींना अकारण निंदा, अपमान, छळ आणि कमीपणा अनेकदा सोसावा लागत असल्याचं दिसत असतं. तरी देखील सर्वांनी भगवंताच्या मार्गी लागावं म्हणजे भगवंताचं नाम घ्यावं म्हणून शेवटचा श्वास असे पर्यंत देवत्व प्राप्त झालेल्या व्यक्तींचे प्रयत्न सुरूच असतात. केवळ लोककल्याण करण्याच्या हेतूनं, आपलं आयुष्य वेचून आणि सर्वस्व देवून असंख्य लोकांना भगवंताच्या नामाचा आणि प्रेमाचा महिमा थेट प्रचीती देऊन पटवून देण्याचं काम ही मंडळी सदोदित करत असतात. देहबुद्धी मूळापासून जाळून टाकल्यामुळे त्यांच्या आचारात, विचारात आणि उच्चारात तसंच विचारांत, वर्तनात आणि व्यवहारांत चुकून देखिल मी पणा अथवा माझे पणा दिसत नसतो.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

# सौम्य भाषा

आधुनिक केसरी

सुंदर असा मुहूर्त पाहून नामकरण विधी केला जातो. छानसं, गोंडस नाव बाळाचे ठेवले जाते. किंवा खूप धुमधडाक्यात बारसं करतात. खूप शोधून शोधून विचार करून बाळाचे नाव ठेवलं तरी पुढे अनेक नावं त्या बाळाला पडतात. हट्टी, जिद्दी ,आगाऊ, बावळट, मूर्ख, गाढव, वेडपट, भोळा अशा कितीतरी उपमान सांगता येतील .मुलांना अगदी सहज ही नावं आपण देतो, नव्हे या शब्दांची ओळख त्यांना करून देतो. मग त्यांच्या जिभेवर ही शब्द नाच करतात. आणि कधीतरी त्यांच्याही तोंडातून नकळत हे शब्द बाहेर पडतात. तेव्हा लहान मुलांसमोर शब्दांचा भाषेचा वापर जपून व्हायला हवा.मूल भाषा शिकत असताना त्याच्या कोशात अशा काही शब्दांचा, भाषेचा साठा व्हायला नको. खूप स्तुती, लाड पण मुलांना नको असतं. कोणासमोर त्यांना अपमान पण आवडत नाही, आणि स्तुती पण. अपमानाने ते दुरावतात आणि स्तुतीने ओशाळल्या सारखे होतात. मुलं जेव्हा लहान असतात तेव्हा घरी कोणी पाहुणे आले तर त्यांच्यासमोर त्यांना गाणी म्हणायला, नाचायला वगैरे लावू नये. कधी त्यांना नाही आवडत .त्यांना त्यांच्या विश्वात रमू द्या. कधी कधी आपण फक्त बघ्याची भूमिका घेत राहावी .आपण आपलं वळण मात्र चांगलं ठेवावं. लहान मूल आपलं निरीक्षण करत असतं .बालपणाचे संस्कार खूपच महत्वाचे असतात .ते चिरकाल टिकतात. त्यावेळी झालेले पाठांतर आजही जसेच्या तसे आपल्याच मनात आहे. मूल होण्याआधी व झाल्यानंतरही खूप काळजी घ्यावी. आमच्या वेळी असं होतं हे कधी त्याला सांगत बसू नका. तशी योग्य वेळी योग्य कृती करा. मृदू, मुलायम, गोड, सौम्य भाषा वापरून आपल्या मुलांना घडवू या...

संस्कारधन



सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515
भाग-63

# निरूपण

आधुनिक केसरी

**आपल्या भौतिक सुखाला मर्यादा येतात कारण त्यात परावलंबित्व असते. वैचारिक सुखाला मात्र तू मर्यादा येवू देवू नकोस.**

**हे बघ, मला तू कालच्यापेक्षा आज अधिक संयमी, प्रयत्नवान, सश्रद्ध आणि आनंददायी हवा आहेस.**




डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

**ऋषि मुनि योगी विज्ञवर, नाचे जाके तान ।
सब विजयी माया रहे, जगत करे गुणगान
।।२५।। (स्वर्वेद पंचम मण्डल दशम अध्याय) ०५/१०/२**

**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**
ऋषी-मुनी योगी तसेच सर्वश्रेष्ठ विद्वान सर्वजण हिच्या तालावर नाचतात तसेच समस्त विश्व जिच्या गुणांचं गान करतात, ती सर्व विजयिनी माया आहे.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.**

# सेवा हाच धर्म

आधुनिक केसरी


एका पत्रकारांनी स्वा:मी विवेकानंदांची कीर्ती ऐकलेली होती. स्वाचमी विवेकानंदांना भेटून त्यांतच्याकडून चार ज्ञानाच्यी गोष्टीह शिकाव्याात अशी त्यांकची तीव्र इच्छाक होती. त्यां पत्रकारांचे दोन मित्र त्यां्ना भेटावयास आले व बोलता-बोलता स्वायमी विवेकानंदांचा उल्लेतख निघाला. तिघांनी विवेकानंदांना भेटायला जाण्याटचे ठरविले. तिघेही मिळून स्वावमीजींकडे गेले. विवेकानंदांनी तिघांचीही आस्थेनि विचारपूस केली. यादरम्यादन स्वाआमीजींना असे कळाले की तिघेही पंजाब प्रांतात राहणारे आहेत. त्याा काळात पंजाबात दुष्कातळ पडलेला होता. त्यां नी त्यासंदर्भात चर्चा केली. दुष्कांळग्रस्तांडसाठी चाललेल्याा मदतकार्याची माहिती घेतली. त्याहनंतर शैक्षणिक, नैतिक आणि सामाजिक बाबींवर चर्चा केली. ब-याच वेळ चर्चा झाल्या.नंतर तिघेही निघाले. निघताना पत्रकार महाशय विवेकानंदांना म्हंणाले,"स्वा मीजी, आम्हीच तुमच्यांकडे धार्मिक उपदेश मिळेल या उद्देशाने आले होतो. पण तुम्हीण मात्र सामान्य अशा बाबींवरच चर्चा केलीत. आम्हाबला यातून ज्ञानवर्धक असे काहीच मिळाले नाही." या स्वारमी विवेकानंदांनी मोठे मार्मिक उत्तर दिले ते असे की," मित्रवर्य, जोपर्यंत या देशात एक जरी मूल उपाशी राहिले तर धर्माची चर्चा करण्या पेक्षा त्यावची भूक कशी भागवता येईल हे पाहणे जास्तउ महत्वारचे आहे. ज्याआचे पोट भरलेले नाही त्याला धर्मोपदेश देण्याभपेक्षा भाकरी देणे हे महत्वाचे आहे. रिकाम्या. पोटी तत्वज्ञानाचा उपदेश उपयोगी नाही.



# दासबोध

आधुनिक केसरी

देहाच्या द्रुष्टीने त्यांची कर्मे सज्जनांच्या कर्मा प्रमाणेच असतात. त्यात कमीजास्त पणा असतो कारण हाताची बोटे एक सारखे नसतात हे आपल्याला माहिती आहे. परंतु मनाच्या आतली अवस्था स्थिर रहाते. मुक्त पुरूषाला त्याच्या देहावरून पहायचे नसते. तर त्याच्या ब्रम्ह रूपतेवर पहायचे असते. वेद पुराणे सांगतात ते विश्वसनीय आहे. शुक व वामदेव या दोघांच्या शिवाय अनेकांचा उध्दार यामुळेच घडला. शुकाने अनेक विषयावर विवेचन केले आहे तो मुक्त होता हे वेदवचन खरे मानले पाहिजे. तो लाकडा सारखा निर्जीव ब्रम्ह रूप नव्हता. श्रीमत भागवतात सांगितले आहे की योगेश्वर शुक जर काष्ठवत निर्जीव, ब्रम्ह रूप असता तर त्याला आत्मानात्मविवेक बोलून सांगता आला नसता. जो ब्रम्ह रूप होतो तो लाकडासारखा कर्मरहित होछन पडतो, हा अगदीच चुकीचा समज ठरेल. शुक ब्रम्हस्वरूप असू न त्याने परीक्षित राजाला एवढे भागवत सांगितले. आत्मस्वरूपाचे वर्णन करण्यासाठी सारासार विचार करावा लागतो. तो विचार शब्दांत मांडता यावा लागतो. त्यासाठी ग्रंथाचे वाचश मनन चिंतन करावे लागते. चूक असेल तर ते सोडून द्यावे लागते. कारण चुकीच्या गोष्टींना वेद,ऊपनिषदामध्ये अजिबात थारा नाही. सतत सत्याश्रयाचा आधार घ्यावा. विषय समजून देण्यासाठी चराचर विश्व शोधून योग्य द्रुष्टांत द्यावे लागतात. मी दासबोधाचे लिखाण करण्यासाठी प्रा.के.वी.बेलसरे सरांचा दासबोध संदर्भ ग्रंथ घेतला आहे त्यासाठी मी मा,बेलसरे सरांची शतशः ऋणी आहे. आत्मस्वरूपाचे वर्णन करण्यासाठी सारासार विचारांची बैठक तयार असलीच पाहिजे. मुक्त पुरूष अध्यात्म विषय सांगताना क्षणभर ब्रम्हाकार होतो. थोडावेळ आपल्या अवतीभोवती च्या जगाला विसरतो. विश्व शोधतो आणि आपले लिखाण अनेक योग्य उचित द्रुष्टांतांनी सहजसुंदर बनवतो. स्वतः शुकाने एवढा मोठ्ठा भागवत ग्रंथ सांगितला त्याच्या जवळ ब्रम्हाचे ज्ञान होते. थोडक्यात काय तर नुसते रात्रंदिन पडून न रहाता चालता बोलता व्यवहार करता,सद्गुरूंच्या विचारसरणींवर जीवनातील कर्मे केली,त्यांच्या ज्ञानकलेवर चालले तर सायुज्यमुक्ति प्राप्त होऊ शकते.






सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

# गुरुसेवा करणे म्हणजे काय ?

आधुनिक केसरी

साधनाची आटाआटी कुठपर्यंत करायची ? जप, तप, नेम, याग, वगैरे आपण कशाकरिता करतो ? तर देवाची प्राप्ति व्हावी म्हणून. तोच देव जर आपल्या घरी आला, तर साधनाची आटाआटी कशाला करायची ? म्हणून, साधनाची आटाआटी करण्याचे कारण नाही; नाहीतर त्याचाच अभिमान होतो, आणि मिळवावयाचे ते बाजूलाच राहून उलट तोटा होतो. जे जे घडत असते ते माझ्या इच्छेने झाले असे समजत जा आणि त्यात आनंद माना. तुम्ही जी जी गोष्ट कराल त्यात मला आठवा. गुरुभक्ति करायची म्हणजे काय ? त्याच्या देहाची सेवा करणे हीच गुरूची सेवा असे तुम्हाला वाटते का ? त्याच्या देहाची सेवा करणे ही गुरूची खरी सेवाच होत नसते. गुरू सांगेल तसे वागणे, हीच त्याची खरी सेवा होय. माझ्याजवळ जे येतात, ते कुणी मुलगा मागतो, कुणी संपत्ती मागतो, कुणी रोग बरा व्हावा म्हणून मागतो; तेव्हां माझी सेवा करायला तुम्ही येता, का मीच तुमची सेवा करावी म्हणून येता ? माझ्याजवळ येऊन, मनुष्यदेहाचे खरे सार्थक होईल असे करा. तुम्ही मागाल त्याप्रमाणे मी थोडेसे देणार नाही असे नाही; पण ते काढा घेण्याकरिता गुळाचा खडा देण्यासारखे आहे.



'मला सर्व कळते' असे माझ्याबद्दल तुम्ही म्हणता, पण ते मनापासून नव्हेच. कारण ज्याला असे खरोखर वाटत असेल त्याच्या हातून पापकर्म होणारच नाही. ज्याची वृत्ती माझ्याशी एकरूप होईल त्यालाच कळेल की, मला सर्व कळते आहे. गुरूला अनन्य शरण जाणे म्हणजे इतके की, त्याचे मन आणि आपले मन एकच झाले पाहिजे. म्हणजे दैववशात जरी आपण गुरूपासून दूर असलो तरी मनाने त्याच्याशी संलग्न असल्यावर त्याच्यापाशीच असू. आपण आपल्या आईशी जसे बोलतो तसे माझ्यापाशी बोलावे, आपले सर्व दुःख मला सांगत जावे. तुम्ही इतके कष्ट घेऊन मला भेटायला येता, पण तुम्हाला रिकामे परत जाताना पाहून मला फार वाईट वाटते. माझ्याजवळ जे आहे ते व्यावहारिक जगात कुठेही तुम्हांला मिळायचे नाही; ते म्हणजे भगवंताच्या नामाचे प्रेम होय. सगळ्या प्रपंचात खरी विश्रांती असेल तर ती नामस्मरणातच आहे. ज्याला मी भेटावा असे वाटते, जो माझा म्हणवितो, त्याला नामाचे प्रेम असलेच पाहिजे.

**आजचे बोधवचन आहे - नामावर प्रेम करणे म्हणजेच माझ्यावर प्रेम करणे. श्रीराम समर्थ**

रविवार, २६ फेब्रुवारी २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -१८२
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक





●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ●SUNDAY 26 FEBRUARY 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-02 ●ISSUE-182 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-16 ●PRICE-5


# कांद्याला एक रुपया भाव ही शेतकऱ्यांची क्रूर थट्टा

## नाना पटोले : सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळे कांदा रस्त्यावर फेकण्याची वेळ

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई : भारतीय जनता पक्ष शेतकरीविरोधी असून केंद्र व राज्यातील भाजपा सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळे शेतकरी उद्ध्वस्थ झाला आहे. कापूस, सोयाबीनला भाव नाही तसेच कांद्याचे भावही घसरले आहे. कांदा काढणीच्या खर्चाएवढाही भाव बाजारात नसल्याने हजारो शेतकरी कांदा शेतातच कुजवत आहेत. कांदा उत्पादक शेतकऱ्याला आधार देण्यासाठी कांद्याची निर्यातबंदी उठवावी, कांद्याला १५०० रुपये हमी द्यावा अथवा क्विंटलला एक हजार रुपये अनुदान द्यावे, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे.**



यासंदर्भात बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, भारतीय जनता पक्षाच्या राजवटीत शेतकऱ्यांची अवस्था दयनीय झाली आहे. भाजपा व मोदी सरकार शेतकऱ्यांच्या हितासाठी नाही तर काही मोजक्या उद्योगपतींसाठीच काम करत असल्याचे उघड झाले आहे. उद्योगपतींचे कोट्यावधी रुपयांचे कर्ज माफ करते पण शेतकऱ्यांना देण्यास भाजपा सरकारकडे पैसे नाहीत. सध्या बाजारात कांद्याचे भाव घसरलेले आहेत. बाजारात कांद्याला ४०० ते ५०० दर मिळत आहे. या दरातून कांद्याचा उत्पादन खर्चही निघत नाही. कांद्याचे घसरलेले भाव पाहून शेतकरी हवालदिल झाला आहे. तर सरकार बघ्याची भूमिका घेत असल्याने शेतकऱ्यांमध्ये संतापाची भावना आहे. भाजपा सरकारच्या काळात कांदा, सोयाबीन, कापूस या मालालाही भाव नाही. आधीच आर्थिक संकटात सापडलेला शेतकरी आणि त्यात बाजारात पडलेले भाव यात तो पुरता पिचला गेला आहे. सोलापूर जिल्ह्यातील एका शेतकऱ्याच्या ५०० किलो कांद्याला एक रुपया किलोप्रमाणे भाव मिळाला व खर्चाची वजावट करुन केवळ २ रुपयांचा धनादेश त्या शेतकऱ्याच्या हातात पडला. ही शेतकऱ्याची क्रूर थट्टा आहे. मागील वर्षी पुणे जुल्ह्यातील जुन्नर तालुक्यातील एका तरुण शेतकऱ्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवशी त्यांना पत्र पाठवून आत्महत्या केली. विदर्भातही शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण वाढले आहे. शेतकऱ्यांची परिस्थिती बिकट आहे परंतु भाजपाला शेतकऱ्यांच्या समस्यांकडे लक्ष द्यायला वेळ नाही. कांदा, कापूस, सोयाबीनसह शेतमालाला योग्य भाव मिळाला पाहिजे अन्यथा शेतकऱ्यांच्या आक्रोशाला भाजपा सरकारला तोंड द्यावे लागेल, असा इशाराही काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी दिला आहे.



# मृत्युंजय भगूरपुत्र

आधुनिक केसरी

भगूर पुत्राने घडविला देशात इतिहास!
मनी होती हिंद जनतेला स्वाभिमानाची आस!!
विरोध दर्शविला ब्रिटीश साम्राज्याला!
स्वातंत्र्य हवे माझ्या हिंदू मातृभूमीला!!
पेटून उठला हिंदुत्वाचा ज्वलंत अंगार!
जुलमी ब्रिटिशांना करीन येथुन हद्दपार!!
अंगीकृत होते छत्रपती शिवरायांचे विचार!
केले ब्रिटिश अधिकाऱ्यांवर प्रखर प्रहार!!
बंदिस्त केले शूरवीराला!
रवानगी केली त्यांची तुरुंगाला!!
शूरवीरा भोवती होता कडक पहारा!
सावरकर आले सागर कापीत चरचरा!!
सावरकरांच्या वळल्या हिंदुस्थानाच्या स्वातंत्र्याकडे नजरा!
आगमनाने जल्लोष झाला चहुबाजूंना!!
खात्री झाली जनतेला त्यांच्या पवित्र धर्मकार्याची! स्वातंत्र्यासाठी ठेवली तयारी त्यांनी बलिदानाची! जाणीव ठेवावी जनतेने त्यांच्या देशनिष्ठेची!!
भगूरचे नाव विश्वात गाजविले!
असे पराक्रमी कार्य सावरकरांनी दाखविले!!
या शूरवीराचे तैलचित्र संसदेत लागले!
भगूरकरांचे स्वप्न साकार झाले!!
असे स्वातंत्र्यवीर सावरकर आपल्या क्रांती कार्याने आजरामर झाले!
भगूरचे नाव. सावरकरांनी विश्वात गाजविले!!



कवी-रवी दगू सगर
शिंगवे, ता.निफाड







# आदर्श महिला नागरी सहकारी बँकेवर रिझर्व्ह बँकेकडून निर्बंध

## ग्राहकांमध्ये एकच खळबळ

आधुनिक केसरी न्यूज





**मुंबई :** छत्रपती संभाजीनगरातील आदर्श महिला नागरी सहकारी बँकेसह आरबीआयने इतर 4 सहकारी बँकांवर विविध निर्बंध लावले आहेत. या निर्बंधांमध्ये पैसे काढण्यावर बंदी देखील समाविष्ट आहे. या बँकांवर निर्बंध ६ महिने कायम राहणार आहेत. यामुळे या बँकेचे ग्राहक बँकेत जमा केलेले पैसे काढू शकणार नाहीत. तसेच या बँका आरबीआयच्या पूर्व परवानगीशिवाय कोणत्याही नवीन ग्राहकाला कर्ज देऊ शकणार नाही. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने म्हटले आहे की, या बंदीचा आढावा घेतला जात आहे. याचा अर्थ या बँकांच्या कामकाजाचा आढावा घेऊनच ही बंदी हटवण्याचा किंवा वाढवण्याचा निर्णय मध्यवर्ती बँक घेणार आहे. रिझवर्ह बँकेने एचसीबीएल को-ऑपरेटिव्ह बँक लखनौ (यूपी), आदर्श महिला नागरी सहकारी बँक मर्यादित छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र), शिमशा को-ऑपरेटिव्ह बँक नियामिथा मद्दूर, (कर्नाटक) उरावकोंडा. को-ऑपरेटिव्ह टाऊन बँक, उरावकोंडा, (आंध्र प्रदेश) आणि शंकरराव मोहिते पाटील सहकारी बँक, अकलूज (महाराष्ट्र) या बँकांवर निर्बंध घातले आहेत. या बँकांचे ग्राहक सध्याच्या तरलतेच्या संकटामुळे त्यांच्या खात्यामधून पैसे काढू शकणार नाहीत. उरावकोंडा को-ऑपरेटिव्ह टाऊन बँक, उरावकोंडा, (आंध्र प्रदेश) आणि शंकरराव मोहिते पाटील सहकारी बँक, अकलूज (महाराष्ट्र) चे ग्राहक आता त्यांच्या बँकेमधील ठेवींमधून फक्त ५ हजार रुपये काढू शकतात. याचा अर्थ असा की ग्राहकाच्या खात्यात कितीही रक्कम जमा केली असली तरी तो त्याच्या खात्यातून फक्त ५ हजार रुपये काढू शकणार आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेने म्हटले आहे की, पाचही सहकारी बँकांच्या पात्र ठेवींना ठेव विमा आणि क्रेडिट गॅरंटी कॉर्पोरेशनकडून ५ लाख रुपयांपर्यंतच्या ठेव विमा दाव्याची रक्कम मिळण्यास पात्र असणार आहे.दरम्यान या निर्बंधांमूळे ग्राहकांमध्ये एकच खळबळ उडाली आहे.

# करंजवण- मनमाड पाईपलाईनमुळे दिंडोरी, निफाड, येवला तालुक्यातील शेती उद्ध्वस्त होणार?

## पालखेड डावा कालव्यावरील पाण्याचे आरक्षण कायम ठेवण्यासाठी निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** मनमाड शहरासाठी वरदान ठरणाऱ्या करंजवण-मनमाड पाईपलाईनमुळे दिंडोरी, निफाड, येवला तालुक्यातील शेती उद्ववस्त होण्याची भीती निर्माण झाली आहे. पालखेड डाव्या कालव्यावरील पाण्याचे आरक्षण कमी न करता कायम ठेवावे अशी मागणी शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी नाशिक यांचेकडे निवेदन देऊन केली आहे. सन १९७२ सालाच्या दुष्काळाची दाहकता लक्षात घेता महाराष्ट्र शासनाने पालखेड धरण ते येवला अशा १२८ किलोमीटर लांबीच्या कालव्यास मान्यता दिली. मनुष्यबळाने कालव्याचे खोदकाम व बांधकाम करण्यात आले. कालव्यातून वाहणारे पाणी सिंचनासाठी व पिण्यासाठी उपयोग होऊ लागला. मनमाड शहरासाठी पिण्याचे पाण्याचे आरक्षण असल्याने पालखेड डावा कालव्यास अनेक वेळा पाणी सोडले जाते. त्यामुळे या तिन्ही तालुक्यात हजारो एकरवर द्राक्षे शेती बहरली. मात्र शासनाने नुकतीच करंजवण मनमाड पाईपलाईन मंजूर करुन प्रत्यक्ष काम चालू केले आहे. त्यामुळे



या कालव्यावरील पाण्याचे आरक्षण कमी होऊन निफाड व येवला तालुक्यातील द्राक्षे शेती उद्ववस्त होण्याची भीती निर्माण झाली आहे. करंजवण-मनमाड पाईपलाईनला शेतकऱ्यांचा विरोध नाही, मात्र मनमाड साठी थेट धरणातून पाणी उचल होणार असल्याने त्याचा परिणाम दिंडोरी तालुक्याचा पुर्व भाग ,निफाड व येवला तालुक्यातील शेती सिंचनावर व्हायला नको. पालखेड डावा कालव्यालगतची संपुर्ण शेती कालव्याच्या पाण्यावर अवलंबून आहे. कालव्याच्या प्रवाही पाण्यामुळे परिसरातील विहिरींना पाणी येते व सिंचनाचा प्रश्न सुटतो. त्यामुळे या कालव्यावरील पाण्याचे आरक्षण कमी झाले तर कालव्याच्या दोन्हीही बाजूची शेती उद्ववस्त झाल्याशिवाय रहाणार नाही. त्यामुळे पालखेड डावा कालव्यावरील दिंडोरी, येवला, निफाडसाठी आरक्षित असलेले सिंचनासाठीचे व पिण्याचे पाणी यापुढील काळात कमी होऊ नये अशी मागणी जिल्हाधिकारी यांना निवेदनाद्वारे राजेंद्र बोरगुडे, नवनाथ बोरगुडे, शिवाजी बोरगुडे, देवीदास बोरगुडे, योगेश बोरगुडे, किशोर बोरगुडे यांनी केली.

# हिंदू - मुस्लिम राजकारण



प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्ने
संपर्क क्र. ७५८८४२४२५४


आधुनिक केसरी

**प्रेमात आणि युद्धात सर्व काही माफ असतं, असं म्हणण्याची सुरुवात जेव्हा कधी झाली असेल, तेव्हा स्वतःच्या चुकांवर पांघरून घालणे हाच उद्देश असला पाहिजे. कारण प्रेम काय, युद्ध काय किंवा अन्य काहीही समग्र जीवनापेक्षा निश्चितच मोठे नाही. अलीकडे राजकारणातही सर्व क्षम्य असते किंवा काही नीतिमत्ता, मूल्यभान जपण्याची आवश्यकता नसते, अशा प्रकारचा सूर आळवला जात आहे. राज्य, देश किंवा जगाचे सध्याचे चित्र पाहता लोक म्हणतात ते खरे की काय? अशी परिस्थिती सर्वत्र दिसत आहे. परंतु संपूर्ण जीवनच जर मूल्याधिष्ठित असेल तर त्याचा एक पैलू असलेले राजकारण त्यास अपवाद राहू शकत नाही.**

वर्ग - वर्ण निराकरणाच्या लढ्याचा विचार करताना मुस्लिम प्रश्नाचा विचार करायचा नाही, अशी सर्वसामान्य प्रथा आहे. वर्ग-वर्ण निराकरणाबाबत फक्त हिंदूंच्या इतिहासाविषयी बोलायचे, मुस्लिम समाजातील परंपरावादाविषयी बोलायचेच नाही, हे पथ्य सर्वांनी पाळायचे ठरवलेले दिसते. हे उद्‌गार आहेत प्रसिद्ध विचारवंत नरहर कुरुंदकर यांचे. स्वातंत्र्योत्तर काळात जनसंघ हिंदू मतांचे राजकारण करतो म्हणून काँग्रेस आणि इतरांनी मुस्लिम मतांचे अनुनय करणे आणि त्यातून मुस्लिमांच्या परंपरावादाविषयी न बोलणे हे ओघाने आलेच. त्याचा परिणाम काय झाला याविषयी कुरुंदकर पुढे म्हणतात, हिंदू समाजातील जातीयवाद आणि परंपरावाद हिंदू समाज विस्कळीत ठेवतो, मुस्लिम जातीयवादाचे रक्षण करतो आणि मुस्लिम समाजातील जातीयवाद हिंदू समाजात असणारा जो थोडाफार सुधारणावाद आहे त्याचेही बळ खच्ची करत असतो. ज्या हिंदू-मुस्लिम राजकारणाची इतिश्री देशाची फाळणी होण्यात झाली त्यावरुन एक भारतीय म्हणून आपण काहीच बोध घेऊ नये हा दैवदुर्विलास होय. मुस्लिम समाजात आज मोठ्या प्रमाणात दारिद्र्य आणि बेरोजगारी असताना जमाते इस्लामीसारख्या गटाचे मौलाना अर्शद मदनी आणि मौलाना महेमूद मदनी अल्लाह, ओम, मनू आणि आदमच्या चर्चेत समाजाला ढकलतात. बरे त्यांच्या या विचाराला मुस्लिम जगतात मान्यता मिळू शकते का? हा साधा प्रश्नही त्यांना पडू नये, हे आश्चर्य आहे. कारण मुस्लिम मन ज्या कुराणावर श्रद्धा ठेवून वर्तन करते आणि त्याबाहेरील काही स्वीकारत नाही, त्या कुराणात अशा प्रकारचे काही उल्लेखही मिळत नाहीत. या जगात हिंदू आणि झूरथ्रूष्टी धर्म वगळल्यास आपली संख्या वाढावी यासाठी सर्व धर्म, पंथ प्रयत्नशील आहेत हे उघड आहे. आधुनिक काळात पूर्वीसारखी परिस्थिती नसल्याने येनकेनप्रकारेण आपल्याकडे आकर्षित करणे धर्माच्या ठेकेदारांना आवश्यक वाटत असते आणि त्यातून असे प्रकार घडतात.



हिंदू धर्मातील जातीप्रथा जगजाहीर आहे. कायद्याने आम्ही ती मोडीत काढली, परंतु मुस्लिमातील जातीयतेबद्दल कोणी अवाक्षर बोलणार नाही. ज्या रीतीने इथे काँग्रेसला मतांचे राजकारण करायचे होते तद्वतच समाजवादी आणि साम्यवादी मंडळींना देखील राजकारणच करायचे असल्यामुळे ते हिंदूंच्या अगदी श्रध्दास्थानाबद्दल बोलतील पण मुस्लिमांमधील जातीप्रथेबद्दल अवाक्षर काढणार नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. अश्रफ, जुलाहा, कुकु कुंजरा, हजाम, दर्जी, कोईरी, मोची अजलफ, अरझल असे कितीतरी प्रकार यात आहेत. मंडल आयोगाने ३७४३ जाती मागासवर्गीय ठरविताना मुस्लिमातील ८२ जाती देखील मागासप्रवर्गात समाविष्ट केल्या आहेत, हे आपल्या गावी देखील नसते. मुस्लिमातील सर्व अरझल हे ओबीसी असल्याचे स्पष्ट केले आहे. न्यायमूर्ती सच्चर समितीनेही मुस्लिमांतील मागासलेपण निदर्शनास आणून दिले आहे. हे आपले मागासलेपण कोणामुळे आणि कशामुळे हा विचार प्रथम झाला पाहिजे. एक राष्ट्र म्हणून विचार करताना चांगला असो वा वाईट केवळ एकाचाच विचार करून चालणारा नसतो. कारण कोणताही एकांगी विचार अकारण द्वेषाची पेरणी करत असतो. अगदी स्वातंत्र्यपूर्व काळापासून असा एकांगी विचार होत आल्याचे इतिहाससिद्ध आहे. त्याला जबाबदार कोण हे समाजास पक्के ठावूक असते. सारे जहांसे अच्छा हिंदोस्ता हमारा, असे तराना-ए-हिंद लिहिणारे इकबाल नंतरच्या काळात अवघ्या पंचवीस वर्षानंतर स्वतंत्र पाकिस्तानची मागणी करतात आणि तराना- ए-मिली लिहितात म्हणजेच स्वतंत्र पाकिस्तानचे गाणे लिहितात. तरीही एक भारतीय म्हणून आपण त्यांचा द्वेष कधी करत नाही आणि करूही नये. चौधरी रहमत अली यांनी इंडिया या शब्दात हेराफेरी करून दिनीया कसा कसा निर्माण केला होता आणि भारताबाहेर नव्हे तर भारतातच किती पाकिस्तानची निर्मिती करण्याची त्यांची योजना होती हे अभ्यासकांनी जे. एन. दीक्षित यांच्या भारत - पाक संबंध या पुस्तकातून मुळातून समजून घ्यावे. मदनी सारखे लोक हे त्या विचारांचे पाईक आहेत. सामान्य मुस्लिमांसाठी जगण्याचे प्रश्न भेडसावत असताना समाजाची वैचारिक दिशा भलतीकडे वळविण्यात हे लोक वाकबगार असतात. आज वर्कर पॉप्युलेशन रेशो पाहिला तर चित्र भयावह आहे. ६४.४ टक्के लोकसंख्या काम करणारी आहे. यात हिंदू ६५.८ टक्के, एस. सी. आणि एस. टी. ७१.४ टक्के, ओबीसी ६७.३ टक्के तर मुस्लिमात हेच प्रमाण ५४.९ टक्के आहे. एकूण भारतीय महिलांचे काम करण्याचे प्रमाण ४८.६ टक्के असताना मुस्लिम महिलांचे प्रमाण २५.२ टक्के एवढ्यावरच सीमित झाले आहे. एकुणातच बेकारीचे प्रमाण मुस्लिमांमध्ये जास्त असताना आपले लक्ष्य काय असावयास हवे आणि आपण काय करत आहोत, हे त्या त्या समाजगटातील धुरीणांनी ठरविले पाहिजे. याच पद्धतीने शिक्षणातील प्रमाणही आपणास पाहता येईल. तेथेसुद्धा मुस्लिमांचे प्रमाण इतर समाजापेक्षा कमीच आहे. कोणाच्या श्रद्धेवर बोलण्यापेक्षा जीवनाच्या इतर अंगावर लक्ष केंद्रित करून आपली प्रगती कशी होईल, हे पाहण्याची गरज आज येऊन ठेपली आहे. अगदी महर्षी दयानंद सरस्वती पासून ते शेषराव मोरे यांच्यापर्यंत अनेकांनी इस्लाम आणि त्यांची जीवनपध्दती समजून सांगण्याचा प्रयत्न केला. आता गरज आहे ती त्यांची जीवनपातळी उंचावण्याची. मतांच्या राजकारणावर डोळा ठेवून ही पातळी निश्चितच वाढणार नाही. त्या त्या समाजगटातील समाजसुधारकांकडूनच ही अपेक्षा असते. हमीद दलवाईसारख्या माणसाने आपले अख्खे आयुष्य व्यतीत करून थोडीफार सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न केला, पण तोही तडीस जाऊ शकला नाही. कारण व्यक्तीला काय किंवा संपूर्ण समाजाला काय जोपर्यंत आपण बदलले पाहिजे असे आतून वाटणार नाही तोपर्यंत बदल असंभव असतो. आपल्या अभौतिक धर्मश्रद्धा चार भिंतींच्या आत ठेऊन ऐहिक जगणे सुखकारक करण्याच्या दृष्टीने पाऊल उचलले गेले पाहिजे. कुरुंदकर म्हणतात त्यारीतीने हिंदूंचे धर्मवेड जाणवत नाही आणि मुस्लिमांचे धर्मवेड जाणवते, एवढाच काय तो फरक आहे. इथला हिंदू समाज अशा असंख्य वादळांना सामोरे जाऊन, झंझावाताचे तडाखे सहन करून पुन्हा जैसे थे स्थितीत लवकर येतो. जणू काही फार मोठे असे झाले नाही, हा त्याचा अविर्भावच त्याला सर्व गोष्टीतून सहीसलामत सुटण्याचा मार्ग वाटत असतो. पण मुस्लिम जगताचे असे नाही. त्यामुळेच मुस्लिम मनाचा अंदाज घेत व अनेकदा गाफील ठेवून राजकारण करणे हे समाजांतर्गत धुरीणांना आणि राजकारण्यांना देखील सोयीचे जाते. मतमतांतराच्या राजकारणात आपला वापर किती होऊ द्यायचा हे स्वतः ठरवावे.




**(लेखक गोदावरी कला महाविद्यालय अंबड जि. जालना येथे मराठीचे प्राध्यापक आहेत)**

# डॉ. श्रीकर परदेशी साहेब कॉपीमुक्तीसह भ्रष्टाचारमुक्ती पॅटर्नही जोमाने राबवा




कॉ. के.के. जांबकर
मो. 9422870578

आधुनिक केसरी

**सर्व प्रथम मी डॉक्टर श्रीकर परदेशी साहेबांचे मनापासून कौतुक व अभिनंदन करतो. आपण महाराष्ट्रात परत फिरून मंत्रालयात उच्च पदस्थ म्हणून विराजमान झालेले आहात. अतिशय पारदर्शी, शिस्तीचे प्रामाणिक, अभ्यासु, प्रशासकिय स्तरावरील कुठलेही काम अतिशय संयम व सचोटीने हाताळणारे ऐक सुस्वभावी व शांत स्वभावाचे व्यक्तिमत्व म्हणून आपण सर्व दुर परिचीत आहात. प्रशासकीय कारभारात आपली एक आगळी वेगळी ओळख आहे. नुसतीच आगळी वेगळी ओळख नव्हे तर प्रशासकिय कारभारात शासनाचे विचार व धोरणे राबवित असताना राज्य व सर्वसामान्याच्या हिताची धोरणे राबविणारे म्हणून आपल्या कार्याचा ठसा जिल्हाधिकारी कार्यालयापासुन ते पि.एम.ओ. ऑफिस व मंत्रालयापर्यंत आपला प्रवास प्रेरणादायी आहे. त्यामुळे शासकिय योजनांना ऐक आगळी वेगळी दिशा व महत्व देवून जाते. आपल्या निश्चयी व पारदर्शी कार्य पद्धतीमुळे आपण सर्वदुर परिचित आहात. सन २००९ ते २०१२ या आपल्या नांदेड कार्यकाळात मी आपनास जवळून ओळखतो. त्या काळात नांदेड रेल्वे डिव्हिजन जवळील म्हाळजा येथील सामान्य व गोरगरिबांच्या जमिनी व प्लॉट धारकांवर अन्याय होत असल्यामुळे हे प्रकरण सामाजिक कार्य म्हणून आम्ही हाती घेवून आपल्याकडे न्याय व दाद मागण्यासाठी गेले असता सर्वप्रथम परिस्थितीचे चांगले आवलोकन करून जिल्हाधिकारी कार्यालय नांदेडच्या पायऱ्या उतरावयाच्या आत आपण जबाबदार व प्रामाणिक अधिकाऱ्याची त्वरेने नियुक्ती करून संम्बंधीताला न्याय दिल्यामुळे ही घटना आजही माझ्या कायम स्मरणात आहे.**

शिवाय संघटने मार्फत गोरगरीब कामगार व काष्टकरी लोकांच्या आरोग्य वृद्धीसाठी संबंधित यंत्रणेला त्वरीत आदेशित करून निशुल्क आरोग्य शिबिरे घेण्यास भाग पाडले. जिल्हा स्तरावर कार्यरत असनाना कुठलेही वैयक्तीक अथवा सार्वजनिक समाजहिताचे प्रश्न सोडवणूकीसाठी डॉक्टर साहेब ऐक मसिहा सारखेच राहतात. प्रशासनात वरिष्ठपदी कार्यरत असताना बारीक सारीक गोष्टी, अपेक्षित उपेक्षित वंचितांना न्याय देण्यास्तव आपले हात कधी थांबत नाहीत. आपण जेवढे सुस्वभावी प्रामाणिक कष्टाळु व बुद्धीमान तेवढेच कर्तव्य कठोर यातुनच आपल्या प्रामाणीक वैचारीक संकल्पनेतुन पटपडताळणी, कॉपी मुक्ती पॅटर्न सह अतिक्रमण हटाव मोहिमही आपण नांदेड जिल्हातील आपल्या कार्यकाळात पारदर्शी व प्रभावीपणे राबवल्यामुळे आपण नांदेड जिल्हयालाच नव्हे तर संबंध महाराष्ट्राला व आमच्या सारख्यांना आपले म्हणून परिचित आहात. कॉपीमुक्ती, पटपडताळणी व अतिक्रमण हटाव मोहिम राबवत असनाना विद्यार्थी, संस्था चालकासह अतिक्रमण धारकांना आपण स्वप्नातही दिसायचे. थोडक्यात हे सर्व प्रशासकिय स्तरावरून प्रमुख या नात्याने कार्यरत असताना "ऐक हातमे गीता दुसरे हातमे जूता" अशीच आपली कार्यशैली असल्यामुळे भ्रष्टाचारी शासकिय पुढारी व यंत्रणेवर आपला एक वेगळा असा नैतिक दबदबा आहे. प्रशासकिय सेवेत कार्यरत असल्यामुळे शासन कर्त्यांच्या दबावाला आपण कधी झुकत नाहीत. आपली कार्यपद्धती सर्व हितदर्शक व समाजहितास कशी पुरक आहे यांची सर्वसामान्यासह शासनकर्त्यांना सहज पणे जाणिव करून देवून ती आमलात आणतात. खरोखरीच हा सुसंवादात्मक दुवा साधुन काम करणे सोपे नाही. हे सर्व उच्च पदस्थ प्रशासकिय अधिकारी म्हणून कार्यरत असताना निकोप, प्रामाणिक व सुसंस्करीक पिढी व समाज घडला पाहिजे ही आपली मनोमन इच्छा. विचार व वागणूकीतील पारदर्शी, प्रामाणिकपणा व सुस्पष्ट स्वभावामुळे बऱ्याचशा शासन कार्त्यांना आपण नको असता. पण प्रशासकिय व सामाजीक व्यवहारात जास्त झालेला कचरा साफ सुफ करण्यासाठी व योग्य दिशा दर्शकता ठेवून प्रशासकिय कारभार चालविण्यासाठी आपल्या सारख्या अधिकारी वर्गाची वर्तमानात नितांत गरज आहे. अशा कार्यदक्ष व कर्तव्यदक्ष अधिकारी वर्गामुळे प्रशासकीय कारभारालाच नव्हेतर समाजलाही निशिच्तच योग्य दिशा मिळुन नक्कीच प्रामाणिक व सुसंस्कारीक समाज निर्मिती होण्यास हातभारच लागतो. वर्तमानात बहुतांश प्रशासकिय कारभार Under Political Pressure चालत असल्यामुळे शासन-प्रशासनात भ्रष्टाचार व भाटगिरीचा उदो-उदो होत असून सर्व सामान्य जनता मात्र वैफल्य ग्रस्त आहे. हे वास्तव नाकारता येणार नाही.



शासकिय सेवेत रूजु झाल्यावर आपण समाजाचे कांही देणे लागतो हा विचार आता राहिलेला नाही. शासकिय नौकरी कुठल्याही पदीअसो बहुतांश जन पैसे कमावण्यासाठी करतात असाच नौकरदार वर्गाचा समज आहे. म्हणून जनहिताच्या शासकिय योजना नौकरदार वर्गामार्फत राबवित असताना नेहमीच जनतेला त्यांच्या मुजोरी व भ्रष्टाचारीवृत्तीचा अनुभव येतो. त्यामुळे सर्व सामान्य जनतेसह गोरगरिबांना त्वरीत न्यय मिळत नाही. म्हणून जनसामान्य नौकरशाहीवर नाराज होतात. धनदांडगे दबाव टाकुन तर मध्यम वर्गीय चिरीमिरी देवून आपले कार्यभार आटोपतात. तळागाळातील गरिब व अज्ञानी माणूस मात्र कार्यालयात खेटे घालुन बेजार असतात असे चित्र बऱ्याच कालावधीपासून नौकरशाहीत सुरू आहे. हा आरोप नसून वैयक्तिक वास्तव अनुभव आहे. म्हणून जनतेला नौकरदार वर्गाबद्दल फारसी आपूलकी नाही. गले लठ्ठ पगारी असून देखील नोकरशाहीत जनहिताच्या योजना राबविताना भ्रष्टाचार झाल्याशिवाय राहत नाही. नांदेड जिल्ह्यात प्रथम कॉपीमूक्ती अभियान व अतिक्रमण हटाव मोहिम राबविताना डॉक्टर साहेबांना अनेक समस्याला सामोरे जावे लागले, शिवाय राजकिय दबावही वाढला पण सार्वजनिक हिताची धेय्य धोरणे राबविताना डॉक्टर कधीही विचलित नसायचे व नसतातही शिवाय आपल्या धोरणावर ठाम राहून कृती करतात त्यामुळे बाजारू शासनकर्ते व गुंडागर्दीला येथे अजिबात थारा नसातो असे निश्चयी वृती सारखे ऐखादे अपवाद जरूर असतात.



कडू औषध घेतल्याशिवाय जसा आजार बरा होत नाही तसे प्रामाणिक पारदर्शी राहुन नौकरशाहीत काम केलेल्याशिवाय व्यक्ती व योजनाचे महत्व कळत नाही व जनहितही साध्य होत नाही. आपल्या मंत्रालयात मुख्य सचिव पदी रूजू होण्यामुळे महाराष्ट्राला एक नवी दिशा मिळेल. कॉफी मुक्ती सह भ्रष्टाचार मुक्त महाराष्ट्र होण्यासही निश्चितच सहकार्य मिळेल. म्हणून आपली मुख्य सचिवपदी नियुक्ती केल्याबद्दल शासनाचे मन पुर्वक अभिनंदन व डॉक्टर साहेबांना सस्नेह सुभेच्छा!

**म्हणून म्हणावेसे वाटते की,**
**सोंच बदलनेसे सितारे बदल जाते है!**
**नजर बदलनेसे नजारे बदल जाते है!**
**कश्ती बदल नेकी जरूरत नही है!**
**कश्ती का रूख बदल दो,**
**किनारे अपने आप मिल जाते है!**

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739




# आमखेडा येथे नव्याने सुरु होणाऱ्या देशी दारू दुकानास महिलांचा विरोध

## प्रशासनास निवेदन; महिला आंदोलनाच्या पवित्र्यात

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्याची शासकीय कार्यालय असलेल्या गजबाजलेल्या सोयगाव- बनोटी रस्त्यावर औरंगाबाद येथील स्थलांतरित झालेले देशी दारू दुकान सुरू होणारे दुकानास शासनाने परवानगी देऊ नये अशी मागणी महिला मंडळाच्या अध्यक्षा विमलबाई खैरनार यांनी राज्य उत्पादन शुल्क अधीक्षक औरंगाबाद यांना दिले आहे. अन्यथा महिला रस्त्यावर उतरून आंदोलन करतील असेही निवेदनात म्हटले आहे. आमखेडा येथे गावाच्या प्रमुख असलेल्या सोयगाव- बनोटी रस्त्यावर तसेच शासकीय कार्यालय असलेल्या तहसील कार्यालय, उप अधीक्षक सिटी सर्व्हे कार्यालय,, वनक्षेत्रपाल कार्यालय, सामाजिक वनीकरण कार्यालय, लघु पाटबंधारे कार्यालय, ग्रामीण रुग्णालय सोयगाव आदी कार्यालय आहेत. या कार्यालयात तालुक्यातील खेडेगावातून लोक आपली कामे घेऊन येतात. त्यामुळे हे वर्दळीचे ठिकाण असल्याने येथे औरंगाबाद स्थित देशी दारूच्या दुकानाचे स्थलांतर होणार आहे. या ठिकाणी भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या गजानन महाराज, साई मंदिर, व विठ्ठल मंदिरात हजारो भाविक येतात. तसेच शाळा कॉलेजला जाणाऱ्या विद्यार्थ्यांचीही वर्दळ असते.

हे देशी दारू दुकान सुरू झाल्याने आमखेडा गावातील तरुण वर्ग दारूच्या आहारी जाऊन व्यसनी होतील त्यात अनेकांची घरादारे उध्वस्त होऊन लेकर-बाळ उघड्यावर पडतील.त्यामुळे या दुकानास शासनाने परवानगी देऊ नये अशी मागणी महिला मंडळाच्या विमलबाई खैरनार, कलाबाई धोंडू गायकवाड, यांच्यासह शेकडो महिलांनी केली आहे.या निवेदनावर शेकडो महिलांच्या स्वाक्षऱ्या आहेत. अन्यथा लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा ईशारा देण्यात आला आहे. या निवेदनाच्या प्रति जिल्हाअधिकारी औरंगाबाद, आयुक्त राज्य उत्पादन शुल्क मुंबई, आयुक्त राज्य उत्पादन शुल्क औरंगाबाद, पोलीस अधीक्षक ग्रामीण औरंगाबाद, तहसीलदार सोयगाव, गटविकास अधिकारी पंचायत समिती सोयगाव व पोलीस स्टेशन सोयगाव यांना देण्यात आल्या आहेत.



**नियोजित देशी दारू दुकानास ग्राम पंचायत आमखेडाचे नाहरकत प्रमाणपत्र ?**

नियोजित देशी दारू दुकानास आमखेडा ग्राम पंचायतीने नाहरकत प्रमाणपत्र देतांना गावातील नागरिकांचा कोणताही विचार न करता नाहरकत प्रमाणपत्र दिले आहे .यात सरपंच व ग्रामसेवक यांनी आर्थिक देवाण घेवाण केल्याचा आरोप महिलांनी निवेदनात केला आहे .

.........................................................................................

आमखेडा ग्रामपंचायत कार्यालयाकडे संबंधित दुकानदारांचा नाहरकत प्रमाणपत्रासाठी अर्ज प्राप्त झालेला असून अद्याप देण्यात आलेले नाही .

सत्यनारायण पुल्लेवाड, ग्रामसेवक आमखेडा

# कु. श्रीया कुलकर्णी तबला अलंकार परीक्षा उत्तीर्ण

आधुनिक केसरी न्यूज



**सांगोला :** अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळ मुंबई यांचे मार्फत जानेवारी महिन्यात घेण्यात आलेल्या तबला अलंकार परीक्षेत सांगोला येथील कु. श्रीया श्रीगणेश कुलकर्णी हिने प्रथम श्रेणीमध्ये उत्तीर्ण होऊन कोल्हापूर केंद्रात प्रथम येण्याचा बहुमान मिळवला आहे. तालमणी पंडित मनमोहन कुंभारे सर यांच्या रिदम अकॅडमी सांगली येथे गेल्या आठ वर्षापासून श्रिया कुलकर्णी तबल्याचे शिक्षण घेत आहे. इयत्ता चौथी पासूनच तबल्याची तिला आवड असल्याने तिने तबल्यातील उच्च शिक्षण घेण्याचा निश्चय करून अलंकार च्या दोन्ही परीक्षा उत्तीर्ण झाल्यामुळे तिला "अलंकार" ही पदवी प्राप्त झाली आहे. अलंकार ही पदवी तबल्यातील पोस्ट ग्रॅज्युएशनची पदवी आहे.

# शरद पवारांची बदनामी करणाऱ्या वृत्त वाहिनीला नोटीस

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** शरद पवार यांच्या विरोधात बदनामीकारक वृत्त प्रसिद्ध केल्याबद्दल 'जय महाराष्ट्र' या वृत्तवाहिनीच्या संपादक आणि भाजपचे प्रवक्ते केशव उपाध्ये यांना राष्ट्रवादीच्यावतीने कायदेशीर नोटीस बजावण्यात आली आहे. पुणे येथे शरद पवार यांनी एका कार्यक्रमात संवाद साधला होता मात्र पवारसाहेब जे बोलले नाही ती वाक्य शरद पवार यांच्या तोंडी दाखवून 'जय महाराष्ट्र' या वृत्तवाहिनीने बिनबुडाची व खोटी बातमी दिली. ती बातमी सोशल मिडियावर भाजपचे प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी शेअर करुन बदनामीत आणखी भर घातली आहे.




# अंगणवाडी सेविकांचे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** अंगणवाडी सेविका यांची स्कुटीवर रॅली काढून मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना यांची भेट घेतली. अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना पूर्व प्राथमिक शिक्षकेचा दर्जा व वेतनश्रेणी मिळावी यासाठी 20 फेब्रुवारी 2023 पासून राज्यव्यापी संपामध्ये अंगणवाडी सेविका व मदतनीस काळ्याफिती लावून करत आहे. शिक्षक आमदार कपिल पाटील, पूर्व प्राथमिक शिक्षक भारती राज्यअध्यक्ष नवनाथ गेंड यांच्या मार्गदर्शनाखाली 20 फेब्रुवारी 2023 पासून अंगणवाडी सेविका यांचा राज्यव्यापी बेमुदत संपात महाराष्ट्र राज्य पूर्व प्राथमिक शिक्षक भारती संघटने अंतर्गत अंगणवाडी सेविका मदतनीस अंगणवाडीमध्ये काळ्याफिती लावून काम काम करून अंगणवाडीतील 3-6 वयोगटातील लाभार्थ्यांना ताजा आहार वाटप करत आहे तसेच ग्रामपंचायत मार्फत अंगणवाडीसाठी येणारा निधी या मधून अंगणवाडीमध्ये लाभार्थ्यांना आहार शिजवण्यासाठी गॅस सिलेंडर इतर साहित्य व पाणी नळ जोडणी करण्यात यावी. यासंदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना यांना निवेदन देऊन चर्चा करण्यात आली निवेदन देताना महाराष्ट्र राज्य पूर्व प्राथमिक अंगणवाडी शिक्षक भारती जिल्हाध्यक्ष माया म्हस्के, तालुका अध्यक्ष पुष्पा जाधव संघटक अश्विनी सोनवणे शांता जारवाल, गीतांजली पहाडे, कविता चौधरी आदींची उपस्थिती होती.

## महाराष्ट्र Business Katta












# लोकशाहीसाठी एकत्र येणे आवश्यक



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**भारत हा जगातील सर्वात मोठा लोकशाही असलेला देश मानला जातो. भारताच्या संविधानाची अंमलबजावणी केली तर काही दिवसातच देश एक महासत्ता म्हणून उदयास येतो. परंतु सर्वात मोठी लोकशाही असलेल्या देशात प्रस्थापित राजकारण्यांनी लोकहीताचे काहीच ठेवले नाही. एवढेच काय तर लोकशाहीचा अर्थ देखील कित्येक नागरिकांना माहिती नाही. म्हणून च ज्यांना लोकशाहीचा अर्थ माहिती नसलेले लोक लोक सेवकांपुढे हाजी हाजी करून लाचारी पत्करताना दिसत आहेत. शासकीय पातळीवर सर्व सामान्य लोकांचे काम होण्यासाठी कामधंदा सोडून दिवसभर शासकीय कार्यालयात बसावे लागते. परंतु लोकसेवक असलेले शासकीय अधिकारी कर्मचारी वेळेवर येऊन वेळेवर काम करताना मात्र दिसत नाहीत.**


सर्वात मोठी लोकशाही असुनही अजुनही ती समाजात रुजली नाही याची शोकांतिका आहे. लोकशाहीचा अर्थ लोकांना समजून सांगुन लोकशाही विषयी जनजागृती केली असती तर आज समाजाचा विकास तर झाला असता आणि देश प्रगती पथावर असता. लोकशाहीचा अमृतमहोत्सव जवळ येत आहे परंतु लोकशाहीची फळे चाखायाचे तर सोडा अजून लोकशाहीचे मजबूत झाड कसे असते याची प्रचिती ही देशातील नागरिकांना आली नाही. भारत हा शेती प्रधान देश आहे. आणि शेतकऱ्यांना झाडाचे महत्त्व माहिती आहे. एखादे झाड मजबूत आणि उंच असेल तर शेतकरी काहीही झाले तरी ते तोडत नाही. त्याची निगा राखतो कारण शेतकऱ्यांना माहिती असते हेच मजबूत झाड आपल्याला सावली देते, फळ देते आणि अडीअडचणी साठी स्वयंपाक करायला इंधन देते. थोडक्यात एका काय काय काय देऊ शकते याची जाणीव शेतकऱ्यांना आहे. लोकशाही शेतातील झाडापेक्षा कितीतरी पटीने लोक विकासाचे मोठे आणि मजबूत झाड आहे परंतु त्यांचे महत्त्व न सांगितल्याने आजही लोक अज्ञानी आहेत म्हणून च लोकशाही ची रुजवण झाली काय नाही काय काही लोकांना काहीच फरक पडत नाही असे दिसते. परंतु त्याचे वाईट परिणाम मात्र सर्वांना भोगावे लागतात. हे कोणीही नाकारू शकत नाही. सर्वसामान्य आणि शिक्षीत लोकांना सुद्धां लोकशाही माहिती नाही. काही काही लोक तर केवळ मतकेंद्रावर जाऊन मताधिकार बजावला त्यालाच लोकशाही समजतात. मताधिकार बजावणे म्हणजे संपूर्ण लोकशाही नव्हे तर लोकशाही मधीलच एक अधिकार म्हणजे मताधिकार होय. जो की संविधानापुर्वी नव्हता परंतु संविधानाने तो मताधिकार देऊन देशातील सर्व माणसांना एकाच पातळीवर उभे केले. गरिब श्रीमंत अडाणी शिक्षीत स्त्रि पुरुष मग कोणताही भेद न करता प्रत्येकाच्या मताला समान किंमत देऊन लोकशाही चा संपूर्ण भार हा जनतेच्या खांद्यावर दिला पण याची जाणीव लोकांना नाही. मताधिकार एक असा अधिकार आहे ज्यामुळे समाज आपला आदर्श नेता ठरवू शकतात परंतु आज लोकशाही विषयी जागृत नसल्याने नेत्याची हाजीहाजी करण्याची वेळ देशातील लोकांवर आली आहे. देशात जनताच राजा आहे. आणि लोकप्रतिनिधी, सरकारी अधिकारी कर्मचारी हे लोक सेवक आहेत. यांनी लोकांची सेवा करायला पाहिजे पण आज लोकच लोकप्रतिनिधी आणि शासकीय अधिकारी कर्मचारी यांची वेगवेगळ्या स्वरूपात सेवा करताना दिसतात. भाऊ म्हणले तीच पुर्व दिशा, भाऊच्या पाठीमागे आम्ही आहोत असे ओरडणाऱ्यांना हे ही माहिती नसते की लोकांच्या हिताचे मुद्दे लोकांना विचारून भाऊंनी मांडले पाहिजे. आणि लोक भाऊच्या मागे नाही तर भाऊ लोकांच्या मागे गेले पाहिजे की तुमच्या काय अडचणी आहेत सांगा आणि त्या अडचणी त्यांनी सभागृहात मांडून त्यावर उपाय काढला पाहिजे. हीच तर लोकशाही आहे. लोकशाही मध्ये लोकांच्या समस्या सोडवण्यासाठी, सर्वांगीण विकास व्हावा या साठी लोक आपले काम करणारे प्रतीनिधी निवडून देतात व जनतेच्या वतीने लोकप्रतिनिधीं काम करायचे असते. जनतेची कामे म्हणजे शिक्षण, आरोग्य रोजगार आणि महागाई यावर काम करणे आवश्यक असते. शिक्षण आरोग्य रोजगार आणि महागाई यावर सरकार खरचं प्रभावी पणे काम करू शकते का तर याचे उत्तर आहे हो. फक्त ते करण्याची आणि लोकशाही मार्गाने जाण्याची ईच्छा पाहिजे. लोकांना शिक्षण, आरोग्य, रोजगार मिळण्यासाठी व महागाई वर नियंत्रण ठेवण्यासाठी लोकशाही मध्ये पुर्ण तरतुदी आहेत फक्त लोकशाही ची रूजवण झाली नाही म्हणून त्याची जाणीव झाली नाही. जसे आपल्या वाडवडीलांची जागा असेल आणि सख्या भावाने फुटभर जर आपल्या हद्दीत येण्याचा प्रयत्न केला तर कितीतरी खुण झाले आहेत आजही कीतीतरी खटले न्यायालयात प्रलंबित आहेत. परंतु लोकशाही लागु झाली, संविधानाची अंमलबजावणी सुरू झाल्या नंतर रेल्वे, बँक, कंपन्या, बि एस एन एल, शासकीय शाळा, शासकीय हॉस्पिटल, विमान सेवा, सर्वच च्या सर्व देशातील प्रत्येक नागरिकांच्या नावावर झालेले आहे. शंभर पेक्षा जास्त उत्पानाच्या साधनावर देशातील प्रत्येक नागरिकांचा अधिकार आहे. आणि याच जोरावर देशाचा आणि देशातील नागरिकांचा विकास करणे शक्य आहे. जसे शासकीय शाळेमध्ये शिक्षण मोफत असते, याच शासकीय शाळेतून अनेक अधिकारी, कर्मचारी नेते तयार झाले. परंतु आज शासकीय शाळा डबघाईस येत आहेत. शासकीय आहेत म्हणजे देशातील प्रत्येक नागरिकांच्या आहेत. त्या डबघाईस येत असताना ही नागरिक मात्र निद्रावस्थेत आहेत. शासकीय शाळेमधुन मोफत व गुणवत्तेचे शिक्षण



देऊन जे शंभरपेक्षा जास्त उत्पनाचे क्षेत्र सरकारचे आहेत तेथे नोकरी देणे सहज शक्य आहे. जसे रेल्वे मध्ये लाखों कर्मचारी, बँकेमध्ये लाखों कर्मचारी, शाळा, विमान, शासकीय कंपन्या जर विचार केला तर लोकसंख्या कितीही वाढली तरी रोजगार निर्मिती सरकार सहज करू शकते. पण सर्व सामान्य लोकांना आता प्रश्न पडतात जर रोजगार निर्मीती होऊ शकते तर सरकार का करत नाही. मुळात प्रश्न हा आहे. सरकारचे उत्पनाचे जे साधने आहेत. जसे रेल्वे, बँक, बि एस एन एल, बि ई एल, एच ए एल, ई आय एल, एन ए एल सिओ सारख्या अनेक कंपन्या ह्या लोकांच्या मालकीच्या असताना सरकारने खाजगी लोकांना विकल्या. खरे तर ह्या कंपन्या देशाला उत्पन्न मिळवून देत होत्या आणि त्या उत्पनाच्या जोरावर शिक्षण, आरोग्य रोजगार यावर खर्च करून वरिल समस्या सहज सोडवल्या जाऊ शकत होत्या. महागाई ची झळ लोकांना बसु शकत नाही कारण एखाद्या वेळी महागाई वाढली तर सरकार काही पैसे आणि जनतेचे काही पैसे टाकून पुर्ण खर्चाचा भार जनतेवर पडू देत नाहीत कारण शंभरपेक्षा जास्त कंपन्यांच्या उत्पन्नावर जनतेचा अधिकार आहे. म्हणून त्या उत्पन्नातुन अनुदान देऊन महागाई नियंत्रणात आणली जाऊ शकते. परंतु सध्या सर्व कंपन्या भांडवलदारांकडे गेल्याने कमी नोकरावर जास्त उत्पन्न भांडवलदार घेत आहेत. आणि ते कायमस्वरूपी नोकरी न देता कंत्राटी पद्धतीने नोकरी देऊन रोजगार कमी केला आहे. असेच शिक्षण क्षेत्रात व इतरही क्षेत्रात झाले आहे.

लोकप्रतिनिधी मार्फत तयार झालेले सरकार व लोकप्रतिनिधी यांनी लोकांचे, देशाचे, देशातील साधन संपत्तीचे संरक्षण करायचे असते. आणि जर ते करणे शक्य होत नसेल तर राजीनामा देऊन घरात बसायचे असते. परंतु काम करता येत नाही म्हणून ते विकुन टाकायचे नसते. वाडवडीलांची शेती एखाद्या भावाला करता येत नसेल, किंवा शेतीचे काम जमत नसेल तर त्याला दुसरे काम सांगितले जाते आणि ज्याला शेतीचे काम जमते त्याच्याकडे शेती दिली जाते. देशाचेही तसेच आहे. रेल्वे खाते बिएस एन एल खाते चालवता येत नव्हते तर दुसऱ्या कडे ज्याला चालवता येते त्याच्या कडे द्यायचे असताना ते विकुन टाकणे किती पत योग्य आहे. शेती करता येत नाही म्हणून शेती विकणाऱ्यांना खरचं समाजात मान सन्मान मिळतो का ? नाही ना मग देश विकणाऱ्यांना मान सन्मान कशाला पाहिजे ? देश म्हणजे एक घरच आहे. देशातील कोणत्याही निर्णय घेताना सर्वांना विश्वासात घेणे आवश्यक असते. परंतु आज देशात तशी परिस्थिती दिसून येत नाही. पब्लिक सेक्टर विकुनही लोकांना त्याची कुणकुण पण लागु दिली नाही. एवढी बदमाशी करून लोकशाही ला मुठमाती दिली. आज लोकांचा पैसा अदाणी ला देऊन लोकांच्या कर्ज बाजारी केले, अदाणीला दिलेला पैसा सर्व सामान्य लोकांच्या कल्पना शक्तीच्या बाहेरचा आहे. अदाणीला लोकांचा पैसा देताना कोणत्याही प्रकारची शहानिशा न करता पैसा दिला, अदाणी ने अनेक घोटाळे करून देशाची दिशाभुल केली. देशात पारदर्शक व्यवस्था रहावी म्हणून वेगवेगळ्या स्वायत्त संस्था आहेत. परंतु स्वायत्त संस्था ह्या देखील लोकांचे काम न करता देश विकणाऱ्यांचे काम करत आहेत. अदाणी चा लाखों करोडोचा घोटाळा होऊनही ईडीने, आयटी ने छापेमारी करून तपासणी केली नाही. हे नेमके कोणाची वाट पाहत असतील ? कोणाचा दबाव यांच्या वर असेल ? जर स्वायत्त संस्था स्वायत्त काम करू शकत नसतील तर जनतेचे काय ? लोकशाही मध्ये जनता राजा असते परंतु सध्या जनतेचे हाल गुलामापेक्षा खराब आहेत. खऱ्या अर्थाने लोकशाहीची मजबूत पेरणी करायची असेल तर आणि लोकांचा व देशाचा विकास करायचा असेल समविचारी लोकांनी लोकशाही वाचवण्यासाठी, त्याची जागृती करण्यासाठी समाजात जाऊन सर्वाना एकत्र करणे आवश्यक आहे. जोपर्यंत लोक एकत्र होणार नाही तोपर्यंत लोकशाहीला पालवी फुटणार नाही. सध्या लोकशाही चा ढाच्याच शिल्लक राहीला आहे. परंतु या ढाच्यातही आजही आपण लोकशाहीची मुल्ये जोपासु शकतो परंतु गरज आहे. सर्वांनी एकत्र येऊन लोकशाही समजून घेण्याची, लोकांना जागृत करण्याची व लोकशाही वाजवण्यासाठी जाती धर्माचे राजकारण मातीत गाडून लोकहिताचे काम करणाऱ्यांना लोकशाही साठी एकत्र आणले तरच लोकशाही ची फळे चाखता येतील.

# भूतदया की मानवी जीवन



अमोल पुसदकर
संपर्क क्र. 9552535813

आधुनिक केसरी

**नुकताच एका चार वर्षीय मुलावर बेवारस कुत्र्यांच्या टोळीने हल्ला करून त्याला ठार केल्याची घटना घडलेली आहे व त्याचा व्हिडिओ सुद्धा समोर आलेला आहे. मेडिकलमध्ये सुद्धा नवजात अर्भकाला कुत्र्याने पळवून नेल्याची घटना सुद्धा घडलेली आहे. एका फ्लॅट स्कीम मध्ये अंगणात खेळणाऱ्या छोट्या मुलीवर रॅाटविलर कुत्र्याने हल्ला केल्याची घटना सुद्धा घडलेली आहे. रस्त्याने जाणाऱ्या येणाऱ्या दुचाकी वाहन चालकांवर कुत्र्यांनी हल्ला केल्याच्या व त्यांना पाडल्याच्या अनेक घटना घडलेल्या आहेत. आपल्यापैकी अनेक लोक अशा पद्धतीच्या अनुभवातून कधी ना कधी गेलेले असतीलच.**

कार चालकांच्या मागे कुत्र्यांनी धावणे ही पण नित्याची बाब आहे. फक्त त्यामध्ये कारचालकाला काही दुखापत होत नाही. परंतु बरेचदा कुत्र्याच्या भीतीमुळे कारचालकाचे कार वरील संतुलन सुटून अपघात होऊ शकतो. बेवारस कुत्र्यांनी लोकांना चावण्याच्या हजारो घटना घडलेल्या आहेत. कुत्रा चावल्यानंतर त्याकरता देण्यात येणारे इंजेक्शन पण भयानकच आहेत. व कुत्रा चावल्यानंतर होणारा रॅबिज हा रोग सुद्धा फारच भयानक आहे. आपल्या देशात भूतदयाही मोठ्या प्रमाणावर आहे. त्यामुळे बेवारस कुत्र्यांना बिस्किट खाऊ घालणारे व खाद्यपदार्थ देणारे ही भरपूर आहेत. महानगर पालिकेचे कुठलेही नियंत्रण या बेवारस कुत्र्यांवर नाही हे स्पष्ट आहे. काही काळापूर्वी अशा बेवारस कुत्र्यांची नसबंदी ची योजना अमलात आणण्याचा प्रयत्न झाला होता. परंतु तो फारसा यशस्वी झाल्याचे ऐकिवात नाही. अशा बेवारस कुत्र्यांसाठी कोंडवाडा सुद्धा आहे. परंतु बेवारस कुत्र्यांना पकडणाऱ्या गाड्या आल्या की कुत्रे उठून पळतात व अशा गाड्यांच्या हाती एकतर काही लागत नाही किंवा निरुपद्रवी श्वान यांच्या हाती लागतात. काही दिवसांपूर्वी एका भागात एका कुत्र्याने अवघ्या दोन तासाच्या अवधीत तेरा लोकांना चावे घेतले. अशा पण घटना घडत असतात. परंतु दिल्ली सारखी घटना घडल्यानंतर ज्यामध्ये एका लहानग्या मुलाचा जीवच गेलेला आहे. अशी घटना घडल्यानंतर मात्र अनेक लोक विचारात पडतात की भूतदया महत्त्वाची की या बेवारस कुत्र्यांचा बंदोबस्त महत्त्वाचा. भूतदया ही चांगलीच गोष्ट आहे. प्राणी मात्र वर मुक्या जनावरांवर दया केलीच पाहिजे परंतु त्यांच्यापेक्षा मानवी जीवन हे मौल्यवान आहे. त्यामुळे भूतदयेच्या नावाखाली बेवारस कुत्र्यांमुळे लोकांचा जर जीव जात असेल तर त्यांचा बंदोबस्त झालाच पाहिजे व लोक भयमुक्त झालेच पाहिजे.

काही काळापूर्वी घडलेला एक प्रसंग मला आठवतो. एका वस्तीमध्ये लहान मुलं खेळत होती. एक कुत्रा तिथे आला व त्याने खेळणाऱ्या चार मुलांना चावे घेतले. त्यानंतर त्यापैकी तीन मुले ज्यांची होती त्यांनी आपल्या स्कूटरवर आपल्या दोन मुलांना व शेजारच्या एका मुलाला बसवून त्यांना मेडिकल मध्ये नेले व त्यांना इंजेक्शन दिले. परंतु स्वतःचा एक मुलगा दवाखान्यात नेण्याचे त्यांचे राहून गेले. काही दिवस गेल्यावर त्या मुलाची तब्येत बिघडू लागली. त्याला थोडासाही आवाज सहन होईनासा झाला. त्यामुळे त्याच्या वडिलांनी त्यांचे डॉक्टर मित्र असलेल्या एका मित्राला घरी मुलाची तब्येत बघण्यासाठी बोलविले. डॉक्टर आले. सोफ्यावर बसले व त्यांनी प्यायला पाणी मागितले. पिण्यासाठी पाणी त्यांना दिल्यावर जसा त्यांनी पाण्याचा ग्लास हातात धरला व हातात थोडेसे पाणी घेतले तसा तो मुलगा एकदम घाबरला व त्यांनी हात आपल्या डोळ्यासमोर ठेवून मान दुसरीकडे वळविली हे पाहिल्याबरोबर ते डॉक्टर म्हणाले की याला रॅबिज झालेला आहे. याला मेडिकल मध्ये घेऊन जा. मेडिकल मध्ये त्या मुलाला नेण्यात आले. मेडिकल वाल्यांनी त्याला दाखल करून घेतले व घरच्यांना सांगितले की तुम्ही आता जा आम्ही जेव्हा तुम्हाला बोलवू तेव्हा तुम्ही या. त्या मुलाला रेबीज झालेल्या लोकांच्या एका खोलीत ठेवण्यात आले. पुढे त्याच्यामध्ये रॅबिज चे लक्षण अधिक वाढले. त्याला बांधून ठेवण्यात आले. तरीसुद्धा त्याचा उन्माद वाढतच गेला व शेवटी तो गतप्राण झाला. तो गेल्यावर त्याच्या घरच्यांना बोलविण्यात आले व त्यांच्या सुपूर्द तो मृतदेह करण्यात आला. एका हुशार मुलाचा अशा पद्धतीने अंत झाला. त्याच्या अंतयात्रे ला शेकडो लोक उपस्थित होते. इतका तो मुलगा प्रसिद्ध होता. अशा पद्धतीच्या घटना ज्यावेळेस घडतात त्यावेळेस समाज मन सुन्न होऊन जाते. रेबीज हा महाभयंकर रोग आहे. त्यामुळे माणसाला येणारा मृत्यूही महाभयंकरच आहे. शत्रूवर सुद्धा वेळ येऊ नये इतका भीषण मृत्यू माणसाचा या रोगामुळे होत असतो. भूतदया ही चांगली गोष्ट असली तरी



सुद्धा मानवी जीवन अनमोल आहे. पशुपक्षी प्राणी हे सगळे निसर्गाचे एक भाग आहेत परंतु त्यांची अमर्यादित संख्या, त्यांना खायला न मिळणे, त्यांचे पिसाळणे, मनुष्यांवर त्यांचे हल्ले करणे या सर्वच गोष्टी गंभीर आहेत. नेहमीप्रमाणे पालिका प्रशासन याकडे लक्ष देत नाही व निरपराध नागरिकांना, मुलांना त्याचा त्रास सहन करावा लागतो. त्यामुळे भूतदया की मानवी जीवन याचा निर्णय होणे आवश्यक आहे. आपल्या देशामध्ये भूतदयेपोटी प्राण्यांवरती होणारेअत्याचार रोखणाऱ्या संस्था आहेत. बेवारस कुत्र्यांना मारले जाऊ नये किंवा त्यांची नसबंदी केली जाऊ नये यासाठी लढणाऱ्या संस्थापणआहेत. अनेकानेक लोक आपल्या घरी कुत्रे पाळतात. त्यांच्यावर एखाद्या माणसाला पोसण्यापेक्षा अधिकचा खर्च केला जातो. त्यांच्यासाठी कुलर, एसी लावले जातात. त्यांच्या खाण्यासाठी नॉनव्हेज अन्न व वेगवेगळ्या पद्धतीचे औषध सुद्धा आणले जातात. महागडे डॉक्टर सुद्धा त्यांच्या दिमतीला उपलब्ध आहेत. आपल्या देशामध्ये लाखो लोक दारिद्र्यरेषेच्या खाली जगतात. अनेकांना शिक्षण नाही, पोटभर खायला अन्न नाही. अशा देशांमध्ये मात्र सोफ्यावर आरामात पडलेला श्वान पाहिला की अशा लोकांना त्याच्या भाग्याचा हेवा वाटल्या वाचून राहत नाही. जे लोक आपल्या घरी कुत्रे पाळतात ते त्यांना फिरायला नेण्याच्या नावाने रस्त्यावर,दुकानांसमोर, लोकांच्या घरासमोर घाण करायला त्यांना घेऊन जातात. याला काय म्हणावे ? ज्यांच्या घरी कुत्रे आहे त्यांच्या घरी मित्र नातेवाईक हे यायला सुद्धा घाबरतात. विदेशामध्ये तुमच्या श्वानांनी केलेली घाण ही तुम्हाला साफ करावी लागते. बगीचांमध्ये श्वानांना फिरायला घेऊन जाणे यास मज्जाव आहे. त्याला परवानगी नाही. कुठेतरी हे थांबले पाहिजे. मानवी जीवन हे अनमोल आहे. एखादा माणूस लहान असेल मोठा असेल गरीब असेल श्रीमंत असेल परंतु त्याचा जीव अशा बेवारस कुत्र्यांमुळे अथवा प्राण्यांमुळे जाऊ नये यावर लक्ष देणे गरजेचे आहे. भूतदया श्रेष्ठ आहेच. परंतु मानवी जीवन याही पेक्षा श्रेष्ठ आहे. प्राण्याचे जीवन महत्त्वाचे की मानवाचे असा प्रश्न उपस्थित झाला तर जीवन हे प्राण्याचे व मनुष्याचे दोघांचेही महत्त्वाचे आहे. परंतु मानवी जीवनाच्या समोर अशा बेवारस श्वानांना मोकाट सोडता येणार नाही .याचा सर्वांनी विचार करणे गरजेचे आहे.

# भारत सरकार मार्कण्डादेवाकडे लक्ष देईल का ?



श्रीकृष्णदास निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**यंदा कोरोना विषाणूने पड खाल्ली असल्याने महामृत्युंजय महामंडलेश्वर श्री मार्कण्डेश्वर जयंती उत्सवानिमित्त भरणाऱ्या मार्कण्डादेव येथील जत्रेला भाविकांची तुफान गर्दी उसळण्याची चिन्हे दिसत आहेत. दरवर्षी महाशिवरात्रीची चाहुल लागली, की भावीक भक्तांच्या उत्साहास कमालीचे उधान येते. गडचिरोली जिल्ह्यात तसेच महाराष्ट्र राज्यासह भारतभर महाशिवरात्रीला जत्रा मोठ्या प्रमाणात भरतात.**

या जत्रेच्या माध्यमातून अध्यात्मासह पर्यटनही साध्य होत असते. यामुळे महाशिवरात्रीच्या पावन पर्वावर गडचिरोली जिल्ह्यातील विदर्भाची काशी समजल्या जाणाऱ्या मार्कण्डादेव यासह चामोर्शी तालुक्यातील चपराळा, सिरोंचा तालुक्यातील सोमनूर संगम व तालुकानजीकचे कालेश्वर, आरमोरी तालुक्यातील वैरागडचे भंडारेश्वर मंदीर, स्थानिक डोंगरी महादेवगड, ठाणेगावचे हेमांडपंथी मंदीर, कुरखेडा तालुक्यातील अरततोंडीचे महादेवगड यासह अनेक ठिकाणी जत्रा भरत असतात. मागील दोन वर्षी कोरोनाचा जिवघेणा अकांडतांडव सुरू असल्याने कडक निर्बंध लावले गेले होते. त्यामुळे जिल्हा प्रशासनाने सर्वच जत्रा रद्द करण्याचा निर्णय घेतला होता. मात्र यंदा भाविकांना जत्रास्थळी "हर हर महादेव" असा जयघोष करत जाण्याची संधी मिळाली आहे. महामंडलेश्वर महामृत्युंजय श्री मार्कण्डेश्वर हे अख्ख्या भारतवर्षातील पद्मशाली समाजाचेच नव्हे तर संपूर्ण विदर्भाचे आराध्य दैवत आहे. गडचिरोली जिल्ह्यातील चामोर्शी तालुक्यातील मार्कण्डादेव येथे मार्कण्डेश्वराचे मंदिर आहे. त्याची विदर्भाची काशी म्हणून सर्वदूर ख्याती आहे. माघ शुद्ध तृतीयेला महामृत्युंजय मार्कण्डेय महर्षींची जयंती असते. या दिवशी जयंती उत्सव सर्वत्र मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. तर महाशिवरात्रीला मार्कण्डादेव येथे खुप मोठी जत्रा भरते.

महामंडलेश्वर महामृत्युंजय श्री मार्कण्डेश्वर पुराणः हे पुराण महादेवाचा लाडका भक्त- महर्षी मार्कण्डेयांनी स्वतः कथन केल्यामुळे या पुराणाला मार्कण्डेश्वर पुराण हे नाव मिळाले आहे. प्रदीर्घ तपःसामर्थ्याने चिरंजिवीत्व मिळविलेले ऋषी म्हणजे महर्षी मार्कण्डेय होत. श्रीमहाभारत संस्करणाच्या बाबतीत महत्वाच्या असलेल्या भार्गव ऋषींच्या वंशातील हे ऋषीराज महर्षी होते. हे पुराण प्राचीन असून याचा काळ साधारणतः इसवी सनाचे तिसरे शतक असावे, असे सांगितले जाते. गुप्तकालीन संस्कृतीचे दर्शन घडविणारे हे पुराण त्याकाळी म्हणजे इ.स.च्या चौथ्या-पाचव्या शतकात गोदावरीच्या उगमावर लिहिले गेले असावे. त्यात सर्ग- जगाची निर्मिती, प्रतिसर्ग- प्रलय, वंश- राजवंश, मन्वंतरे- विशिष्ट कालखंड व वंशानुचरीत ही पुराणाची पाचही लक्षणे दिसून येतात. त्यात १३७ अध्याय असून सुमारे ६,९०० श्लोक आहेत. या पुराणात एकच एक वक्ता नाही, तर अध्याय क्र.१ ते ४२पर्यंत वक्ता जैमिनी व श्रोता पक्षी आहे. अध्याय क्र.४३ ते ९०पर्यंत वक्ता मार्कण्डेय ऋषी व श्रोता क्रप्टुकी आहे आणि नंतरच्या अध्यायांमध्ये वक्ता सुमेधा व श्रोता सुरथ व समाधी आहेत. अठरा पुराणात सातव्या स्थानी असलेल्या या पुराणाच्या शेवटी मार्कण्डेय ऋषींनी पुराण श्रवणाचे फळ सांगितलेले आहेत. या पुराणाचे जो श्रवण करतो त्याची पृथ्वीवरील वंशपरंपरा चालत राहाते. त्या मनुष्याची पापांपासून मुक्ती होते, परम योगाची प्राप्ती होते. त्यास हजार अश्वमेध व शंभर राजसूय यज्ञाचे फळ मिळते. सर्वकल्याण व शुभार्थ प्रभावशाली मानला जातो तो श्रीमार्कण्डेश्वर पुराणाचा मंत्र- सर्व मंगल मांगल्ये शिवे सर्वार्थ साधिके| शरण्येत्र्यंबके गौरी नारायणि नमोस्तुऽते|| सर्वबाधा विनिर्मुक्तो धन-धान्य सुतान्वितः|| (हे मोक्षा, आम्हास स्वतंत्र कर, मुक्ती दे. आम्ही भगवान शिवाची पूजा करतो, ज्यास तीन नेत्र आहेत. जो हर श्वासात जीवन शक्तीचा संचार करतो आणि संपूर्ण जगाचे पालन- पोषण करतो. रोज रुद्राक्षमाळेने या मंत्राचा जप केल्याने अकाली मृत्यूचे भय दूर होते. तो सर्व संकटातून मुक्तता करणारा, संपत्ती व संततीचा दाता आहे.) प्रकृती अर्थात नारी स्वरुपिणी देवी हीच विश्वाची प्रेरकशक्ती आहे, हा मूळ हेतू या पुराणाचा आहे. दुर्गासप्तशती या नावाने प्रसिद्ध असलेले देवीमहात्म्य या पुराणाच्या तेराव्या अध्यायात आलेले आहे. सर्वमंगला अशा देवीची निर्मिती ही सर्व देवींची निर्मिती ही सर्व देवांचे तेजस्वी अंश एकत्र होऊन झाली, असेही वर्णन आहे. हा श्रीमार्कण्डेय पुराणाचा अंश आहे. तो देवी महात्म्य धर्म, अर्थ, काम व मोक्ष या चारही पुरुषार्थांना प्रदान करण्यास सक्षम आहे. सप्तशतीमध्ये काही असेही स्तोत्र व मंत्र आहेत,



जे विधिवत पारायणाने इच्छित मनोकामनांची पूर्ती करतात, असे म्हटले जाते.

महामंडलेश्वर मार्कण्डेय महर्षींची कथाः काही प्राचीन ग्रंथांत महादेवाचे परमभक्त महर्षी मार्कण्डेयांना दीर्घायुषी झाल्याचे म्हटले आहे. भगवान शिवाची उपासना व महामृत्युंजय सिद्धीने महर्षी मार्कण्डेयांनी सोळा वर्षाच्या अल्पायुषावर मात करून दीर्घायुष्य प्राप्त केले. तो भगवान शंकरजींचा सर्वार्थ साधक मंत्र असा- श्री नीलकंठाय वृषभध्वजाय तस्मै शिवकाराय नमः शिवायः|| अवन्तिकायां विहितावतारं मुक्तिप्रदानाय च सज्जनानाम्|| अकालमृत्योः परिरक्षणार्थं वन्दे महाकाल महासुरेशम्|| मात्र सर्व परिचित सप्त चिरंजीवांमध्ये मार्कण्डेयांचा समावेश नाही, हीच खंत भक्तांच्या नाजूक साजूक मनांना बोचत असते. महर्षी भृगू यांची कुलपरंपरा फार मोठी आणि कर्तृत्ववान वंशजांनी युक्त असली तरी त्यात अग्रक्रमाने नाव घेतले जाते ते त्यांचे पणतू महर्षी मार्कण्डेय यांचे! भृगूंचे नातू मृकूंड यांना मोठ्या तपश्चर्येनंतर भगवान शंकराच्या प्रसादाने झालेला हा मुलगा दिगंत कीर्तिमंत ठरला. तेजस्वी व कर्तृत्ववान मुलगा हवा असेल तर तो केवळ सोळा वर्षेच जगणारा मिळू शकेल, असे भगवान शंकराने वर देताना म्हटले. तेव्हा मृकूंड व पत्नी मरुध्वती हिने मोठ्या आनंदाने तो मुलगा मागून घेतला. मात्र पुढे या बाल मार्कण्डेयांनी तपोबलाने, वशिष्ठ मुनी व ब्रह्मदेवाच्या कृपेने मृत्यूवर मात केली. त्यांनी दीर्घायुष्य प्राप्त केले व ते मृत्युंजय ठरले, अशी पुराणात कथा आहे. चिरंजीव झालेल्या मार्कण्डेयांचे सर्व विषयांवरील ज्ञान आणि संशोधन विलक्षण आहे. याशिवाय प्रसंगानुरुप त्यांनी मृत्युंजयस्तोत्र रचले. तो महामृत्युंजय मंत्र असा- ॐ हौं जूं सः ॐ भूर्भूवः स्वः ओम त्रैम्बकम् यजामहे सुगन्धि पुष्टिवर्धनम्|| उर्वारुकमिव बन्धनान मृत्योर्मुक्षीय मामृतात् भूर्भुवः स्वरोम जूं सः||

देवीचा ध्यान मंत्रः देवी प्रपन्नार्तिहरे प्रसीद प्रसीद मातर्जगतोऽखिलस्य| प्रसीद विश्वेतरि पाहि विश्वं त्वमीश्चरी देवी चराचरस्य|| अग्नी, सूर्य यांचीही स्तोत्रे यात दिसून येतात. प्रभू रामचंद्राची कथा, भगवान श्रीकृष्णाचे बालचरित्र अशी इतर आख्यानेही यात आहेत. विदर्भातील गडचिरोली जिल्ह्यात असलेले मार्कण्डादेव हे शिव-तीर्थ व तेथून जवळच असलेल्या आमगाव (महाल) येथील दोन श्रीमार्कण्डेश्वर मंदिरे अजुनही दुर्लक्षितच आहेत. भारतीय पौराणिक साहित्यांमध्ये जी अठरा पुराणे आहेत, त्यात एक अतिशय महत्वाचे असे श्रीमार्कण्डेश्वर पुराण देखील आहे. या महर्षींचे राष्ट्रीय पौराणिक महत्त्व विषद करण्यासाठी याहून अन्य सबळ दाखल्यांची गरजच काय? म्हणूनच भारत सरकारनेसुद्धा या मंदिराकडे लक्ष द्यावे, अशी मागणी जोर धरत आहे. या पुराणात सगळ्या प्रकारच्या अवतारकथा येतात. म्हणूनच महाशिवरात्रीला मार्कणडादेव येथे खुप मोठी जत्रा भरते. तेथे महाकाल शिवदर्शनासाठी मोठी गर्दी उसळत असते. मागील दोन वर्षी जत्रा कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे प्रभावित झाली होती. मात्र यंदा ती भाविकांच्या अतिउत्साहात आणि अलोट गर्दीत फुलून येणार आहे, हे निश्चित! !! महामृत्युंजय महामंडलेश्वर श्रीमार्कण्डेश्वराय नमोऽनमा !!

# बालवाङ्मयाचे जनक - विनायक कोंडदेव ओक



प्रकाश क्षीरसागर
संपर्क क्र. ९०११०८२२९९

आधुनिक केसरी

**आपल्या भारतीय भाषांत दुर्लक्षित असा वाङ्मय प्रकार म्हणजे बालवाङ्मय. बालवङ्मय या साहित्य प्रकाराचे जनक असणारे विनायक कोंडदेव ओक यांचे नाव हल्लीच्या पिढीत फारसे कुणाला माहीत नसणारचअगदी बालवाङ्मय लिहिणाऱ्यांदेखील. जुन्या पिढीतील लेखकांकडे तसे दुर्लक्षच होते म्हणा. तसे कुणाही दिवंगत लेखकांची आठवण सहसा कुणी काढत नसते. परंतु ज्यांनी बालवाङ्मयाचा पाया घातला त्याचे विस्मरण बालसाहित्यकारांना होता कामा नये. त्यांनी मुलांसाठी 'बालबोध' नावाचे मासिक सुरू केले होते.**

चरित्रकार म्हणूनही त्यांची ख्याती होती. त्याशिवाय मोजक्या कविता लिहून ते कवी म्हणूनही मान्यता पावले होते. निबंध आणि शास्त्रीय विषयावरील लेखन हे त्यांच्या लेखनाचे वैशिष्ट्य. मुलांसाठी खास अशी पुस्तके त्यांनी लिहिली. त्यांची सुमारे पन्नास पुस्तके प्रकाशित झाली आहेत. त्यापैकी आता किती उपलब्ध आहेत हे मात्र ज्ञात नाही. १९४० मध्ये २५ फेब्रुवारी रोजी त्यांचा जन्म झाला. त्यांचे मूळ घराणे गुहागर येथील. म्हणजे कोकणातील. त्यांचा जन्म हेदूल या गावी झाला. लहानपणीच आई आणि वडील दोघांचेही देहावसान झाल्याने पोरक्या विनायकाला फारसे शिश्रण घेता आले नाही. त्यांचे बालपण हालाखीत गेले. काहीही करून आपण शिकायचेच हा ध्यास मात्र त्यांनी घेतला होता. इंग्रजी तीन इयत्तांपर्यंतचे शिक्षण त्यांनी कसेबसे मिळविले. विनायक ओक यांनी सरकारी शिक्षक म्हणून कामास सुरुवात केली. त्याकाळी शिक्षकांचे काम लगेच मिळत असे. आपल्या मेहनतीवर आणि कष्टाने त्याकाळची माणसे आपल्या हुशारीने बढती मिळवत. ओक यांनी बढती मिळवत एडिशनल डेप्युटी एज्युकेशन इन्स्पेक्टर पदापर्यंत मजल मारली.

तत्कालीन इंग्रज सरकारला शिक्षकांची गरज असे. त्याचप्रमाणे मुलांसाठी पुस्तकांचीही आवश्यकता असे. १८६१ ते १८९५ या काळात श्री. ओक यांनी विपुल लेखन केले. मेजर कँडी यांच्या सूचनेनुसार त्यांनी बालवाङ्मय लेखनास सुरुवात केली. त्यांनी मुलांना भारताचा इतिहास माहीत व्हावा यासाठी 'हिंदुस्थान कथारस', 'हिंदुस्थानातील योद्ध्यांची थोरवी' अशी ऐतिहासिक पुस्तके लिहून काढली. त्याचबरोबर त्यांनी 'महन्मणिमाला' हे चरित्रदेखील लिहिले होते. मुलास उत्तम बक्षीस', 'मुलांचे कल्याण', 'मुलास थोडासा बोध', 'इसापनीती' इत्यादी वाङ्मय त्यांनी निर्माण केले. शैक्षणिकदृष्ट्या जवळ-जवळ ५० पुस्तके त्यांनी लिहिली. ही पुस्तके लिहिताना मुलांना बोध, करमणूक व वाचनाची आवड निर्माण व्हावी यासाठी मुलांच्या प्रवृत्तीकडे, त्यांच्या ग्रहणक्षमतेकडे आवर्जून लक्ष दिले. भाषांतरित पुस्तकेही त्यांनी लिहिली. १८६६ मध्ये प्रकाशित झालेले 'लघुनिबंधमाला' हे त्यांचे इंग्रजी निबंधांवर आधारित असलेले पहिले पुस्तक होय. १८५१ मध्ये स्थापन झालेल्या 'दक्षिणा प्राइझ कमिटी'ने त्यावेळी भाषांतरांना प्रोत्साहन व बक्षिसे देण्याची योजना आखली होती. त्या योजनेत 'लघुनिबंधमाला' हे पुस्तक प्रकाशित झाले. त्यांनी इतिहासलेखनदेखील केले. जगातील प्रसिद्ध राष्ट्रांचा इतिहास कथन असलेले 'इतिहास तरंगिणी (१८७८)', 'हिंदुस्थानचा संक्षिप्त इतिहास' (१८७०), 'फ्रान्स



देशातील राज्यक्रांतीचा इतिहास' (१८७६). इत्यादि पुस्तकांचे लेखन त्यांनी केले. त्याशिवाय त्यांचे चरित्रलेखनही गाजले. त्यांनी काही प्रसिद्ध पुरुषांची चरित्रेही लिहिली. त्यात 'पीटर दी ग्रेट' (१८७४), 'शिकंदर बादशहा' (१८७५), 'ड्यूक ऑफ वेलिंग्टन' (१८७६), 'आल्फ्रेड दी ग्रेट' (१८८२), 'अब्राहम लिंकन' (१८९०), 'ग्लॅडस्टन' (१९०३) ही नावे वाखाणण्याजोगी आहेत. त्यांनी काही भारतीय नामवंत व्यक्तीची चरित्रेही लिहिली. त्यात 'जावजी दादाजी चौधरी' (१८९२), 'रावराजे सर दिनकर राजवाडे' (१८९७) यांचीही चरित्रे त्यांनी लिहिली. या चरित्रांमध्ये काही भाषांतरित आहेत तर काही स्वतंत्रपणे आहेत. चरित्रलेखन करताना 'नायकाचे गुण तेवढे दाखवावेत, दोषांविषयी बोलू नये' असे त्यांचे धोरण होते. विनायक ओक यांनी त्यांच्या 'बालबोध' हे पहिले खरेखुरे मराठी वळणाचे मासिक १८८१मध्ये सुरू केले. त्याद्वारे त्यांनी बालसाहित्यात नवे दालन खुले केले. केवळ मुलांसाठी असलेल्या या मासिकात 'संपादकीया'मध्ये ते मुलांना उद्देशून म्हणतात- 'शाळेत कळत नाहीत पण तुम्हांस कळल्या तर पाहिजेत अशा लक्षावधी गोष्टी आहेत. त्यांतल्या थोड्या-थोड्या आम्ही दर खेपेस तुम्हांला अगदी तुमच्या साध्या भाषेत सांगू; तुमच्या मनाला करमणूक व्हावी, तुमच्या अंगचे सद्गुण वाढावेत यासाठी हा आमचा प्रयत्न आहे.' असा प्रयत्न ओकांनी मासिकाच्या माध्यमातून पुढे सलग चौतीस वर्षे नेटाने केला. लहान मुलांप्रमाणे मोठ्यांनाही त्यांनी वाचक बनवले. 'बालबोध'मधील लेखन एकट्या ओकांनीच केले. एवढ्या मोठ्या प्रमाणावर उद्बोधक, रंजक वाटेल असे नानाविध स्वरूपाचे लेखन आधुनिक मराठीत ओक यांनीच प्रथम केले. मासिकाची वर्गणी बारा आणे ठेवून वर्गणीदार वाढवले व मासिक खेडोपाडी पोचवले. आपल्या संपादकीय कारकिर्दीत ओकांनी 'बालबोध'मधून ४०२ चरित्रे, ४०२ कविता, ४०२ निबंध, ३७१ शास्त्रीय निबंधांवरील माहिती व इतर ८५० विषय एवढे प्रचंड लेखन केले. म्हणूनच त्यांना 'बालवाङ्मयाचे जनक' असे म्हटले आहे. मुंबईच्या 'ख्रिश्चन लिटरेचर सोसायटी'ने त्यांच्याकडून मुलांसाठी डझनभर पुस्तके लिहवून घेतली होती. ख्रिस्ती धर्मप्रचार हाच या पुस्तकांचा हेतू होता. राजनिष्ठेपोटी ओक यांनी हे कार्य केले. त्यांच्या नावावर ४८ पुस्तकांची नोंद आढळते. 'कारंजे आणि ढग', 'लांडग्याची गोष्ट', 'राणीची गोष्ट' यांसारखी सातपासून सोळा पृष्ठांपर्यंतच्या दहा-अकरा चोपड्याही आहेत. ती सर्व मेथॉडिस्ट ख्रिस्ती लिटररी सोसायटीने प्रसिद्ध केली आहेत. 'मधुमक्षिका' हा कवितासंग्रहही त्यांचा प्रसिद्ध आहे. 'पुष्पवाटिका' या संग्रहात त्यांच्या निवडक दहा कवितांचा समावेश आहे.

# घराघरात ग्रंथालये निर्माण व्हावेत

आधुनिक केसरी

ग्रंथ हेच आपले गुरू आहेत. ग्रंथच आपले खरेखुरे मित्र आहेत. हजारो वर्ष जगाचे पाऊल पुढे पडत आहे.ते केवळ ग्रंथामुळेच ग्रंथासारखा चांगला मित्र कोठेही नाही.समाजाने चांगल्या पुस्तकांशी मैत्री केली तर तरच पुर्वी सारखे चांगले दिवस येतील.

टिव्ही ,चॅनेल,इंटरनेट,या साधनांमुळे वाचनसंस्कृतीचा र्हास होत चालला आहे.आज घरोघरी ग्रंथालये सुरू करण्याची आवश्यकता आहे. ग्रंथवाचनातुन आपल्याला किती समाधान मिळते .हे शब्दात सांगणे अशक्य आहे.घरात फर्निचर,टिव्ही ,फ्रिज सर्व काही आहे पण ग्रंथालयच नसेल तर ते घर परीपूर्ण होऊ शकत नाही. ग्रंथालयाचे महत्व आपल्या मनात ठामपणे राहणे गरजेचे आहे. ग्रंथामुळे जीवन घडते. आजच्या बदलत्या जगात ग्रंथाशिवाय पर्याय नाही. जगात बदल घडवण्याची ताकद ग्रंथालयामध्ये आहे.अमेरिकेत ॲड्र्यु कार्नेजी नावाचा थोर माणुस होऊन गेला. शंभर वर्षापुर्वीच तो कोट्याधीश होता. मात्र त्याने आपल्या मृत्यूपत्रात



आपली सारी संपत्ती आपल्या मुलांना न देता त्या पैशाचा वापर करत अमेरीकेतील जास्तीत जास्त जास्तीत जास्त खेडेगावांमध्ये वाचनालये बांधण्यात यावीत असे लिहुन ठेवले होते. पुस्तकांप्रती अशी निष्ठा असावी लागते. ग्रंथामुळेच जीवन घडते. ग्रंथ हेच आपल्या जीवनाला दिशा देतात. स्पर्धेच्या युगात वाचनाकडे पाठ फिरवली जात आहे. वाचनसंस्कृती लोप पावत चालली आहे.त्यासाठी घरोघरी ग्रंथालये उभे राहण्याची आवश्यकता आहे. ग्रंथ वाचनाने ज्ञानाचा बोध होतो. आज वाचनाचे मुख्य माध्यम कोणते असेल तर ते ग्रंथ होय. ग्रंथामुळे लिहलेले विचार आचरणात आणले गेले पाहिजे. शाळेईतकेच ग्रंथालयाला महत्व देण्याची आवश्यकता आहे. वाचनाची आवड निर्माण व्हावी यासाठी ग्रंथालयालात वर्तमान पत्र, विविध ज्ञानार्जनाची पुस्तके, ग्रंथ भावी पिढीच्या हातात पडण्यासाठी त्यांच्या ज्ञानात भर पडण्यासाठी घरोघरी ग्रंथालये उभी राहण्याची आवश्यकता आहे.

**संतोष दत्तू शिंदे, मु.पो.काष्टी, ता.श्रीगोंदा, जि. अहमदनगर, मो.७७२१०४५८४५**

# रशिया-युक्रेन संघर्ष आणखी चिघळणार



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

आधुनिक केसरी

**जो बायडेन यांनी युक्रेन-पोलंड दौऱ्या दरम्यान रशियाला भडकविण्याचे काम करून आगीत तेल ओतले आहे.तर रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी अमेरिकासह नाटो देशांशी दोन-दोन हात करण्याची संपूर्ण तयारी दर्शवली.त्यामुळे विनाशकारी विपरीत बुद्धी अशी परिस्थिती होत असल्याचे दिसून येते.गेल्या एकवर्षभरात रशिया-युक्रेन युध्दात 3 लाख पेक्षा जास्त लोकांचा मृत्यू झाला तरीही रशिया म्हणतो की आम्ही खुन-खराबा चाहत नाही.परंतु संघर्ष सुरूच आहे ही अत्यंत चिंताजनक बाब आहे. रशिया-युक्रेन युध्दाला एक वर्ष होवूनही अमेरिका व रशिया हे दोन्ही बलाढ्य देश एकही पाऊल मागे हटायला तयार नाही.त्यामुळे येणारा काळ जगावर अत्यंत भारी पडु शकतो.जगात एकीकडे भुकंपाने सावट आहेच,तर दुसरीकडे जगावर युद्धजन्य परिस्थितीमुळे तिसऱ्या महायुद्धाचे बादल मंडरावतांना दिसत आहे.त्यामुळे एकंदरीत जग विनाशाच्या दिशेने वाटचाल करीत असल्याचे स्पष्ट दिसून येते.**

याला वेळीच रोखले नाही तर विनाश अटळ आहे हेही कटुसत्य आहे याला नाकारता येत नाही.युक्रेन युद्धाला 24 फेब्रुवारीला एक वर्ष पूर्ण झाली आहे.याच पार्षभुमिवर जो बायडन अचानक सोमवारला युक्रेनची राजधानी कीव्हला पोहोचले.या दौऱ्यात बायडेन यांनी रशियाला कठोर संदेश दिला.यानंतर दिनांक 21 फेब्रुवारीला रोज मंगळवारला पोलंडला भेट दिली. पोलंडमध्ये संबोधन करतांना बायडेनने युक्रेनला संपूर्ण मदत व अत्याधुनिक हतियार देण्याचे जाहीर केले हेही सांगितले की नाटो युक्रेनच्या पाठीशी सदैव उभा राहिल अशी ग्वाही युक्रेनचे अध्यक्ष व्होलोदिमीर झेलेन्स्की यांना दिली.तेव्हा पासुन रशिया -युक्रेन-अमेरीका यांच्यातील संघर्षची ठीणगी आणखी तीव्र होवू शकते याला नाकारता येत नाही.याच पार्षभुमिवर रशिया आगबबुला झाल्याचे दिसून येते.रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन अमेरिकेला इशारा दिला की अण्वस्त्रांचा प्रसार रोखण्याच्या उद्देशाने झालेल्या करारातील आपला सहभाग थांबवत असल्याची घोषणा करून अमेरिकेने अण्वस्त्र चाचणी केली,तर रशियाही मागे रहाणार नाही ही बाब अमेरिकेने लक्षात ठेवावी.युक्रेनमधील युध्दाला एक वर्ष झाल्याच्या पार्श्वभूमीवर पुतिन यांनी मंगळवारी राष्ट्राला संबोधित करताना म्हटले की रशिया अद्याप या करारातून पूर्णपणे माघार घेत नाही.अमेरिकेने पुन्हा अण्वस्त्रांच्या चाचण्या सुरू केल्यास रशियाही तशी तयारी ठेवेल. पुतिनने आपल्या भाषणात अमेरिका व नाटो देशांना सुनावतांना म्हणाले की रशिया-युक्रेन संघर्षात तेल टाकण्याचे काम पाश्चात्यदेश करीत आहे त्यामुळेच हा संघर्ष शिगेला पोहोचला आहे व युक्रेन युद्धाला पाश्चात्य देशच जबाबदार आहेत.रशियाने युक्रेन मधील सैन्य मागे घेण्याचे आंतरराष्ट्रीय आव्हान फेटाळले व रशिया सर्वच आव्हानाला चोख प्रत्युत्तर देण्यास सदैव तयार असल्याचे पुतिनने सांगितले. पुतिन म्हणाले की पाश्चात्य देशांना माहीत आहे की रशियाला युद्धभूमीवर पराभूत करणे अशक्य आहे आणि आमचे सुरू असलेले युद्ध योग्यच आहे. रशिया-युक्रेन युध्दाला एक वर्ष पूर्ण होत असताना प्रत्येक बलाढ्य देश एकामेकांवर ताशेरे ओढतांना दिसत आहे.चीन म्हणतो की रशिया-युक्रेन संघर्ष संपविण्यासाठी आमचा देश भुमिका बजावु इच्छीतो. परंतु पाश्चिमात्य देशांनी ( अमेरिका+नाटो ) युध्दाच्या आगीत तेल ओतण्याचे काम करू नये असे मत चीनचे परराष्ट्रमंत्री चिन गँग यांनी व्यक्त केले.यावरून स्पष्ट होते की युक्रेन-रशियाची संघर्षाची ठिणगी आणखी तीव्र होवून तिसऱ्या महायुद्धाचे रूप धारण करू शकते याला नाकारता येत नाही.कारण युक्रेनच्या बाबतीत अमेरिका-रशिया दोघेही एकमेकांना खुली धमकी देत आहे यामुळे रशिया -युक्रेन युद्ध पुन्हा विक्राळ रूप धारण करून चिघळु शकते.रशियाचा अमेरिकेवर सरळ आरोप आहे की पाश्चिमात्य देशांनीच युक्रेनला युध्दाच्या खाईत लोटले.कारण अमेरिकेचे अध्यक्ष जो बायडेन यांच्या युक्रेन भेटीच्या दुसऱ्या दिवशी व्लादिमीर पुतिन यांनी देशाला संबोधित केले. रशियन संसद क्रेमलिनमध्ये बोलतांना व्लादिमीर पुतिन म्हणाले की आम्ही युद्ध हा शेवटचा पर्याय मानतो.त्यामुळे पाश्चिमात्य देशांनीच युक्रेन युद्ध भडकवीले त्यांचे प्रायश्चित्त त्यांना भोगावेच लागेल



अशाप्रकारे संतापजनक वक्तव्य पुतिन यांनी केले. सध्याच्या परिस्थितीत जो बायडेन यांच्या युक्रेन-पोलंडच्या भेटीने झेलेन्स्की यांचे होसले बुलंद झाले असल्याचे दिसून येते.कारण झेलेन्स्कीच्या कार्याची बायडेन यांनी खुप तारीफ केली.जो बायडेन ने झेलेन्स्कीची शब्दानेच मदत केली नाही तर 50 कोटी डॉलरची मदतही जाहीर केली ही मदत पाच हजार कोटी डॉलरच्या व्यतिरिक्त असल्याचे जाहीर केले. तोफगोळे,रणगाडा विरोधी क्षेपणास्त्रे,रडार आणि इतर अत्याधुनिक उपकरणांच्या स्वरूपात ही मदत असेल असे जाहीर केले.असेही म्हणता येईल की अमेरिकेने युक्रेनच्या बाबतीत रशियाला खुली चुनौती दिल्याचे दिसून येते.कारण जो बायडेन युक्रेन-पोलंड भेटीच्या दरम्यान म्हणतात की युक्रेनला पाठिंबा देण्याच्या मुद्यावर आमच्या मनात कोणताही किंतु-परंतु अजीबात नाही.हे अमेरिकेने युक्रेन भेटीच्या निमित्याने दाखवून दिले.यावरून स्पष्ट होते की बायडेन यांची भुमिका आक्रमक असल्याचे दिसून येते.त्यामुळे युद्ध थांबण्याची चिन्हे अजीबात दिसत नाही.उलट युक्रेन-रशिया संघर्ष तिसऱ्या महायुद्धाची वाटचाल करीत असल्याचे दिसून येते,हेही तीतकेच सत्य आहे की एक वर्षापूर्वी युक्रेनची राजधानी कीव्हवर रशियाच्या सैनिकांनी हल्ला केला.

तेव्हा पश्चिमी देशांच्या नेत्यांनी युक्रेनचे अध्यक्ष व्होलोदिमीर झेलेन्स्की यांच्या जीवाची भीती वाटु लागली.त्यामुळे त्यांना देश सोडून जाण्याचा सल्ला दिला.एवढेच नाही तर अमेरिकेने देखील त्यांना पळून जाण्याचाच मार्ग सांगितला.मात्र झेलेन्स्कीने देश सोडून जाण्याऐवजी संघर्ष करण्याचा निर्धार केला. यातही झेलेन्स्की यांची महानता व देश प्रेम दिसून येते. त्यामुळेच आज झेलेन्स्कीची तुलना विस्टन चर्चिल यांच्याशी तज्ज्ञ ब्रुकिंग्ज इन्स्टिट्यूट, रशियाच्या फियोना हिल यांनी केली आहे.अमेरिका-रशिया-युक्रेन संघर्ष रोखण्यासाठी संयुक्त राष्ट्राने हस्तक्षेप करावा व भारताच्या मदतीने हा संघर्ष ताबडतोब थांबवावा यातच जगाचे व मानव जातीचे कल्याण आहे.सध्या जगाला युध्दाची गरज नसुन पृथ्वी, जीवसृष्टी व मानवजातीला वाचविण्याची गरज आहे यातच सर्वांचे कल्याण होईल.

# हरवलेलं ते आंगण अन् ती...



वैशाली महाडिक
संपर्क क्र. 9767437923

आधुनिक केसरी

**गेले ते दिवस उरल्या फक्त आठवणी. हरवलेल्या एखाद्या क्षणी येतात उफाळूनी. प्रेमातल्या जाणिवेची ती एक आस पुन्हा नव्याने जन्म घेते. अन् उगीचच डोळ्याच्या त्या कडा ओलावून टाकते.  का कोण जाणे! हे आंगण आणि अंगणात वाट पाहणारी ती, तिची आठवण झाली. आणि हरवलेली जवळीक जिव्हारी भिडली. हाताच्या ओंजळीत पाणी घेवून, डोक्यावरच्या पदराचा काठ दोन्ही हातात चोळून तर्जनी आणि मधल्या बोटाच्या साहाय्याने व्यवस्थित डोक्यावर बसवणारी आणि हे सार करताना तिच्या त्या दोन्ही हातातल्या दोन दोन डझन बांगड्या स्मित हास्य केल्यासारखा त्याचा तो खळ खळ आवाज नकळत कानात घुमू लागला.**



ते दोन मोठाले जोते, ती भली मोठी दगडी चौकट पितळेच्या त्या गोल कडया असलेलं ते मोठाच्या मोठं दार आणि दारमागे असलेला आडणा दरवाजात असलेल्या त्या दहा बारा दगडी फरश्या आणि तिथून पुढं असणार शेणाने सारवलेल अंगण आणि त्याच अंगणात डौलाने दिमाखात उभी असलेली ती . टवटवीत तुळस तिच्या भोवतीची ती रांगोळी आणि तिन्ही सांजेला तुळशीत मंद तेवनारी निरांजन आज किती सहजपणे डोळ्यासमोर उभी राहिली. हिवाळ्यात उगवतीच्या दारातून हळुवार सावकाश येऊन उतरलेलं ऊन पहिलं त्याचं जोत्यावर पहिलं यायचं,आणि तिथल्या त्या दोन तीन दगडी पायऱ्यांवर अलवार विसवावयाच मागलदारच्या अंगणातल्या बाभळी च्या पिवल्या फुलांचा नि पानांचा पडलेला हिरवा पिवळा सडा,झाडाच्या बुंध्याजवळ पसरून मागल दाराच्या त्या फोफात्यात लोळत पडल्यासारखा वाटायचा. श्रावणात मावळतीच्या वेळेला एखादी सर कोसळून गेली की कौलारू घरातून निघणारा धूर आणि त्यात काकाच्या घरातला धूर ही त्यात मिसळायचा.आणि एकत्र कुटुंबाचा आनंद देवून अगदी साऱ्या अंगणभर भरुन जायचा. आषाढ संपून गेल्यानंतर श्रावणात कितीतरी दिवसानंतर पडलेलं ते पहिल्या उन्हं ची साक्ष तेच अंगण द्यायच विचित्र पद्धतीत अंगठा आणि करंगली च्या विचित्र पद्धतीत टाळ वाजवत येणारा वासुदेव त्याचा टाळ आणि टाळाच्या सुरात अडकलेलं ते गाणं अंगणातल्या कणा कणात मिसळुन हरवलेल्या क्षणात आजही ऐकायला येते. पोराबलांसाठी दुवा मिळाव्या म्हणून वासुदेव ला सुपातून वाढलेलं धान्य, थंडीच्या दिवसांत येणारा अस्वल वाला ही का कोण जाणे कधीतरी डोळ्यासमोर येतो.

शेणाने सारवल्यांनंतर तुळशवृंदावन भोवती ची रांगोळी आणि रांगोलीतले आणि जीवनातले ते रंग....

उन्हाळ्यात वाड्यातल्या आतल्या अंगणात चुलत्या मा ल त्या सोबत झोपल्यानंतर मागल दारच्या बाभळी मागचा तो मध्यरात्रीचा चंद्र आणि चांदणे त्या प्रेमाची साक्ष देत पहाटेच्या पाराला गायब होऊन जायचा. कधीतरी मधी आधी पडलेल्या चांदण्याच्या प्रकाशात घराच्या पडलेल्या अंगणातल्या त्या विचित्र सावल्या कधीतरी भीती दाखवायच्या आणि कधीतरी खूप हव्याशा वाटायच्या. उन्हाळी पावसात सारवलेल्या अंगणात वळचनी गळून पडलेले खड्डे त्याच्या भोवतालचा शेणाचा तो शेणसडयाच्या खड्डयात आणि चांदण्याच्या त्या विचित्र सावल्यात गुंगलेल बालगोपाल पाहून डोळ्याचं तिच्या पारणं फिटायाचं.


अंगणातल्या कॉटवर लोळत लोळत झालेला तो गोपाळ काला, आकाशातल्या चांदण्यात जणू मिसळून जायचा नी मग माजघरातल्या फोडणीचा आवाज आणि वास साऱ्या आंगण भर दरवळायचा मग बाळ गो पालांच्या पोटातल्या कावळ्याना मग आपोआप भूक लागायची. नि मग तृप्तीने दिलेला ढेकर तिच्या काळजा ला सुखावून टाकायचा.

जत्रेला आलेली आत्या अन् 'वन्स वन्स' चा घुमलेला आवाज, सुगीच्या दिवसात बैलांच्या पायावर ओतलेल पाणी त्याच्या कपाळावरच ते हळदी कुंकू, लावून त्याच्या पाठीवरून फिर लेला सुनेचा तो मायेचा हात आणि बैलाच्या गळ्यातला घुंगराच्या आवाजान भरवलेल आंगण.... पाहून तिच्या आनंद अश्रूंना आलेले उधाण आजही डोळ्यात दिसते. कपिलाच्या दिगूच्या आवाजाने भरुन गेलल ते अंगण आणि हळू हळू दिगू ची ती वळालेली पाऊले....आणि दिगुनंतर कपिलाची हि नकळत नाहीशी झालेली ती सावली... या आणि अशा अनंत आठवणी ...नंतर हवेत विरुन गेलेल्या काही स्मृती.... तिचं भरलेलं गोकुळ प्रत्येक दिवसाची कितीतरी स्मरणे आहेत.ही स्मरण वाट कितीतरी खोल जाते.तिच्या काळजाच्या काळीज कप्प्यात....

भरलेलं गोकुळ काळाच्या ओघात रित होत गेलं ,आठवणीची धूळ मागे ठेवत वाटावाटानीं पांगल,कधीतरी आवसच्या त्या अंधारातल्या चांदण्या सारखं चमचम करीत सय बनून येत तर कधी पूनवच्या त्या चांदण्यात येवून मायेनं अंगाला बिलगत,

पण आज... ?

....जोत्यावर बसून सांगावा धाडलेल ते पाखरू त्या आसक्तरुपी डोळ्यात दूर दूरवर उडताना, जिथं वर नजर पोहचलं तिथं वर उडताना तिला दिसतय.... अशी पाखरे येती, डोळ्यात आनंद ठेवून जाती.



# यात्रा - जत्रांना गतवैभव मिळणारं का ?

आधुनिक केसरी

हलगीचा नाद, कुस्त्यांचे फड, तमाशाची बारी, मिठायांच्या दुकानांची रेलचेल, रात्री छबिना, लेझीमचा ताल, शोभेच्या दारुची आतषबाजी असा साराच जल्लोषाचा अनुभव घ्यायचा असेल तर गावोगावच्या यात्रांशिवाय पर्याय नाही काही ठिकाणी यात्रेला जत्रा असेही म्हणतात जत्रा म्हणजे ग्रामीण लोकपरंपरेचा आणि सांस्कृतिक जीवनाचा एक अविभाज्य भाग. यात्रा साधारणतः पौष-माघ मास आणि नंतर चैत्र पौर्णिमेच्या आसपास सुरू होतात ग्रामीण मातीतले खेळ, दैवते, लोककला, विविध उपयुक्त वस्तूंची दुकाने, वेगवेगळ्या ग्रामीण मिठाया, परंपरा यांचा एकत्र कॅलिडोस्कोप म्हणजेच यात्रा साधारणतः पहिल्या दिवशी देवस्थानी पूजन, मिरवणुका असा कार्यक्रम होतो रात्री छबिना म्हणजेच पालखी निघते. पालखीच्या वेळी आसपासच्या गावांचा काठ्यांचा मान, प्रत्येक गावातील काठीची जंगी मिरवणूक निघते आणि छबिन्यासमोर आल्यावर एका मोठ्या सोहळ्याचा भाग होते. अशा वेळी गुलाल किंवा भंडारा, खोबरे यांची मुक्त उधळण होते. रात्री उशिरापर्यंत हा आनंदसोहळा सुरू असतो. दुसऱ्या दिवशी प्रामुख्याने उरलेल्या लोकांचे देवदर्शन, यात्रेत फेरफटका, घरात लागणाऱ्या वस्तू अशी सारी खरेदी आणि कुस्त्यांचा फड असा भरगच्च कार्यक्रम होतो ग्रामीण भागामध्ये लोकसंपर्काच्या ज्या अनेक पद्धती आहेत त्यापैकी जत्रा ही एक अतिशय महत्त्वाची पद्धती आहे. अशा या जत्रेत लहान मुलांपासून ते वयोवृद्धांपर्यंत सर्व स्तरातील, सर्व जाती-धर्मातील समुदाय या जत्रेत मोठ्या आनंदाने सहभागी होताना दिसतात. या अशा जत्रेतून सामाजिक एकोपा जपला जातो. अनेकांचे संसार ,जीवन अवलंबून असते तसेच सामाजिक,धार्मिक कारणांबरोबरच आर्थिक व व्यावहारीक यात्रेमुळे अनेक छोट्या - मोठया उद्योगधंद्यांना उभारी मिळून मोठी आर्थिक उलाढाल झाल्यामुळे ग्रामीण विकासाला चालना मिळते मात्र सद्या टीव्ही,मोबाईल वरुन सर्व काही उपलब्ध होत असल्याने तसेच विविध प्रकारचे कर, जनावरांची घटती संख्या यामुळे यात्रा, जत्रांना उतरती कळा लागली आहे असे म्हणण्यास वाव आहे मात्र त्यासाठी पुन्हा एकदा ग्रामीण ढंगाचा बाज असणाऱ्या यात्रांना गतवैभव मिळवून देण्यासाठी सर्वांनी प्रामाणिक प्रयत्न करणे गरजेचे आहे तरचं पुन्हा एकदा यात्रा, जत्रांना सोन्याचे दिवस येतील ?

**राजू जाधव, मांगूर जि.बेळगांव**

तुकारामनीती
भाग -४६

# अणुरणीयां थोकडा । तुका आकाशा एवढा ॥



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**काट्यांत राहूनही गुलाब फुलतो, प्रचंड वादळातसुद्धा झाडावर मस्त झोका झुलतो आणि दुर्जानांत राहूनही सद्गुणांनी डुलतो तोच खरा सज्जन! इथेच खऱ्या अर्थाने नवनिर्मिती होते. परिस्थितीच्या मानगुटीवर पाय देऊन स्वतःची ओळख निर्माण करणाऱ्या लोकांच्या पराक्रमाने इतिहासाची पाने तुडुंब भरून वाहताहेत! हाच दैदिप्यमान इतिहास जगाचा नित्य नित्य वाटाड्या म्हणून काम करतोय. भूतकाळातील अनेक सुवर्ण अक्षरांनी ओथंबलेली अलौकिक पाने आणि ती पाने लिहिणारांचे जीवन आणि मने पाहिली असता 'हिऱ्यांची खाण नसते, तर हिरा हा कोळशाच्या खाणीतूनच चमकतो' याची मनोमन अनुभूती आल्याशिवाय रहात नाही! कठीण परिस्थितीत असतांना देखील तमाम मानवाचे कल्याण करणारा अखंड विचारी माणूसच अमरत्व धारण करत असतो! कोणताही प्रसंग असो, त्याविषयी सारासार विचार करून त्या तत्वाचे प्रतिपादन करणे म्हणजे खरा प्रज्ञावंत! याच अनुषंगाने एखाद्या महान साक्षात्कारी माणसांविषयी इसवीसनाच्या पहिल्या शतकातील महान तमिळ संत श्री थिरुवल्लुवर लिहितात, "जो मोहनिर्मुक्त झाला, त्याची दृष्टी निर्मळ झाली. अज्ञानांधकार त्याला घेरत नाही; आनंद त्याच्या जवळ येतो."**

हेच विश्वव्यापक जीवनतत्व ज्यांच्या ज्यांच्या शब्दाशब्दांतून लोकाभिमुख झाले तेच जगाचे मार्गदर्शक झाले, आणि होत राहतील यात तिळमात्र शंका नाही.

सज्जनहो, जवळपास मागील एक वर्षांपासून संत शिरोमणी, वारकरी सांप्रदायाच्या कलशस्थानी विराजमान असलेले महान संत जगद्गुरू श्री संत तुकोबाराय यांच्या गाथ्यातील निवडक अभंगांवर "तुकाराम नीती" लिहितो आहे. तुकोबांसोबतचा हा अक्षरप्रवास मोठा आल्हाददायक आणि आनंदी होत आहे. तुकोबांचा गाथा एक अनमोल खजाना आहे. अगदी संत ज्ञानोबारायांच्या "जो जे वांछिल तो ते लाहो । प्राणिजात ॥" या पसायदानातील अलौकिक ओवीप्रमाणे आहे. गाथा वाचतांना आणि त्यावर चिंतन करतांना प्रत्यक्ष तुकोबांशी आपला सरळ संवाद होतो. तुकोबा आपल्याशी संवाद साधतांना खूप वेळा ताडन करतात, तर अनंतवेळा माय-बाप होऊन पाठीवरून हात देखील फिरवतात, आणि धूसर झालेल्या मार्गावर चालायला प्रवृत्त करतात. आत्तापर्यंत जवळपास एक हजार अभंग वाचून, महाराजांच्या अभंग गाथ्यावरील अनेक महान ग्रंथातून अवलोकन करून अल्पमतीने वर्तमान परिपेक्षात "तुकाराम नीती" या शीर्षकाखाली पुन्हा एकदा चिंतन मांडण्याचा सूक्ष्म प्रयत्न करतोय. मला अभिमान आहे की; अनेक सुज्ञ, तज्ञ, प्रज्ञ वाचकांनी हे सदर वाचून माझ्या लेखांवर प्रतिक्रिया देऊन लिहित्या हाताला बळ दिले आहे. अनेकांनी मार्गदर्शनरुपी आशीर्वादाचे दान माझ्या पदरांत टाकले आहे. निश्चितच तुकोबांमुळे मी हे सर्व काही करू शकलो आणि करणार आहे याचा मनस्वी आनंद आहे! मी धन्य, कृतज्ञ आणि कृतार्थ आहे!

एखाद्या लेखकाला लिहिण्याचे लागलेले वेड त्याला काही केल्या रुकवता येत नाही. खडतर परिस्थितीत सुद्धा तो लिहित रहातो. वेड्याची आणि त्याची अवस्था जवळ जवळ सारखीच झालेली असते, फरक एवढाच की वेड्याला काहींच कळत नाही आणि लेखक मात्र भानावर असतो! तुकोबांना आपल्या अभंग-किर्तनामुळे अनेकवेळा प्रतारणा सहन करावी लागली, प्रसंगी मार खावा लागला, मात्र त्यांचे लेखन-कीर्तन बंद झाले नाही. याचा परिपाक असा झाला की तुकोबांचा संसार दिवाळखोरीत निघाला. तुकोबा कफल्लक झाले. त्यांना हरिनामाच्या हिशोबाशिवाय कोणताही हिशोब जमत नव्हता. यातूनच त्यांचे भामनाथ-भंडारा डोंगरावरील मुक्काम वाढले. त्यांची तहान-भूक हरवली. त्यांचा योगाभ्यास असल्यामुळे तुकोबाराय तासंतास ध्यानस्थ बसू लागले. त्यातूनच "कोंडू कोंडू धरीन जीव । जीवे भावे पूजीन ॥" सारख्या अभंगांची निर्मिती झाली. स्वानंद सुखात रममाण झालेले संत तुकोबाराय उच्च कोटीचा एक एक विचार सहजच बोलायला लागले. त्यांची ब्रह्मानंदी टाळी लागली. या भावविभोर अवस्थेत तूकोबांनी

**अणुरणीयां थोकडा । तुका आकाशा एवढा ॥१ ॥**
**गिळुन सांडिलें कलेवर । भव भ्रमाचा आकार ॥२ ॥**
**सांडिली त्रिपुटी । दीप उजळला घटीं ॥३ ॥**



**तुका म्हणे आतां । उरलो उपकारापुरता ॥४ ॥ (९९३)**

हा अभंग लिहिला असावा. हा अभंग मराठी माणसाच्या दैनंदिन बोलण्याचा, लिहिण्याचा अभंगभाग झालेला आढळून येतो. सूक्ष्म निरीक्षण-परीक्षण केल्यानंतर या अभंगामागील जगद्गुरू तुकोबाराय यांचा विचार आपल्याला कळायला लागेल. महर्षी पतंजली योगसुत्रानुसार माणसाची "योगश्चित्तवृत्तिनिरोधः" अशी अवस्था झाली की माणसाची अवस्था आत्मानंदी स्थिरावते. त्यानंतरच तुकोबांच्या ह्या अभंगाची निर्मिती झाली असावी. माणसाची ही अवस्था अत्यंत महत्वपूर्ण असून प्रमाण, विपर्यय, निद्र, स्मृती आदि अंगाने माणूस एका विशिष्ट अवस्थेत जाऊन पोहोचतो. त्याच अनुषंगाने तुकोबाराय अनुपेक्षाही लहान आणि आकाशापेक्षाही मोठे होतात. अणू तत्वापासून ते आकाश तत्वांपर्यंतचा त्यांचा प्रवास तुकोबाराय या चार चरणात सहज व्यक्त होतात. अभंग लिहायला, वाचायला आणि लक्षांत ठेवायला जरी सहज, सोपा असला तरी त्यावर बारकाईने निरीक्षण नोंदवल्यास सर्वकाही आपल्या लक्षांत येवून जाते. यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान, समाधी आदि अष्टांगमार्ग अंगीकारणे म्हणजे या अभंगाची अनुभूती होऊ शकते. अभंगाचे दुसरे चरण आणखी बरेच काही सांगून जाते. स्वत्व स्वीकारून पूर्णतः टाकून दिले आहे. शरीराची भौतिक अवस्था शून्य केली असून तुकोबांनी ज्ञातृत्व-कर्तृत्व-भोगतृत्व आदि भौतिक अवस्था टाकून देऊन स्वतःतील ईश्वराशी ते एकरूप झाले. तुकोबांची मुमुक्षु अवस्था झाली. त्यांनी आपल्यातील सर्व भ्रम संपवून टाकले. शरीर, मनाच्या सर्वच गुणदोषांच्या पलीकडे तुकोबांची अवस्था झालेली या अभंगात अनुभवायला मिळते आहे. आपल्या भोवतालचे जग सत्य आहे याचा विसर त्यांना पडला असून त्यांचा आत्मदीप जागृत झाला आहे. त्यांची त्रिपुटी पूर्णत्वास गेली आणि "सर्वम खल्विदं जगत" अशी अवस्था झाली. द्रष्टा-दृष्य-दर्शन, ज्ञाता-ज्ञान-ज्ञेय, कर्ता-करण-कार्य, ध्याता-ध्यान-ध्येय आदि सर्वच अवस्थापासून तुकोबाराय मुक्त झाले. याचा परिणाम म्हणजे "दीप उजळला घटी" म्हणजेच महात्मा गौतम बुद्धांनी सांगितलेल्या "अपो दीपो भवः" अशी अवस्था झाली. तुकोबाराय पूर्णतः स्वयंप्रकाशित झाले. त्यामुळे त्यांना कोणताही भेद राहिला नाही. त्यामुळेच तुकोबाराय शेवटी केवळ आणि केवळ उपकारापुरते शिल्लक राहिल्याचे प्रतिपादन करतात.

अभंग सर्वश्रुत आणि सर्वांच्या परिचयाचा आहे, मात्र समजून घ्यायला आणि जीवनात उतरवायला खूपच कष्ट लागतात. तुकोबांची झालेली ही अवस्था म्हणजे एका जपी-तपी-ध्यानी मुनीची अवस्था आहे. संसारात राहून केवळ भजन-कीर्तन-अभंगाच्याद्वारे या अवस्थेला जाणारे तुकोबाराय म्हणूनच वारकरी सांप्रदायाचा आणि समस्त गृहस्थ जीवनाच्या कालशस्थानी विराजमान झाले आहेत. हीच चिंतन-लेखनाची जादू आहे. कोणताही लेखक त्या त्या अवस्थेला पोहोचल्याशिवाय असे वाङ्मय लिहूच शकत नाही. वाचकांना वाचायला आणि बोलायला सहज-सोपे असणारे तुकोबांचे अभंग तोलायला आणि जीवनात अंगीकार करायला मोठे कठीण आहेत. अगदी तुकोबांच्याच भाषेत सांगायचे झाले म्हणजे "बोल बोलता वाटे सोपे । करणी करता टीर कांपे ॥" असे आहे. सांप्रतकाळी तुकाराम नीती अत्यावश्यक वाटते. आज सगळीकडे धावपळ सुरु आहे. जो तो वस्तू, पैसा, संपत्ती जमा करण्याच्या शर्यतीत जिंकण्याचा प्रयत्न करतोय. या स्पर्धेत माणूस खरा आनंद कशात आहे( ? ) हेच विसरून गेला आहे. भौतिक गोष्टी केवळ भौतिक सुख देऊ शकतात, ते सुख क्षणिक आणि तात्पुरते आहे. दुसरीकडे चैतन्य साध्य करणारी साधने आपल्याजवळ असतांना ती आपल्याला माहित नाहीत हे मोठे दुर्दैव म्हणावे लागेल. यासाठी आज माणसाला या अभंगांची नितांत गरज आहे. आपल्या दैनंदिन जीवनात अष्टांगमार्गाचा अवलंब अत्यावश्यक झाला आहे. सर्व सुविधा पायावर लोळण घेत असतांना आज चारपैकी एक माणूस ताणतणाव ग्रस्त, व्याधीग्रस्त आहे. भविष्यासाठी ही मोठी धक्कादायक आणि धोक्याची सूचना आहे. त्यासाठी आपण सर्वांनीच ताणतणाव मुक्त जीवन जगणे ही काळाची गरज बनली आहे. त्याला उत्तम पर्याय म्हणजे आज घराघरात योगा-प्राणायाम ध्यान-सामुहिक प्रार्थना-विश्वशांती प्रार्थना आदि बाबी अत्यावश्यक झाल्या आहेत. संपूर्ण विश्व आनंदी-निरोगी रहावे यासाठी सर्व धर्माच्या लोकांनी एकत्र येऊन सामुहिक शांती-प्रार्थना घेणे काळाची नितांत गरज बनली आहे. असे झाल्यास देशादेशांतर्गत निर्माण झालेले ताण-तणाव कमी होतील, कुठेही युद्ध होणार नाही. पृथ्वीवर सर्व प्राणीमात्र सुरक्षित-आनंदाने राहतील. तमाम विश्व गुण्यागोविंदाने नांदायला लागेल! सर्वत्र "वसुधैव कुटुंबकम" ही संकल्पना रुजली जाईल! माणूस तन-मन-धनाने शांत-समृद्ध होईल! "आनंदाचे डोही आनंद तरंग" ही आनंदायी अवस्था निर्माण होईल! यासाठीच अगदी प्राचीन काळापासून संत-विचारवंत-महापुरुषांनी आपले जीवन खर्ची घातले आहे. तेंव्हा चला सज्जनहो, आपण सर्वजण मिळून संपूर्ण विश्वात तुकोबांच्या या अभंगाद्वारे शांतीचा संदेश देऊयात! संपूर्ण मानवच नाही तर सर्वच प्राणीमात्र सुखाने नांदतील याची प्रार्थना करूयात! असे होणे म्हणजेच खऱ्या अर्थाने संत तुकोबाराय यांच्या या "तुकाराम नीती"चे आकाशभर, सर्वव्यापक, वैश्विक फलित होय आणि खऱ्या अर्थाने "तुका आकाशा एवढा" होईल! जय तुकोबाराय!

# वसुंधरा -भावनांचे प्रतिबिंब

आधुनिक केसरी

**पंचतत्वों को समर्पित ... अशी समर्पण पत्रिका असलेला व सतिश इंदापूरकर यांची समर्पक समिक्षा असलेला आभा प्रकाशनाचा कवी प्रशांत डोळे यांचा " वसुंधरा " हा कविता संग्रह वाचनात आला.प्रशात सर एक हसतमुख व्यक्तिमत्व अगदी पहिल्या भेटीत छाप पडणारे.सेंट्रल बँक ऑफ इंडीयामध्ये उच्च पदावर कार्यरत असूनही अगदी जमीनीवर असलेले. आजची पंन्नाशीची पिढी ही एका विशिष्ट सामाजिक वातावरणात वाढलेली आहे. ब-याच गोष्टींची कमतरता,जेमतेम आर्थिक परिस्थिती अशा अनेक कारणांनी काही स्वप्ने अपुर्ण राहीलेली व त्याची जाणीव असलेली ही पिढी.**

काहींनी परिस्थितीशी जुळवून घेतले तर काहींनी त्यावरही मात केली.पण तरीही एक अस्वस्थता मात्र मनात नक्कीच आहे... अशाच काही विषयांसह हा कविता संग्रह आपल्या समोर येतो.सामान्य परिस्थितितही दुस-यांना नेहमी मदतीचा हात पुढे करणारे कवीचे वडील, त्यांच्याबद्दलच्या कवीच्या मनातील सार्थ अभिमान.तरीसुद्धा एक द्विधा मनस्थितीत कवी चे तारूण्य गेलेले. एका आदर्श समाजसेवकाच्या मुलाने कसे रहावे या उपदेशाचे डोस घेत घेत बहरणारे हे तारूण्य अनेक प्रश्नांनी वेढलेले, काही ईच्छांना मुरड घालत बहरत जाते.




त्यांच्या वडिलांच्या विचारांचा पगडा त्यांच्या पहिल्याच कवितेपासून जाणवत जातो. बिन नावाच्या या कविता आपली उत्सुकता वाढवत जातात. पहिल्याच कवितेत ते म्हणतात

**यें कटते तुटते**
**कराहते वृक्ष**
**धाराशाही होते होते**
**दे जाना कुछ बीज**
**अपने वसुंधरा के लिये**

या भावनेतून त्यांची देण्याची वृत्ती दिसून येते. वेदना,अपार कष्ट, वडीलांचा सेवाभाव,त्यातून येणा-य् समस्या,जगण्याचा दृष्टिकोण , निसर्गाकडे व जीवनाकडे बघण्याची स्वच्छ नजर या सगळ्या गोष्टी या काव्यसंग्रहात आहेत.जीवनाचा अर्थ शोधत शोधत कवी फिरतोय,व्यक्त होतोय आणि नंतर त्याला जाणवते की **सारी दुनिया की खाक**
**छानता हूँ**
**उपर आसमान हैं**
**कभी ध्यान नहीं दिया**
**खिडकीसे मात्र**
**आसमान को ताकता रहता हूँ**

माणसाच्या स्वभावाचे इतके अलगद वर्णन सहजतेने या संग्रहात वाचायला मिळते. घृणा द्वेष,दंद्व,षडयंत्र यांनी भरलेला इतिहास लेखकाला अस्वस्थ करतो.कवीला या सर्वांपासून लांब जायचे आहे.तो म्हणतो, अब वक्त आया है हम लौट चलें अपनी जडोंकी ओर समता और करूण की ओर .... नीडरपणे बेखौप होऊन लढायला त्याला नियतीने शिकवले आहे. त्यांना आता ना भूतकाळात रमायचे आहे ना ही भविष्याची चिंता करायची आहे. हर कोई अनारकली हैं या कवितेत ते बाह्य सौंदर्यापेक्षा अंतरमनाच्या सौंदर्याला महत्व द्यायला शिकवतात. ते म्हणतात आजची अनारकली अजूनही परंपरांमध्ये दाबली गेलेली आहे तसेच पोथ्या वाचत पत्थरांना पुजत स्वतःला दगडी भिंतींमध्ये गाडून घेत आहे.आपले बालपण, शिस्त,मोहणारे निसर्ग सौंदर्य,बाहेरील विशाल संसारासोबतच आतील विशाल संसार या सर्वांना साद घालत असतांना विश्वबंधुता फक्त जातीपातीपुरताच मर्यादित न ठेवता लेखक भिक्षा मागणा-या हातांना, पोचा मारणा-या कोवळ्या हातांना बघून विश्वबंधुता कुठे गेली हा प्रश्न निर्माण करतो. आभा प्रकाशनाने प्रकाशित केलेला हा हिंदी काव्यसंग्रह अनेक विषयांना हात घालत पुढे जात राहतो. कधी मानवी अस्मिता जपतो तर कधी मानवी अस्तित्वालाच कटघ-यात उभा करतो.कवीचा हा पहिलाच संग्रह असला तरी एकदा तरी वाचावा असाच आहे.सेंट्रल बॅंक ऑफ इंडिया ने स्पान्सर केलेला हा संग्रह अजून छान करता आला असता. कवीने ज्या ज्या वेळी जे जे सुचले ते उतरवत जाऊन तारखेसह पुस्तकात नमूद केले.कवितेला नाव असावे की नाही हा वैयक्तिक प्रश्न आहे पण मग अशा कविता नमूद करतांना येणारी अडचण ही एक प्रश्नच आहे.नावात काय आहे असे कितीही म्हटले तरी सर्व काही नावासाठीच आहे. त्यांच्या एका कवितेतील काही ओळी म्हातारपणाची जाणीव करून देतात.

झडते बाल हिलती दाढ
**चर्मराते घुटने**
**सुबह श्याम की टॅबलेट्स**
**याद दिलाती रहती है**
**समय अभी राजी नही है**

वेळेचे महत्व जाणणारा हा कवी आपल्या नव्या जुन्या अनुभवाचे गाठोडे उराशी घेऊन प्रकाशाकडील वाटचालीस निघाला आहे.त्याला माझ्याकडून खूप खूप शुभेच्छा .

**संग्रह - वसुंधरा**
**कवी - प्रशांत डोले**
**प्रकाशन - आभा प्रकाशन औरंगाबाद**
**पाने - ११०, किंमत १८०**
**माधुरी चौधरी औरंगाबाद, ९४२१८६०८७३**

# भूतदयेची शिकवण देणाऱ्या कथा



अस्मिता प्रदीप येंडे
संपर्क 9619035195

आधुनिक केसरी

**मानवाबरोबरच अनेक सजीव आजुबाजुला वावरत असतात. मानवाला विचारशक्ती, बुद्धि, कल्पकता, बोलण्यासाठी भाषेचे माध्यम अवगत आहे, तसे मुक्या जीवांना व्यक्त होता येत नाही. त्यांना काही खायला हवे असेल, काही दुखले - खुपले तर ते सांगू शकत नाहीत. आपल्या विविध कृतीमधुन ते व्यक्त होत असतात. आपल्या आसपास विविध प्राणी आपण पाहतो पण लहानांपासून मोठ्यांपर्यंत प्रत्येकाला कुत्र्याचं पिल्लू आवडते.**

हो ना! ते गोंड्स रूप, सतत आईच्या मागे फिरत राहणं, पी, पी असा आवाज करणं. त्या पिल्लूला हातात घेण्याचा मोह कोणाला आवरत नाही. लहान मुलांना पिल्लूचं जास्त आकर्षण असतं. कुत्रा तसा प्रामाणिक प्राणी होय. त्याला जितकी माया लावू तितकीच माया तो आपल्याला लावतो. कुत्रा हा घराचा राखणदारही असतो. अनोळखी व्यक्ती दिसली की लगेच भुंकून तो आपल्याला सावधान करतो. बऱ्याच जणांना प्राणी पाळण्याची आवड असते, त्यानुसार ते प्राणी पाळतात. त्यांची व्यवस्थित काळजी घेतात. लेखक सुनील पांडे यांनाही लहानपणापासून मांजर, कुत्रा असे प्राणी आवडत असत. पण घरी ओरडतील म्हणून त्यांना घरी न आणता जमेल तसे त्यांना खाऊ घालत आणि आपली हौस जपण्याचा प्रयत्न करत. कुत्र्याविषयी त्यांना पूर्वीपासूनच आकर्षण होते. एकदा गावावरुन घरी येताना लेखकाचे बंधू यांनी आणलेले कुत्र्याचे पिल्लू आणि तिथून सुरु झालेला संपूर्ण प्रवास लेखकाने 'रॉकी आणि टॉमी' या पुस्तकात शब्दबद्ध केला आहे. या पुस्तकात २ दीर्घ श्वानकथा समाविष्ट आहेत. वर्तमान - भूतकाळ - वर्तमान असा प्रवास करणाऱ्या ह्या कथा आहेत. साधी-सोपी लेखनशैली, ओघवती आणि प्रवाही भाषा, प्रथमपुरुषी निवेदन यामुळे कथा वाचताना वाचक त्यात आपोआप गुंतत जातो. लेखकाच्या घरात पाळलेल्या श्वानाचं नाव रॉकी ठेवण्यात आले. रॉकीच्या येण्याने लेखकाच्या जीवनात कसा आनंद पसरतो आणि संपूर्ण घर त्यांच्यात कसे गुंतत जाते, सगळे रॉकीला कसे जीव लावतात, त्याची कशी काळजी घेतात, हे सगळे प्रसंग लेखकाने विस्तृतपणे मांडले आहेत. आपल्याला लहानपणापासून शिकविले जाते, प्राणीमात्रावर दया करावी. पण जसजसे आपण मोठे होतो, हे विसरत जातो. भूतदया हे मूल्य जपणं किती गरजेचे आहे, हे पुस्तक वाचताना जाणवते. मुक्या जीवांना खाऊ घालणे, पाणी देणे या साध्या कृतीतून त्यांच्याप्रति प्रेम व्यक्त होत असते. माणुसकी जपायला हवीच पण मानवाच्या मनी भूतदया रुजली पाहिजे, आपण त्यांना मदत करु शकत नसू तर किमान आपल्यामुळे त्यांना त्रास होणार नाही, याची काळजी आपण घेतली पाहिजे, ही महत्त्वपूर्ण शिकवण या कथांमधून मिळते. रॉकीच्या मृत्युनंतर २२ वर्षांनी टॉमीचं लेखकाच्या आयुष्यात येणं ही घटना विलक्षण वाटते. हळूहळू हा टॉमी घरात सगळ्यांचा लाडका होतो. त्याच्या घरभर वावरण्याने, त्याच्या लीलांनी सगळे घर कसे प्रसन्न होते, घरातील सगळे त्याला आणि टॉमी सगळ्यांना कसा जीव लावतो, याची मनस्पर्शी कहाणी म्हणजे हे पुस्तक. शब्दांवीना निर्माण झालेलं, फक्त स्पर्शातून आणि कृतीतून बहरत गेलेलं प्रेमाचं भावनिक नातं दर्शवणाऱ्या ह्या श्वानकथा मनाचा ठाव घेतात. गंमत म्हणजे यात चित्रेसुद्धा दिलेली आहेत. ती चित्रे रंगवा आणि कथा वाचा. लहानांसोबत मोठेही हे पुस्तक वाचताना त्यात रमून जातील.




**( रॉकी आणि टॉमी -श्वानकथा / लेखक सुनील पांडे / प्रकाशक : स्नेहवर्धन प्रकाशन / मूल्य : १०० रुपये )**

# वाचा.. बोला.. शिका.. टिकवा... मराठी...



दिलीप देशपांडे
मो.नं. ८९९९५६६९१७

आधुनिक केसरी

**साहित्य संमेलने केवळ साहित्यिकांचे अथवा साहित्य प्रेमी लोकांचे संमेलन नव्हे तर महाराष्ट्रातील मराठी भाषिकांचा हा प्राथमिक मेळावा आहे आणि नसेल तर व्हायला हवा असे मला वाटते. संयुक्त महाराष्ट्राची उभारणी भाषेच्या तत्त्वावर झाली आहे. त्या बाबतीत संमेलनाने दाखवलेली जागृती यापुढेही कायम राहायला हवी. इंग्रजीचा आश्रय घेतल्याशिवाय शासकीय व अन्य क्षेत्रातील वरच्या दर्जाचा व्यवहार चांगल्या रीतीने करता येणार नाहीत अशी समजूत कित्येकांच्या मनात रुजून बसली आहे. हा विचार १९६४ मध्ये मडगाव येथे झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून बोलताना "भाषेचा विकास आणि त्याबाबत समस्या" यावर भाष्य केले होते. २७ फेब्रुवारी रोजी आपण मराठी भाषा दिन साजरा करणार आहोत त्यानिमित्ताने हे आठवले.**

२७ फेब्रुवारी, हा मराठीतील जेष्ठ साहित्यिक, ज्ञानपीठ पारितोषिक प्राप्त तात्यासाहेब वि.वा. शिरवाडकर तथा कवि कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस. हा दिवस मराठी भाषा दिन, मराठी भाषा गौरव दिन, जागतिक मराठी भाषा दिवस, असा अनेक नावानेआपण साजरा करत असतो.

मराठी साहित्यात कुसमाग्रजांचे योगदान मोठे आहे. त्यांची ग्रंथसंपदाही खूप मोठी आहे.

१९७४- नटसम्राट साठी साहित्य अकादमीचा पुरस्कार, १९८७- साहित्य क्षेत्रातील सगळ्यात मोठा "ज्ञानपिठ" पुरस्कार, १९९१- "पद्मभूषण"पुरस्कराने गौरव करण्यात आला.भविष्यात नव्या येणाऱ्या पिढीला मराठीचा विसर पडू नये, मराठीचा वारसा पुढे चालावा म्हणूनच मराठी भाषा दिन किंवा मराठी राजभाषा दिवस साजरा करण्याची प्रथा सुरु झाली. गेल्या चार दशकांपूर्वी वि.वा. शिरवाडकर तथा कुसुमाग्रज यांनी मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळावा म्हणून मागणी केली होती. परंतु आपण बघतोय आज पर्यंत त्याची पूर्तता झालेली नाही.

महाराष्ट्रात, तसेच देशभरात जसे म.प्रदेश, कलकत्ता, आंध्रप्रदेश, गुजरात, गोवा, दमण-दीव, कर्नाटक, दिल्ली, ज्या ज्या ठिकाणी मराठी माणसांचा रहिवास आहे.मराठी मंडळे, महाराष्ट्र मंडळे आहेत त्या त्या ठिकाणी मराठी भाषा दिन साजरा केला जातो. काहीशाळा, काँलेजेस, वाच नालयामध्ये, मराठी भाषा दिवस साजरा होतो.त्या निमित्ताने मराठी नाटके, मराठी चित्रपट, निबंध स्पर्धा, कविसंमेलन, वकृत्व स्पर्धेच आयोजन केल जाते. मराठी भाषेचा गौरव केला जाईल असे अनेकविध कार्यक्रम आयोजित करुन आपण मराठी भाषेवरच आपल प्रेम व्यक्त करत असतो. अनेक प्रकाशक आपल्या पुस्तकावर यानिमित्त सवलती जाहीर करून पुस्तक विक्री करीत असतात. पंधराशे वर्षाची परंपरा आपल्या मराठी भाषेला आहे.जगभरातल्या मोठ्या भाषिकांचा बोलणा-यांचा समूह आहेत त्यात मराठीचा पंधरावा नंबर लागतो, तर नऊ कोटी माणसांची मातृभाषा मराठी आहे. अमेरिका, सिंगापूर, इंग्लंड, जर्मनी, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, माँरिशस, आदी ठिकाणच्या देशातही मराठीत बोलले जाते.अनेक ठिकाणी मराठी मंडल, महाराष्ट्र मंडळ आहेत.मराठी सण-वार उत्सव ते मोठ्या उत्साहाने साजरे करत असतात. काही ठिकाणी तर मराठी शाळा काढल्या आहेत. साने गुरुजी, छ.शिवाजी महाराज यांचा परिचय करून देतात. साहित्य संमेलने भरवत असतात.मराठी पुस्तकाची प्रदर्शने भरवतात. आपल्या कडून साहित्यिक, कलाकारांना बोलावले जाते.अनेक ठिकाणी गजानन महाराज, गणपती, दत्तात्रयाची मंदिर आहेत. गणेशोत्सव, गजानन महाराजांचा प्रकट दिन, दत्त जयंती तसेच शिवजयंती उत्सव साजरे केले जातात. व्याख्याने आयोजित करतात.परदेशात राहून मराठी भाषा, सणवार त्यांना सोडावी असे वाटले नाही.आपण मात्र-

***लाभले आम्हांस भाग्य, बोलतो मराठी !***
***जाहलो खरेच धन्य, ऐकतो मराठी !!***

असे म्हणूनच धन्यता मानतो.

पण खरा प्रश्न हा आहे की, अस एक दिवसच फक्त मराठी विषयी प्रेम दाखवून काही साध्य होणार का ? का त्यासाठी आपण व्यक्तिशः काही योगदान देणार ?ह्याचा विचार करणेही महत्वाचे आहे.मी स्वतः मराठी असून मराठीला किती न्याय देतोय हे ही तपासणे गरजेचे आहे.खरं म्हणजे आता आपल्यालाच मराठीचा विसर पडत चाललाय, अनेक ठिकाणी मराठी शाळा बंद पडत असल्याचे वाचतो. जि.प.मराठी शाळांकडे विद्यार्थी संख्या घटते आहे. काही तरी होऊन राहिल आहे.प्रगती साठी इंग्रजी भाषा आम्हाला महत्त्वाची वाटते.प्रगती जरूर करा पण त्यासाठी मराठीचा अव्हेर करु नका.गेल्या काही वर्षात आपली मुलं इंग्रजी माध्यमातून शिकावित हा दृष्टिकोन फारच वाढत चाललाय. त्यामुळेच मुलांवर सुरुवाती पासूनच इंग्रजीत ओळख होत असल्याने मुले आता मराठीत बोलायला अडखळून लागले आहेत. त्यांच्या शिक्षणाची सुरुवातच अ. आ. ई. ऐवजी ए. बी. सी. डी. ममी-पप्पा, माँम-डँड पासून होते.इंग्रजी माध्यम शाळेत मुलं शिकतात ही आई वडिलांना प्रतिष्ठेची गोष्ट वाटू लागली आहे.आणि हीच मराठी साठी धोक्याची घंटा आहे, म्हटल्यास खोटे ठरणार नाही.येणारी पिढीच जर मराठीचा वारसा जपणार नसेल तर कसे होणार. आज ग्रामीण भागातील मराठी शाळांची काय दशा आहेत हे आपण बघतोच आहे. जो तो आपल्या मुलांना इंग्लिश मीडियम शाळांमध्ये टाकण्यासाठी आग्रही आहेत. त्यामुळे मराठी शाळा बंद पडतात काय अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. हाच विचार नाशिक येथील साहित्य संमेलनाचे समारोपाची वेळी न्यायमूर्ती नरेंद्र चपळगावकर यांनी त्यांच्या भाषणात प्रामुख्याने मांडला होता. दैनंदिन वापरात अजूनही आपण इंग्रजीलाच प्राधान्य देतो.साध उदाहरण घ्या, रोज आपण मोबाईलचा वापर करतो, किती जणांचे की बोर्ड मराठी आहे ? किती जण मोबाईल वर वाँट्सापवर संवाद साधण्यासाठी मराठीचा वापर करतात.



मेसेज पाठवतो ते ही इंग्रजीतच काय तर मराठीत कठीण वाटतं म्हणे!.फोन वर बोलताना सुरूवात हँलो.. हँलो.. ने, नमस्कार म्हणून फारच कमी लोक बोलतात. घरातून बाहेर पडणारे मुलं-मुली निघताना येतो ग आई येतो बाबा असे म्हणून बाहेर पडतात पण रिक्षा टँक्सी करताना, त्याच्याशी बोलताना सरळ सरळ हिंदी चा वापर करतात, ती तोडकीमोडकी का असेना. काय म्हणतो आपण भैय्या शिवाजी नगर जानेका है, डेक्कन जानाहै, भैय्या कोथरूड जाना है, इधर जाना है उधर जाना है असे पण. तो रिक्षा-टँक्सीवाला मराठीत संवाद साधत तुमच्याशी बोलतो. बसा न दादा, ताई सोडतो तुम्हाला, मी मराठीच आहे, मराठीत बोललं तरी चालेल. तो मराठीला धरुन आहे, तुम्हीच मराठी सोडतात. मराठीत बोलायला आपल्याला लाज का वाटावी हेच समजत नाही.

छोट्या छोट्या गोष्टीतून आपण खूप काही करु शकतो.काय करु शकतो, मराठीत खूप मोठी साहित्य संपदा आहे.वि.स.खांडेकर, कुसुमाग्रज, पु.ल.देशपांडे, म.फुले, बाबासाहेब आंबेडकर, स्वा.वीर सावरकर, बाबासाहेब पुरंदरे, ना.स.इनामदार, शिवाजी सावंत, आदि अनेक साहित्यिकांचे, साहित्य आहे.ते वाचा. अनेक साहित्यिकाचे कथा, कादंबऱ्या, काव्यसंपदा, ललितसाहित्य, चरित्रे आत्मचरित्रे आहेत ते वाचा. शिवचरित्र वाचा .दासबोध वाचा, तुकारामगाथा वा चा, अमृतानुभव, भावार्थदिपीका, योगवशिष्ठ वाचा. वर्षात हजारांचे संख्येने पुस्तके, शेकडो दिवाळी अंक प्रसिद्ध होतात.यातले आपण किती वाचतो. वर्तमानपत्र किती जण वाचता ? कुठल्या वाचनाला प्राधान्य देतो.वर्षभरात मराठीतल काही वाचण्याचा संकल्प करा.किमान पाच सात पुस्तके वाचा.वाचून जवळच्याला प्रवृत्त करा.काही चांगले ग्रंथ खरेदी करा. वाढदिवसाला, लग्न समारंभात पुस्तकांची भेट द्या. इंग्रजी माध्यमातून मुलाच्या शिक्षण असेल तरी त्यांना मराठीपासून तोडू नका. त्यांना मराठीतली चांगली चांगली पुस्तके वाचायला द्या, त्याच्यामध्ये आवड निर्माण करा. शाळा, काँलेजेस, वाचनालये, यातूनही कार्यक्रमाचे आयोजन व्हावे, जेणे करुन वाचक-विद्यार्थी- मराठीशी जोडला राहील. मराठी भाषेची जपणूक, संवर्धन, म्हणजे काय डोंगर, पहाड, चढणे आहे का ?.अशा छोट्या छोट्या गोष्टीतून, आपल्या कृतीतूनच ते होत असते. जे तुम्ही, आम्ही, सर्वांनी मिळून करायचे आहे. संस्कार कृतीतून होतात. आपल्या हातात मोबाईल पाहून मुलगा मोबाईल मागत असेल तर तुम्ही हातात पुस्तक घ्या, ते नक्कीच पुस्तक मागतील. निरनिराळ्या कार्यालयात कार्यालयीन कामकाज मराठीत व्हावे म्हणून शासनाने निर्णय घेतले आहे. सक्तीचे केले आहे.पण त्यातही प्रगती नाही.संपूर्ण महाराष्ट्रात सर्वच ठिकाणच्या पाट्या मराठीतच हव्यात हा आग्रह धरला पाहिजे.ज्याला महाराष्ट्रात रहिवास करावयाचा त्याला मराठी भाषा अवगत असावी.मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळण्यासाठी प्रयत्न सुरु आहे.महाराष्ट्र सरकारने रंगनाथ पठारे यांच्या अध्यक्षते खाली नेमलेल्या समितीने अहवाल केन्द्र सरकार कडे पाठवला आहे. त्याचा पाठपुरावा सुरू आहे. महाराष्ट्रातून सव्वा कोटीच्या जवळपास पोस्टकार्ड मराठीला अभिजात दर्जा द्यावा म्हणून पाठवले गेले आहेत. अभिजात दर्जा साठीची सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्याचे आपण वृत्तपत्रात वाचले आहे. हा दर्जा ज्या भाषेला दिला जातो त्या भाषेच्या सर्वांगीण विकासासाठी केन्द्र सरकार कडून राज्याला भरीव अनुदान मिळते ते मराठीला मिळाला हवे.

कोणत्याही भाषेचे संगोपन होण्यासाठी तिचा वापर ज्ञानभाषा म्हणून ज्ञान संवर्धना साठी होणे आवश्यक आहे. आणि ज्ञानावर आधारित सर्व क्षेत्रांमध्ये मराठी भाषेचा वापर करण्यासाठी मराठी ही ज्ञानभाषा करण्यासाठी राज्य सरकार वचनाबद्ध असल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वर्धा येथील साहित्य संमेलनात बोलले आहे. ज्ञानभाषा म्हणजे जी विज्ञान तंत्रज्ञान शिक्षण आणि विशेषतः उच्च शिक्षण मूलभूत संशोधन उद्योग वाणिज्य विधी व न्याय प्रशासन आधी प्रगतव्यवहार क्षेत्रात पूर्ण क्षमतेने व गुणवत्ता पूर्ण रितीने समाजातील सर्व घटकांकडून ती वापरली जाते, तसेच बुद्धीवर्ग आपल्या क्षेत्रातील विचार मंथनासाठी तिचा वापर करतो अशी भाषा. मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळण्यासाठी ती ज्ञानभाषा होणे आवश्यक आहे असे वाटते, कारण माझ्या असे वाचण्यात आले आहे की अभिजात दर्जा मिळण्यासाठी ती भाषा आधी ज्ञानभाषा असावी लागते. तेव्हा आता बघू मराठीला अभिजात दर्जा कधी मिळतो आहे आणि मराठी ज्ञानभाषा करणे साठी सरकार किती वचनबद्ध आहे. आतापर्यंत तामिळ, संस्कृत, तेलगू, कन्नड, मल्याळम आणि ओडिया, या सहा भाषांना अभिजीत भाषेचा दर्जा दिलेला आहे.



# बारावी उत्तरपत्रिका तपासणीवर पुन्हा एकदा 'बहिष्कारा'चे अस्त्र!





डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**बारावी उत्तरपत्रिका तपासणीवर शिक्षकांनी पुन्हा एकदा बहिष्कार टाकला आहे. गेल्या अनेक वर्षांपासून कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्य कर्मचाऱ्यांच्या मागण्या प्रलंबित ठेवण्यात आल्या आहेत. त्यामुळे आता या मागण्यांसाठी शिक्षक कर्मचाऱ्यांनी मोठं पाऊल उचलण्याचा निर्णय घेतला आहे. मागण्या पूर्ण न केल्यास -बारावी परीक्षांच्या कामावर बहिष्कार टाकला जाईल असा इशारा संघटनेने आधीच दिला होता.कर्मचाऱ्यांच्या मागण्यांकडे राज्य सरकारने दुर्लक्ष केल्यामुळे राज्यातील शिक्षकांनी बारावीच्या परीक्षांच्या कामकाजावर बहिष्कार टाकण्याचं जाहीर केलं आहे.**

याचा थेट परिणाम बारावी परीक्षेच्या मूल्यांकनावर होत असल्याने विद्यार्थ्यांचे निकाल परत एकदा लांबणार की काय अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.
राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या समस्या दीर्घकाळ प्रलंबित असून शिक्षक त्रस्त झाले आहेत.
विविध मागण्यांच्या पूर्ततेबाबत ५ सप्टेंबरला शिक्षक दिनी राज्यातील सर्व जिल्ह्यांत कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांनी काळ्या फिती लावून आंदोलन केले.
त्याची दखल शासनाने न घेतल्यामुळे पुन्हा एकदा आंदोलनाचा पवित्रा घेऊन संघटनेने जिल्हा परिषदेत शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांना निवेदन दिले होते.
मात्र सरकार शिक्षकांच्या मागण्यांबाबत फारशी गंभीर असल्याने पुन्हा एकदा बहिष्काराचे अस्त्र शिक्षकांना उगारावे लागले.
या पार्श्भूमीवर शिक्षकांनी मूल्यांकनावर बहिष्कार टाकल्याने नियामकांची बैठकही होत नसल्याने तपासणीकांसाठीच्या प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिकांचे पाकिटे शिक्षण मंडळ कार्यालयात पडून आहेत. गुरुवारीही नियामकांची बैठक झाली नाही. आणि नियामकांनी प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिकेचे पाकिट स्विकारले नाहीत.
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे बारावी परीक्षा २१ फेब्रुवारीपासून सुरू आहेत.
बारावी उत्तरपत्रिका तपासणीवर शिक्षकांनी बहिष्कार टाकला आहे. त्यामुळे तपासणीची प्रक्रिया सुरू होऊ शकलेली नाही. प्रक्रिया २२ फेब्रुवारीपासून सुरू होणे अपेक्षित होते. परंतु तिसऱ्या दिवशीही नियामकांनी त्यांना मिळणाऱ्या प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिकांचे पाकिटे स्विकारली नाहीत. जुनी पेन्शन योजना लागू करावी, सेवानिवृत्तांना तिचा लाभ द्यावा. शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे १०, २०, ३० वर्षांची आश्वासित प्रगती योजना लागू करावी. निवडश्रेणीसाठीची २० टक्क्यांची अट रद्द करावी. वाढीव पदांना रुजू दिनांकापासून मंजुरी द्यावी. माहिती तंत्रज्ञान विषय अनुदानित करावा. महाविद्यालयांना प्रचलित अनुदानसूत्र लागू करावे. अनुदानासाठीच्या जाचक अटी रद्द कराव्यात. विनाअनुदानितकडून अनुदानितमध्ये बदलीला स्थगिती रद्द करावी. रिक्त पदेत भरावीत.कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थी पटसंख्येचे निकष शाळा संहितेनुसार असावेत. निवृत्तीचे वय ६० वर्षे करावे. उपप्राचार्यांना पदोन्नतीची वेतनवाढ मिळावी, अर्धवेळ शिक्षक पूर्णवेळ झाल्यावर, त्यांच्या अर्धवेळ सेवेचा कालावधी वेतनवाढ व इतर लाभासाठी ग्राह्य धरावा.





## गाडगे महाराज

महाराष्ट्राच्या मातीत..
जन्म गाडगेबाबांचा झाला...
आंधळ्या पांगळ्यांचा कैवारी
या भुमीवर अवतरला..
हाती घेऊन खराटा दिले
प्राधान्य ग्रामस्वच्छतेला..
हद्दपार केले गावागावातून
साथीच्या रोगराईला..
वारेमाप खर्च टाळा,
करा आयोजन सामुदायिक
विवाह सोहळ्याचे..
करू पालन बाबांच्या या
दिव्य संदेशाचे..
संत गाडगेबाबांचे नाव दिले..
अमरावती विद्यापीठ व
ग्रामस्वच्छता अभियानाला..
२३ फेब्रुवारी १८७६ महाशिवरात्री
या महापर्वावर आला दिव्यपुरुष
जन्माला..
मानवता धर्म वाढवा..
देव रंजल्या गांजल्यात पहावा..
दिला मानवतेचा धर्म सर्व
विश्वाला..
गोपाला गोपाला देवकीनंदन
गोपाला...
कवी-रवी दगू सगर
शिंगवे ता निफाड.जि.नाशिक

## मराठी दिनी ..

मराठी दिनी आठवे
माझी मराठी माय
दाटून येतो उमाळा
स्निग्ध दूधावर साय

मिळेल तिथे तेधवा
तिचे किती गुणगाय
खाजगीत बोलेमात्र
नसे इंग्रजीले पर्याय

भाजी भाकर विसरे
पिझ्झा बर्गर खाय
न्युइअरला थिरकतो
गळ्यां लोढणे टाय

'नेम प्लेट' इंग्रजीत
कशी विसरतो आय
मुले आमची हुशार
कॉन्व्हेंट मध्ये जाय

ओळखीचे भेटताचं
का करी हॅलो हाय
खेकडे होई आम्ही
ओढतो तिचेचं पाय

- हेमंत मुसरीफ पुणे.
9730306996.



## माझी शाळा...



तुला सांगु किती वेळा
माझी शाळा माझी शाळा
प्रेमळ कडक आमचे गुरूजी
आम्ही शिकतो राखून मर्जी
पांढरा खडू अन् काळा फळा...
राष्ट्रगीत अन वंदे मातरम्
रांगेत उभे सावधान विश्रम
जय हिंद म्हणतो तीन वेळा...
आवडते विषय मराठी हिंदी
काना मात्रा उकार बिंदी
इंग्रजी ला भिऊ नको बाळा...
खेळाचा तास खो खो कबड्डी
लांब उडी अन् उंच उडी
शिट्टी वाजताच मैदानात गोळा...
स्वच्छ गणवेश बूट मोजे
दफ्तर आमचे नाही ओझे
आम्ही शिकलो नियम पाळा...
बलराज संघई

## सह्याद्रीच्या कुशीत



सह्याद्रीच्या कुशीत जन्मले, बाळ शिवाजी राजे
नभा नभातून दऱ्या दऱ्यातून जगभर किर्ती गाजे

कडे कपारी रानोमाळी बछड्यांनाही धीर यावा
ईथे जन्मला शिवबाचा हा असा गनिमी कावा

दिशा दिशांना साद घालूनी रक्ताभिषेक व्हावा
रक्त सांडले ईथे मऱ्हाठी मानाचा मुजरा व्हावा

गड कोट हे दर्शविती, इतिहास ईथे शौर्याचा
उरी फडकतो भगवा अपुला असिम या धैर्याचा

शिवनेरी वा असो रायगड शान महाराष्ट्राची
निधडी छाती जोर मनगटी ओळख ही राष्ट्राची

गड किल्ल्यांची रत्न मालिका माळ सह्याद्रीची
उठुन दिसते नभो मंडपी रत्न माळ सृष्टीची

सह्याद्रीच्या कुशीत जन्मले शूर मराठे वीर
ढाली तलवारीच्या संगे खेळ मांडती दूर

रक्तांनी माखली ईथे ही शिखरे सह्याद्रीची
कितीक विधवा ईथे जाहल्या घेऊनी शपथ स्वराज्याची

रक्त सांडले शूरवीरांचे इतिहास घडविण्यासाठी
पोलादी मनगटे पेटली महाराष्ट्र जगविण्यासाठी

गनिमांपासूनी रक्षण केले ह्याच सह्याद्रीने
कुशीत घेऊनी प्रेमही दिधले ह्याच सह्याद्रिने..

जयेश अ.माधव

## जय विज्ञान

विज्ञानाने दाखविली
नवी समृद्धीची वाट
घराघरात दिसतो
त्याचा किती थाट

स्वयंपाक खोलीत सदा
मिक्सरचेच राज्य
हवा तो पदार्थ
बारीक करण्यास सज्ज

इंटरनेट देतो आपणास
माहिती व ज्ञान
दडलीय त्यात
अफाट ज्ञानाची खाण

घड्याळातील काटे
रात्रंदिवस फिरतात
वेळेची महती
सर्वांना पटवून देतात

फ्रिजमधील पाणी
पितांना
वाटे खूप मजा
माठाला मिळाली
कायमची रजा

नको आता अंधश्रद्धा
नको आता अज्ञान
नव्या युगाचा नारा
जय विज्ञान

- रवींद्र व्ही. चालीकवार
मु.पो.ता.महागाव
जि. यवतमाळ
मो.9011559106

## माय मराठी

बहु बोलीलो बोली परी
भावली मज मायबोली
किती
देणे लागतो लेणे लेवतो
ऋण तुझे अपार किती

वदे संतवाणी तव रूपी
पावन जाहली ही भूमी
सुराज्य मराठी
स्वाभिमान
गाथा इथली अगाध ही

आई प्रथम उच्चारले मी
माये तुझेच हे वरदान
संस्कार मराठी लाभले
केवढे हे भाग्य महान

विसर ना पडो तूझा कधी
हेच मागणे माये
तुजपाशी
असो कुठे विश्वात ह्या
मी
मरण मराठीच येवो
मजसी

- प्राजक्ता मनवेलीकर

## ||उठी उठी लडिवाळा||



सोडी अंथरूण पांघरूणाला||
पुर्व दिशेलाही तांबडं खुललं|
वासरमणि हा वरि आला||
वाऱ्या संगे तयाची मैत्री बघुनि|
फुले लागली उमलायला||
ताई दादा आजी बाबा काका|
मुखमार्जन करोनि लागले कामाला||
बाबांची देवपुजा संपली|
अन संपली आजीची भुपाळी||
पांखरेही उडाली रानाकडे|
आरतीही संपली राऊळी।।
सडासंमार्जन करोनि|
माऊलीने रेखाटली रांगोळी||
दादाताईचा गृहपाठ जाहला|
लगबग सुरू झाली शाळेची||
भाऊ भाऊ सोन्यासोन्या म्हणुनि।
माऊलीची लकेर सुरूआर्जवाची||
उठ उठ राजसा बघ प्रभात जाहली|
पुर्व दिशाही आरक्त जाहली||
कलश दुधाचा हाती घेऊनी|
विनवत उभी राहिली माऊली||
लडिवाळ उठे जांभई देऊनि|
आईची बघा कळी खुलली||

रचनाकार: वा. र. आहेर
नासिक 9988785982

## खरच तुझ्याकडे वेळ नाही का ?

तू लहान असताना आमच्या शिवाय
राहत नव्हतास एवढ्यात तुला
काय झाले रे..? आमची आठवण
येत नाही का तुला असा, कसा
विसरलास आईबाबाला खरच
तुझ्याकडे थोडाही वेळ नाही का. .?
की, मुळात वेळ काढत नाही
तुझी आठवण येते रे लेकरा
डोळ्यातून वाहतात अश्रूंच्या धारा
आज येशील, उद्या येशील म्हणून
दररोज आम्ही वाट बघत असतो
तुझा पत्ताच लागत नाही एवढ्यात
तुझी काळजी असतो मनात
आम्ही आहोत तुझे जन्मदाते
असा, कसा विसरून गेलास
झोप येत नाही रे डोळ्याला
डोळे लाग रे तुझ्या वाटेला
सौ. संगीता संतोष ठलाल
मु. कुरखेडा जि. गडचिरोली
७८२१८१६४८५

## छत्रपती संभाजीनगराचे..

माझ्या संभाजीनगराचे गाऊ किती गुणगान
वेरूळ अजिंठया संगे लेणी पितळखोरा छान.
माझ्या पावन भूमीत,नररत्न जन्म घेई
ज्ञानदेव नाथबाबा शंकर स्वामी बहिणाबाई.
दक्षिण काशी प्रतिष्ठान पैठणीची शोभे माय
भरण्या नाथाघरी पाणी श्रीखंड्याचे धावे पाय.
रेड्यामुखी बोलविला इथं माउलींनी वेद
गोदेतीरी नाथबाबा गाडू पाहे सारा भेद.
अभेदय जगी एक किल्ला देवगिरी शान
कला संस्कृती सोबत मायमातीचा सन्मान.
तीर्थक्षेत्री वेरुळात छत्रपतींचे माहेर
साऱ्या तीर्थाहून श्रेष्ठ ज्योतिर्लिंग घृष्णेश्वर.
इथं उत्तरेला सोयगाव,नाट्य परंपरा थोर
गोड अहिराणी बोलीनं,सारं नटलं शिवार.
पदस्पर्शाने संतांच्या,पावे भूमी वैजापूर
गोदेतिरी सरलाबेटी,म्हाइंभट चरित्रकार.
पुण्यभूमी शिवूरात बहिणाबाईचे अभंग
वारकरी मायबाप रोज भजनात दंग..
कन्नडला गौताळयात,किल्ला पेडक्या अंतुर
काळीभुई घाटमाथा,स्वर्ग दोन बोटे दूर.
इथं गंगापूर पैठणात, गोदावरी नित्य वाहते
पाप जनामनाचे धुवून, सागरास भेट देते.
छत्रपती नगरात बामु विद्यापीठ स्थापिलं
व्हावा विद्यार्थी मिलिंद स्वप्नं भीमानं पाहिलं.
इथं दक्खनचा ताज उभा छान दिमाखात
शोभे दरवाजे बावन्न ऐतिहासिक नगरात.
रत्नपुरी भद्रादेव पावे म्हसोबा सिल्लोडात
जनार्धने उभारीला आश्रम शांतीचा वेरूळात.
ज्ञानेश्वर गायके.कन्नड
जि.छत्रपती संभाजीनगर

## मराठीची थोरवी

शब्दांच्या समृद्धीने
माय मराठी नटतें
तिज लिहीता -वाचता
मज धन्यता वाटतें
ज्ञानेशांनी ही गायीली
थोरवी माय मराठीची
अमृताशी पैजा जिंके
अशी लौकीकता जिची
साऱ्या संतांनीही दिले
तिला दान अभंगाचे
किर्तनातूनिया केले
प्रबोधन या समाजाचे
बहिणाबाईंची कविता
जणू बावणकशी सोनं
माय मराठीला दिलं
तिने लावण्याचं लेणं
कित्येकांनी फुलविला
तिचा शब्दांनी हो मळा
वर्षानुवर्षे चालो तिचा
हा कौतुक सोहळा
शब्दप्रभू हे अर्पिति
तिला साहित्याचा साजं
साऱ्या बोलींचा भासते
माय मराठी ही ताजं
एका शब्दासाठी येती
कितीतरी शब्द पुढे
शब्दा शब्दांनीच रंग
तिच्या लावण्याचा चढे
शिवरायांची ही बोली
ही बोली जिजाऊंची
राहो फडकत नभी
पताका तिच्या वैभवाची
पताका तिच्या वैभवाची...

सौ. शारदा श्रीकृष्ण वानखेडे-
चोपडे परभणी.



## स्वामी तिन्ही जगाचा आई विना भिकारी

देव्हाऱ्याची दैवी मुर्ती
साक्षात भगवती स्वरुप किर्ती
तिन्ही लोका वंशी झेंडा
कळस आईविना निकामी
स्वामी तिन्ही जगाचा
आई विना भिकारी
जन्माची देणं जिच्या उदराला
वंशाच फुल तीच्या वेलीला
तिच्या रक्ताच पाणी होऊन होई
पाण्याच दुध असे अनंत विकार
विनाशक वरदान
माय, माऊली, जननी
साऱ्या विश्वाची सावली
स्वामी तिन्ही जगाचा
आई विना भिकारी
-लक्ष्मण वाल्डे-कन्नड



# स्वातंत्र्यवीर सावरकर पुण्यतिथीनिमित्त



भारत आसाराम बल्हाळ
मो.नं 7588819471

आधुनिक केसरी

**विनायक दामोदर सावरकर यांचा जन्म २८ मे १८८३ साली - नाशिक जिल्ह्यात भगूर या ठिकाणी झाला. हे भारतीय स्वातंत्र्यसैनिक, राजकारणी, समाजसुधारक, मराठी कवी व लेखक होते. तसेच ते हिंदू तत्त्वज्ञ, आणि भाषाशुद्धी व लिपिशुद्धी ह्या चळवळींचे प्रणेते होते. १९३८ च्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होते. 'हिंदुत्व' या संकल्पनेचे प्रणेते असून सर्वसमावेशक हिंदुत्व मांडणारे होते. भाषाशुद्धीचा आग्रह धरून सावरकरांनी मराठी भाषेला ४५ शब्द दिले आहेत. विनायक दामोदर सावरकर हे भारतीय स्वातंत्र्यसैनिक, राजकारणी, समाजसुधारक, मराठी कवी व लेखक होते. तसेच ते हिंदू तत्त्वज्ञ, आणि भाषाशुद्धी व लिपिशुद्धी ह्या चळवळींचे प्रणेते होते. १९३८ च्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होते.**

सावरकरांचा जन्म नाशिक जिल्ह्यातील भगूर ह्या शहरात झाला. त्यांचे वडील दामोदरपंत सावरकरांच्या तीन अपत्यांपैकी हे दुसरे होते. वि.दा. सावरकरांना बाबाराव हे मोठे आणि नारायणराव सावरकर हे धाकटे भाऊ होते. सावरकरांची आई, ते नऊ वर्षांचे असताना वारली. थोरल्या बंधूंच्या पत्नी येसूवहिनी यांनी त्यांचा सांभाळ केला. सावरकरांचे वडील इ.स. १८९९च्या प्लेगला बळी पडले. सावरकरांचे प्राथमिक शिक्षण नाशिकच्या शिवाजी विद्यालयामध्ये झाले. ते लहानपणापासूनच अत्यंत बुद्धिमान होते. वक्तृत्व, काव्यरचना ह्यांवर त्यांचे प्रभुत्व होते. जिव्हा आणि लेखणी ते सारख्याच ताकदीने चालवत. त्यांनी वयाच्या तेराव्या वर्षी लिहिलेला स्वदेशीचा फटका, स्वतंत्रतेचे स्तोत्र ह्या रचना त्यांच्या प्रतिभेची साक्ष देतात. चाफेकर बंधूंना फाशी दिल्याचे वृत्त समजताच लहानग्या सावरकरांनी आपली कुलदेवता भगवती हिच्यापुढे "देशाच्या स्वातंत्र्यासाठी सशस्त्र क्रांतीचा केतू उभारून मारिता मारिता मरेतो झुंजेन" अशी शपथ घेतली.

**सावरकरांचा विवाह :** मार्च, इ.स. १९०१ मध्ये विनायकराव यमुनाबाई यांच्याशी विवाहबद्ध झाले. लग्नानंतर इ.स. १९०२ साली फर्ग्युसन महाविद्यालयात प्रवेश घेतला व इ.स. १९०६ साली उच्च शिक्षणासाठी लंडनला गेले.


**सावरकरांचे सामाजिक कार्य व सेवा :** ६ जानेवारी १९२४ रोजी अंदमानातून सुटल्यानंतर सावरकरांना ब्रिटिशांनी रत्नागिरीत स्थानबद्ध केले.. हिंदू समाज एकजीव आणि संघटित करण्यासाठी सावरकरांनी रत्नागिरीत राहून कार्य केले. नोव्हेंबर १९३० हिंदू समाजाच्या अधःपतनाला जातिव्यवस्था, चातुर्वर्ण्य जबाबदार आहे, हे सावरकरांनी लक्षात घेऊन त्या विरोधात काम केले. हिंदू धर्मात जातिव्यवस्थेचे, विषमतेचे समर्थन आहे. त्यामुळेच हिंदूसंघटन करण्यासाठी सावरकरांनी धर्मचिकित्सेची तलवार उपसली. आपल्या लेखनाने कोणी सनातनी दुखावेल याची चिंता न करता अंधश्रद्धा, जातिभेद यांवर त्यांनी कडाडून टीका केली. स्वकीयांतील जातीयतेवरपण निर्भीड टीका केली. त्यांनी रत्नागिरीमधील वास्तव्यामध्ये अनेक समाजसुधारणा केल्या. जवळपास ५०० मंदिरे अस्पृश्यांसाठी खुली केली. अनेक आंतरजातीय विवाह लावले. अनेक सहभोजने आयोजित केली. त्यांनंतर सर्वांसाठी 'पतित पावन मंदिर' सुरू केले व सर्वांसाठी सामाईक भोजनालयही सुरू केले. जातिभेद तोडण्यासाठी सहभोजनाचा धडाका उडवून दिला. रत्नागिरी येथे त्यांनी पतितपावन मंदिर स्थापन केले. या मंदिरात सर्व जातींच्या लोकांना प्रवेश दिला. सुमारे १५ आंतरजातीय विवाहही त्यांनी लावून दिले.

रत्नागिरीत सावरकर सुमारे १३ वर्षे स्थानबद्धतेत होते. इ.स. १९३७ पासून सुमारे सात वर्षे, सावरकरांनी हिंदू महासभेचे अध्यक्षपद भूषविले. झंझावाती दौरे, मोठ्यामोठ्या सभा, हिंदूंची सैन्यभरती, रॉयल क्लब्सची स्थापना अशा अनेक मार्गांनी त्यांनी हिंदू महासभेचे कार्य केले. त्यांनी आधुनिक विचारधारेप्रमाणे बुद्धिवाद व विज्ञाननिष्ठा यांची कास धरून हिंदू धर्मात सुधारणा करण्यासाठी लढा दिला.

एक क्रांतिकारक, ज्वलंत साहित्यिक ( महाकवी ), समाजसुधारक, हिंदू संघटक या पैलूंसह स्वातंत्र्यवीर सावरकरांनी भारतीय समाज ढवळून काढला, स्वातंत्र्यलढ्यात अभूतपूर्व योगदान दिले. फाळणीला व तत्कालीन काँग्रेसच्या धोरणांना त्यांनी प्रखर विरोध केला. स्वातंत्र्यानंतरही त्यांनी सीमांची सुरक्षा, सैनिकांची संख्या वाढवणे, शस्त्रसज्जता अशा अनेक विषयांचा आग्रह त्यांनी धरला.

**जातीभेद न मानणारे सावरकरः-**

जातिव्यवस्था मोडण्यासाठी त्यांनी सात बेड्या मोडायला हव्यात हे सांगितले. त्या लेखात ते म्हणतात, पोथीजात



जातिभेद हा मनाचा रोग आहे. मनाने तो मानला नाही की झटकन बरा होतो. त्यानंतर त्या सात बेड्या म्हणजे १ ) वेदोक्तबंदी {स्वतःच्या क्षत्रियादिक धर्मबंधूंनासुद्धा वेदोक्ताचा अधिकार नाही असे म्हणणारी भटबाजी यापुढे चालणार नाही.-सावरकर २ ) व्यवसायबंदी ३ ) स्पर्शबंदी ४ ) सिंधूबंदी ५ ) शुद्धीबंदी ६ ) रोटीबंदी ७ ) बेटीबंदी. आपल्याकडे अजूनही बेटीबंदी मोठ्या प्रमाणात आहे. सावरकरांनी आंतरजातीय विवाहांना समर्थनच दिले नाही तर स्वतः आंतरजातीय विवाह लावले.

सावरकरांनी अतिशय स्पष्ट शब्दात जातिव्यवस्थेवर हल्ला केला. अनुवंशात जातीचे मूळ आहे. त्या मुळावरच सावरकरांनी हल्ला चढवत अनुवंश हा आचरटपणा आहे, जर ब्राह्मणाच्या घरी 'ढ' जन्मला तर त्याला 'ढ'च म्हटले पाहिजे आणि जर शूद्रांत 'ज्ञ' निघाला तर त्याला 'ज्ञ'च म्हटले पाहिजे, मग त्याचा बाप, आजा अथवा पणजा 'ढ' असो की 'ज्ञ' असो. सावरकरांनी हल्ला करताना 'आपले हिंदुत्वाचे समर्थक दुखावतील' वगैरे फाजील भीती न बाळगता त्यांचे प्रबोधन केले. सावरकर म्हणतात की 'आज आमच्या हिंदू समाजात पोथीत तसे लिहिले आहे ते सोडून इतर कोणत्याही लक्षणाने सहज विभिन्नत्व विविध जातींमध्ये दिसून येत नाही. जात मानणे ही मूळ चूक! त्यात महादेवाच्या जटेपासून ही जात निघाली आणि ब्रह्मदेवाच्या बेंबीपासून अमुक जात निघाली इत्यादी उपरत्या अक्षरशः खऱ्या मानून त्या त्या जातींच्या अंगी ते गुण उपजतच आहेत हे मानणे ही घोडचूक!! अन् तो गुण त्या जातीच्या संतानात प्रकट झाला नसला तरी तो आहेच समजून तशी उच्च-नीचता त्या संतानास भोगावयास लावणे ही पहाड चूक.

**सावरकर यांच्याबद्दल 10 विशेष गोष्टी :** विनायक दामोदर सावरकर दुनियेतील एकमेव असे स्वातंत्र्य-योद्धा होते ज्यांना 2-2 जन्मठेपेची शिक्षा झाली असून ती त्यांनी पूर्ण केली आणि पुन्हा राष्ट्र जीवनात सक्रिय झाले. विश्वातील पहिले असे लेखक ज्यांची 1857 के प्रथम स्वतंत्रता संग्राम रचनेला 2-2 देशांनी प्रकाशनापूर्व बंदी घातली होती. सावरकर प्रथम असे स्नातक होते ज्यांची पदवी स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतल्यामुळे ब्रिटिश सरकारने हिसकावून घेतली होती. दुनियेतील पहिले असे कवी ज्यांनी अंदमानच्या एकांत कारागृहात भीतींवर खीळ आणि कोळशाने कविता लिहिल्या आणि त्या पाठ केल्या. या प्रकारे पाठ केलेल्या 10 हजार ओळी त्यांनी जेलहून सुटल्यावर पुन्हा लिहिल्या.

सावरकर लिखित पुस्तक 'द इंडियन वॉर ऑफ इंडिपेंडेंस-1857' एक सनसनाटी पुस्तक ठरली. ब्रिटिश शासनात या पुस्तकामुळे गोंगाट पसरला होता. सावरकर पहिले असे क्रांतिकारी होते ज्यांनी राष्ट्राच्या सर्वांगीण विकासाबद्दल चिंतन केले आणि बंदी जीवन समाप्त होताच अस्पृश्यता आणि इतर कुप्रथांविरुद्ध आंदोलन सुरु केले. पूर्ण स्वातंत्र्याला भारताच्या स्वातंत्र्य आंदोलनाचे लक्ष्य घोषित करणारे प्रथम व्यक्ती सावरकर होते. ते प्रथम असे राजकारणी बंदिवान होते ज्यांचे प्रकरण हेग येथील आंतरराष्ट्रीय न्यायालयात पोहचले. वीर सावरकर यांनी राष्ट्रध्वज तिरंगाच्या मधोमध धर्म चक्र लावण्याबद्दल सल्ला दिला होता. राष्ट्राध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी त्यांचा सल्ला मान्य केला. वीर सावरकर प्रथम असे भारतीय विद्यार्थी होते ज्यांनी इंग्लंडच्या राजा प्रती निष्ठावान असल्याची शपथ घेण्यास नकार दिला होता. परिणामस्वरूप त्यांना वकालत करता आली नाही.

वीर सावरकर प्रथम असे भारतीय राजकारणी होते ज्यांनी सर्वप्रथम विदेशी वस्त्रांची होळी जाळली होती.

**सावरकरांचे मृत्युपत्र :** 'माझे प्रेत शक्यतो विद्युत-चितेवरच जाळण्यात यावे. जुन्या पद्धतीप्रमाणे ते शक्यतो माणसांनी खांद्यावरून नेऊ नये, किंवा कोणत्याही प्राण्याच्या गाडीमधून नेऊ नये, तर ते यांत्रिक शववाहिकेतूनच विद्युत – स्मशानात नेले जावे.. माझ्या मृत्यूनिमित्त कोणीही आपली दुकाने किंवा व्यवसाय बंद ठेवू नयेत. कारण त्याने समाजाला फार त्रास होतो. घरोघरीच्या संसारासाठी दैनिक आवश्यकतेच्या वस्तू न मिळाल्याने अडथळा होतो. माझ्या निधनानिमित्त कोणीही सुतक, विटाळ, किंवा ज्यायोगे कुटुंबीयांना किंवा समाजाला निष्कारण त्रास होतो अश्या पिंडदानासारख्या कोणत्याही जुन्या रूढी पाळू नयेत. त्या पिंडांना काकस्पर्श होईतो वाट पाहत बसणे इत्यादी कालबाह्य गोष्टी पाळू नयेत.'

**सावरकरांचा मृत्यू :** सुमारे ६० वर्षे त्यांनी स्वातंत्र्य व सुराज्य यांसाठी अथक परिश्रम घेतले. इ.स. १९६६ मध्ये वयाच्या ८३ व्या वर्षी त्यांनी प्रायोपवेशनाचा निर्णय घेतला. १ फेब्रुवारी १९६६ रोजी त्यांनी अन्न, पाणी आणि औषधाचा त्याग करण्याचा निर्णय घेतला. अन्नत्याग केल्यानंतर २६ फेब्रुवारी १९६६ रोजी त्यांचे प्राण पंचतत्त्वात विलीन झाले.

पुण्यातील फर्ग्युसन महाविद्यालयाच्या वसतिगृह क्रमांक १ मधील १७व्या क्रमांकाच्या खोलीत सावरकरांचे इ.स. १९०२ ते १९०५ या काळात वास्तव्य होते. सावरकर जयंतीच्या दिवशी ही एरवी बंद असलेली खोली जनतेला पाहण्यासाठी खुली केली जाते.

सावरकरांना अंदमानमधील तुरुंगातल्या ज्या कोठडीत ठेवले होते, ती खोली सावरकरांचे स्मारक म्हणून सांभाळली जाते. पोर्ट ब्लेयरमधील स्वातंत्र्यज्योती स्तंभावर सावरकरांची वचने कोरलेल्या धातूच्या पट्ट्या बसवल्या होत्या. ही वचने ताम्रपट्ट्यांवर कोरण्याचे काम मुंबईच्या गणेश एन्ग्रेव्हरने केले होते. तत्कालीन पेट्रोलमंत्री मणिशंकर अय्यर यांनी ९ ऑगस्ट २००४ रोजी ती वचने हटवली. २०१६ साली ती वचने पुन्हा प्रस्थापित करण्याचे काम चालू आहे.

**ग्रंथ आणि पुस्तके :**

वीर सावरकरांनी १०,००० पेक्षा जास्त पाने मराठी भाषेत तर १५०० हून जास्त पाने इंग्रजी भाषेत लिहिली आहेत. फारच थोड्या मराठी लेखकांनी इतके मौलिक लिखाण केले असेल. त्यांच्या "सागरा प्राण तळमळला", "हे हिंदु नृसिंहा प्रभो शिवाजी राजा", "जयोस्तुते", "तानाजीचा पोवाडा" ह्या कविता प्रचंड लोकप्रिय आहेत.'सागरा प्राण तळमळला' या कवितेला २००९ साली १०० वर्षे पूर्ण झालेली आहेत.

**संशोधक विद्यार्थीः- भारत आसाराम बल्हाळ**
**(एम.ए. मराठी, पीएच. डी. अपीयर)**
**रिसर्च सेंटरः- अंकुशराव टोपे कॉलेज जालना**
**मो.नं. 7588819471**

# मनातलं माहेर



रंजना सानप
संपर्क क्र. ९०४९५४८३२३

आधुनिक केसरी

**प्रत्येक स्त्रीच्या मनातला हळवा कोपरा म्हणजे तिचं माहेर असतं.मायेची पखरण,सौख्याचं अंगण, हळुवार उलगडलं जातं जिथं मन ते असतं माहेर. नववधू पासून ते आयुष्याची संध्याकाळ अनुभवणाऱ्या तिला ओढ लागते ती तिच्या माहेराच्या वाटेची. देवा सुखाचं चांदणं, माझ्या माहेरी पडावं, नांदते मी सासरी परी, शेवटच्या घडीलाही माहेर घडावं. सासरी सुखाची बरसात होत असली तरी तिचं मन माहेरच्या वाटेवर धाव घेत असतंच.**

ती हरवून जाते बालपणात, मन झोके घेते राहते उंचच उंच हिंदोळ्यावर. आठवते ती मैत्री परकर पोलक्यातली. लांबसडक वेणीतला गजरा सुगंधित करून जातो जुन्या क्षणांना.आईचा मायेच्या पदराखालची निवांतलेली सोनेरी पहाट तरळून जाते नजरेसमोरून. आठवणींच्या गाठोड्यातील एक एक क्षण धाग्यासारखा आपोआप उलगडतो आठव ताजा करत. संसाराचा गाढा ओढता ओढता थकलेली, भागलेली ती जेंव्हा माहेरी जाते तेंव्हा, परत लहान होते. झाडाखाली तिच्या वाटेवर डोळे लावून उभा असलेला बाप अन डोकीवर अर्धा पदर ओढून तिच्या भेटीसाठी आतुर झालेली माय तिला लांबूनच दिसते. तेंव्हा' ती ही बिलगते परत सहान होऊन. ओघळतात आसवे नयनाच्या डोहातून आपसूक मग ,अन मन हलकं होवून जातं मोरपीसी पंखासारखं. स्वतःच कोडकौतुक होताना हरकून जाते ती. थकलेल्या ,भागलेल्या तिच्या मनाला,देहाला विसावा तिथेच भेटतो. मनातली सगळी धगधग बाहेर काढते, तेंव्हा फुंकर घालते माहेरातली माती त्यावर.शीत होऊन जातात आतले होरपळलेले अनेक कप्पे. उल्हासलेला चेहरा घेऊन 'मी परत येईन' म्हणत भरल्या ओटीने ती सासरी परतते. पण सगळ्याच्याच नशिबी माहेर नसतं. एकटी असते किंवा एकटी पडलेली असते ती वेगवेगळ्या परिस्थितीत येणाऱ्या संघर्षला तोंड देत.तेंव्हा घुसमट होते तिच्या मनाची, आक्रंदत असतं भेगाळलेलं मन .हवा असतो तिला कुठेतरी तिच्यासाठीचा हळवा कोपरा. शोधत असते ती आजूबाजूच्या माणसात तिचं माहेरपण. पण जेंव्हा तिला तिच्या मनातलं माहेरपण सापडत नाही तेंव्हा हरवून जाते अंधाऱ्या जगात.विसरून जाते नात्यांचे पाश.गोंधळून जाते कानटिळ्या बसणाऱ्या गोंगाटाने. भेळकांडते चालता चालता. पण तिला कोणी समजून घेणारं उरतच नाही. वेळोवेळी टोचणारेच भेटतात. तिलाच ठरवते व्यवस्था भ्रमिष्ट .मग कवटाळून बसते ती मृत्यूला. तिथंही संपत नाही तिच्या स्त्रीपणाचा



प्रवास. अनेक आरोपांचे कोंडाळे करून तिच्या देहाच्या शेवटच्या मातीलाही नागवलं जातं.

पण हे घडण्याआधी योग्य वेळीच जर तिच्या मनातलं दुःख हलकं करायची जागा मिळाली तर तिच्या वेदनेवर हलकी का होईना फुंकर बसते. अशा वेळी वाट करून देते मनातील भावनांना .रडते,चिडते, हसते,ओरडते पण ती कुठेतरी स्थिर होते. भेदरलेल्या मनाला अशावेळी शब्दाचा आधारही लाख मोलाचा वाटतो.शोधत राहते नवीन वाटा तिचं स्वतःचे अस्तिव सिद्ध करू पाहणाऱ्या.जेंव्हा ती गवसणी घालते आकाशाला तेंव्हा, तिलाच तिचा हेवा वाटू लागतो. घुसमटलेल्या अनेकजणी शोधत राहतात मग तिच्यासारखीच वाट. सापडतंही अनेकदा मनासारखं त्यांना अवकाश मुक्त विहार करण्यासाठी. पण हे माहेरपण तिला आधीच मिळायला हवं,तिला तिच्या हक्काच्या घरातच.बऱ्याच वेळा प्रसंगानुरूप तिला वागणूक मिळत असते. अचानक वैधव्य आले किंवा संसारात काही आकस्मिक घटना घडली तर स्त्रीलाच दोष दिला जातो.पुरुषसत्ताक पद्धती म्हणत काळ पुढे सरकत जातो. पण आपण वास्तव जाणून घेतो तेंव्हा ,बहुतेक वेळा स्त्रीच स्त्रीला दोष व त्रास देण्यात पुढाकार घेत असते असं दिसून येतं. तीच तिच्या जगण्यावर मर्यादा घालत असते. अचानक ओढवलेल्या परिस्थितीमुळे ती अंतबाह्य कोलमडून पडलेली असते. कोणीतरी तिच्या भावना समजून घेणारं भेटावं.मी आहे ना एवढे शब्द कानी पडावेत एवढीच माफ़क तिची अपेक्षा असते. अशावेळी सासू, नणंद, जाऊ यापैकी कोणाशी तरी मैत्रीचं नातं असावं लागतं.अगदी शेजारीण सुध्दा तिची मैत्रीण असू शकते. कोणत्याही सुखदुःखाच्या प्रसंगी सखीची सोबत असावी लागते. अशी सखी जेथे जेथे भेटेल तिथे तिच्या मनाची घुसमट ,वेदना मांडू शकेल. थोडा का होईना प्रसंगी मनावरचा ताण हलका होईल.तिच्याकडून होणाऱ्या चूकावर पांघरूण न घालता तिलाही योग्य वाट दाखवेल . मग कोणत्याही संकटाला तोंड देण्यास सक्षम होईल. चुकीच्या वाटेची निवड करणार नाही.मग तिला माहेरपणाच्या सुखाचा शोध घ्यावा लागणार नाही. तिच्या मनातलं माहेरपण "तिला तिच्या घरातच भेटेल.

# अरे पुन्हा आयुष्याच्या पेटवा मशाली !

आधुनिक केसरी

अखेर शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण हे चिन्ह उद्धव ठाकरेंच्या हातातून गेले तसा निर्णयच निवडणूक आयोगाने नुकताच दिला. निवडणूक आयोगाचा हा निर्णय धक्कादायक असला तरी अपेक्षित असाच होता उद्धव ठाकरे यांच्या गटालाही हा निर्णय अपेक्षित होता ठाकरे गटाचे नेते अनिल देसाई यांनीच तसे म्हटले आहे अर्थात या निर्णयाला न्यायालयात आव्हान दिले जाईल त्यामुळे या निर्णयाचे कवित्व आणखी काही दिवस चालेल मात्र ठाकरेंशिवाय शिवसेना अशी कल्पना कोणीही केली नसेल पण राजकारणात काहीही होऊ शकते विशेषतः सध्याच्या राजकारणात तर काहीही शक्य आहे. आधी आमदार मग खासदार त्यानंतर नगरसेवक आणि आता पक्षाचे नाव आणि चिन्हही गेल्याने उद्धव ठाकरे यांच्या हाती काहीही राहिले नाही मात्र म्हणतात ना हातात जेंव्हा काही नसते तेंव्हाच जिद्द निर्माण होते. उद्धव ठाकरे यांनी आता ती जिद्द दाखवावी न्यायालयीन लढाई लढतानाच राजकारणाची पुढील दिशाही ठरवावी. उद्धव ठाकरे यांनी केवळ न्यायालयावर अवलंबुन राहू नये न्यायालयासोबतच त्यांनी जनतेच्या न्यायालयात जावे. जे काम इतिहासात इंदिरा गांधी यांनी केले, जे काम वर्तमानात जगनमोहन रेड्डी यांनी केले तेच काम उद्धव ठाकरे यांनी करावे. जेंव्हा इंदिरा गांधी यांच्या हातून पक्ष आणि चिन्ह गेले तेंव्हा इंदिरा गांधी यांनी इंदिरा गांधी हे पक्षाचे नवीन नाव आणि हाताचा पंजा हे नवीन चिन्ह मतदारांपर्यंत पोहचवण्यासाठी भारतभर फिरल्या तेच काम वाय एस आर पक्षाचे प्रमुख जगमोहन रेड्डी यांनी आंध्रप्रदेशात केले. त्यांच्याही हातून पक्ष, चिन्ह आणि आमदार खासदार गेले तेंव्हा त्यांनीही आंध्रप्रदेशात लाँगमार्च काढला. आपला नवा पक्ष आणि नवे पक्षचिन्ह मतदारांपर्यंत पोहचवण्यासाठी ते घरोघरी फिरले त्यांनी ना निवडणूक आयोगावर टीका केली ना न्यायालयाच्या निर्णयाकडे डोळे लावून बसले कारण त्यांना माहीत होते की खरा निकाल हे जनतेच्या न्यायालयातच लागणार आहे त्यासाठी ते थेट जनतेच्या न्यायालयात गेले त्यासाठी त्यांनी रात्रीचा दिवस केला. हाती सत्ता नसताना आमदार, खासदार नसताना त्यांनी जनतेची कामे केली. सत्ताधारी पक्षांना सळो की पळो करून सोडले परिणामी जनतेने त्यांना नेता मानले आणि पुढील निवडणुकीत सर्व विरोधात असताना एकतर्फी विजय मिळवून त्यांनी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. उद्धव ठाकरे यांनीही विरोधी पक्षांवर टीका करण्यात वेळ घालवण्यापेक्षा थेट जनतेत जावे. महाराष्ट्र पिंजून काढावा. जनतेची काम करावीत. रात्रीचा दिवस करावा त्यांच्या सुदैवाने महाविकास आघाडीचे नेते त्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे आहेत त्यामुळे क्षणाचाही वेळ वाया न दडवता त्यांनी कामाला लागावे.

**श्याम ठाणेदार, दौंड, जिल्हा पुणे**



# आ.फारुख शाह यांच्या हस्ते कॉंक्रीट रस्त्याचे शुभारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहरातील मुलभूत सुख सुविधांना प्राधान्य देत धुळे शहरातील विविध भागातील रस्त्यांसाठी आमदार फारुख शाह यांनी शेकडो कोटी रुपयाचा निधी शहराच्या विकासासाठी आणलेला आहे. तसेच आ.फारुख शाह यांच्या आमदार स्थानिक विकास निधीतून शहराच्या न झालेल्या रस्त्याच्या कामांसाठी निधी आमदार फारुख शाह यांनी उपलब्ध करून दिलेला आहे. त्याचाच एक भाग म्हणून परिजात कॉलनी ते न्यू पंचशील बोर्डपर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरणाच्या ३० लक्ष रुपयाचा कामाचा शुभारंभ आमदार फारुख शाह यांच्या हस्ते करण्यात आला. धुळे शहरातील विविध भागात भेदभाव न करता सगळ्यांना समान न्याय देत शहरातील रस्ते गटारी संदर्भात आमदार फारुख शाह यांनी निधी उपलब्ध करून दिलेला आहे. प्रभाग क्र.१५ मधील नगरसेविका ईशी यांच्या व तेथील नागरिकांच्या मागणी नुसार या रस्त्यांच्या कामांसाठी आमदार फारुख शाह यांनी निधी उपलब्ध करून दिला आहे त्यांच्या हस्ते आज या कामाचा शुभारंभ करण्यात आला आहे. यावेळेस डॉ.दीपश्री नाईक, डॉ.पवार, नगरसेवक गनी डॉलर, माजी नगरसेवक योगेश ईशीहरिश्चंद्र लोंढे, जी. डी. जाधव, शरद चंद्रकांत गांगुर्डे, अशोक भिवासान फिरणे, गोरख शिवदास शिंदे, गुलाबराव, त्र्यंबक भंडारी, काशिनाथ आनंदा परदेशी, दादाजी पांडुरंग पाटील, किरण उत्तमराव मासुळे, गुलाबराव बाजीराव निकुंबे, उत्तमराव नेतकर साहेब, आनंद निंबा बिरारीस, शशिकांत मोहन पाटील, पगारे नाना, शांताराम जगताप, थोरात नाना, मोहन गांगुर्डे, कैलास परदेशी, प्रशांत महाले, वाघ साहेब, साहेबराव पगारे, दिलीप पाटील, वसंत कौतिक चव्हाण, आदी उपस्थित होते.

# चांदई एक्को केंद्रात शिक्षण परिषद संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीक्षेत्र राजूरः** चांदई एक्को केंद्रातर्गत केंद्रीय शिक्षण परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.ती नुकतीच जि. प .प्रा.शा.चांदई ठोंबरी येथे संपन्न झाली आहे.सर्वप्रथम शिक्षण परिषेदेचे उद्घाटन सरपंच साहेबराव पाटील ठोंबरे, केंद्रप्रमुख आण्णा इंगळे यांच्या हस्ते करण्यात आले. तर या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून केंद्रीय मुख्याध्यापक प्रल्हाद पालोदे हे लाभले होते. सुरवातीस कार्यक्रमाचे प्रास्ताविक केंद्राचे केंद्रप्रमुख अण्णा इंगळे यांनी कार्यक्रमाची रूपरेषा प्रस्ताविकातून स्पष्ट करून दिली.

त्याचप्रमाणेआजच्या शिक्षण परिषदेमध्ये NAS-2021, PGI, असर अहवाल यांचे सादरीकरण केंद्रप्रमुख आण्णा इंगळे यांनी करून दाखविले. तदनंतर शिक्षक मंगेश दारूवाले व सोमनाथ कदम यांनी मराठी, इंग्रजी, गणित व परीसर अभ्यास पेटी या बाबतची सविस्तर माहिती देऊन विषयास अनुसरून सादरीकरण करण्यात आले. केंद्रीय केंद्रीय शिक्षण परिषदेसाठी मुख्याध्यापक माधव गंदपवाड, जगन वाघमोडे, ढाकणे ,आर.एच. दानवे, बोंगाने, प्रवीण कुलट , यासह केंद्रातील सर्व मुख्याध्यापक आणि शिक्षक उपस्थित होते. शिक्षण परिषद हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्रीमती कल्पना पवार, श्रीमती अर्चना राजे, श्रीमती वर्षा औताडे, यांनी प्रयत्न केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिपक गाडेकर, तर आभार बबन घुगे यांनी मानले.



# टिळक शिक्षण महाविद्यालयात राष्ट्रीय परिषदेचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** शिक्षण प्रसारक मंडळीचे टिळक शिक्षण महाविद्यालय, पुणे आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने "राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (२०२०) अंमलबजावणी : संस्थात्मक विकास योजना" या विषयावर दिनांक २७ आणि २८ फेब्रुवारी २०२३ रोजी राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. टिळक शिक्षण महाविद्यालयाची स्थापना २० जून १९४१ रोजी शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे यांनी केली. प्रस्तुत महाविद्यालय गेल्या ८२ वर्षांपासून दर्जेदार शिक्षक शिक्षण देत आहे आणि शिक्षकांना उत्कृष्ट प्रशिक्षण देत आहे. ही देशातील शिक्षक शिक्षण क्षेत्रातील प्रमुख आणि नामांकित संस्थांपैकी एक आहे. आमचे महाविद्यालय हे बी.एड., एम.एड., एम. फिल, पीएच.डी. असे विविध अभ्यासक्रम उपलब्ध करून देणारे शैक्षणिक केंद्र आहे. टिळक शिक्षण महाविद्यालय हे नेहमीच दर्जेदार आणि प्रभावी शैक्षणिक उपक्रम राबवत असते. या उपक्रमांचा एक भाग म्हणून प्रस्तुत परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेत ॲड. श्री एस के जैन, अध्यक्ष, नियामक मंडळ, शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे, डॉ. अनिरुद्ध देशपांडे, अध्यक्ष, शैक्षणिक विकास प्रशासन केंद्र (CEDA), पुणे, डॉ. बीना इनामदार, कार्यकारी सदस्य, शैक्षणिक विकास प्रशासन केंद्र (CEDA), पुणे डॉ. अमित गौतम, सहयोगी प्राध्यापक, राष्ट्रीय शैक्षणिक नियोजन आणि प्रशासन संस्था (NIEPA), नवी दिल्ली, डॉ. प्रशांत साठे, प्राध्यापक, बृहन महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्स, पुणे, डॉ. संजीव सोनवणे, प्रकुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे, श्री. केशव वझे, सदस्य. व्यवस्थापकीय परिषद, एस. पी. मंडळी, पुणे आदी मान्यवर मार्गदर्शन करणार आहेत. संस्थात्मक विकास योजना (IDP) वरील UGC मार्गदर्शक तत्त्वांबद्दल सादरीकरण, चर्चा तसेच माहिती आणि विचारांची देवाणघेवाण करण्यासाठी एक व्यासपीठ प्रदान करणे हे या परिषदेचे उद्दिष्ट आहे. शिक्षक प्रशिक्षक, संशोधक, शिक्षक, शिक्षण अधिकारी आणि शैक्षणिक धोरण निर्माते यांच्याद्वारे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (२०२०) च्या प्रभावी अंमलबजावणीवर लक्ष केंद्रित करण्यासाठी या परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

१. महाविद्यालय किंवा विद्यापीठासाठी संस्थात्मक विकास योजना (IDP).
२. SWOT विश्लेषण 3. संस्थात्मक शिक्षणशास्त्रीय दृष्टीकोन
३. संस्थात्मक विकास योजनेनुसार परिसर विकास ४. संस्थात्मक विकास योजनेनुसार पुनर्विकास धोरण.
५. संस्थात्मक विकास योजनेनुसार उच्च शिक्षण संस्थांमध्ये ICT पायाभूत सुविधा यांची आवश्यकता आणि उभारणी
६. महाविद्यालय/विद्यापीठाचा शाश्वत विकास आणि तंत्रज्ञान एकत्रीकरणः हरित उपक्रम ७. मुख्य विषयाशी संबंधित कोणताही विषय. संशोधक, प्राध्यापक आणि शिक्षक प्रशिक्षकांनी प्रस्तुत परिषदेच्या कोणत्याही उप-विषयांवर लक्ष केंद्रित करणारे संशोधन आणि संकल्पनात्मक शोधपत्र (इंग्रजी किंवा मराठी भाषेतील) पाठवावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. संपूर्ण संशोधन पत्राची सॉफ्ट कॉपी tilaknational23@gmail.com या इमेल वर दि. २५ फेब्रुवारी २०२३ पर्यंत पाठवावी. तसेच राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० नुसार यापुढे प्रत्येक महाविद्यालयाला Institutional Development Plan तयार करावा लागणार असल्याने प्राचार्य व प्राध्यापक यांनी सदर परिषदेसाठी आवर्जून उपस्थित रहावे असे आवाहन आयोजकांनी केले आहे.



# राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल प्रा. बोराडे यांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीक्षेत्र राजूर :** महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ,मुंबई व दैनिक मराठवाडा साथी'च्या वतीने देण्यात येणारा पत्रमहर्षी स्व. मोहनलालजी बियाणी राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार प्रा. बाळासाहेब बोराडे यांना जाहीर झाल्याबद्दल बावणे पांगरी येथे ऋषी महाराज आदर्श विद्यालया तर्फे त्यांचा सत्कार आयोजित करण्यात आला होता. यावेळी भाजपा जिल्हा उपाध्यक्ष भास्कर आबा दानवे, भाजपा जेष्ठनेते शिवाजीराव थोटे,संस्था अध्यक्ष सुभाषराव बोडखे आदी मान्यवरांच्या हस्ते प्रा.बोराडे यांचा शाल,श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी ऋषी महाराज शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष सारंगधर बोडखे,सचिव प्रवीण बोडखे,प्रसिद्ध व्यवसायिक विठ्ठलराव टेपले,व्यापारी संघाचे अध्यक्ष जगन्नाथ थोटे,मोरे मामा, गणेश बावणे,सरपंच गौतम बोर्डे,गणेश महाडिक, गणेश कदम, सुरेश मुटकुळे, प्रा.आसाराम बोटूळे, गणेश बोडखे, नायबराव बोडखे,बळीराम बोडखे,अरविंद बोडखे, लक्ष्मण बोडखे,भगवान शिंदे, सुनील बोर्डे,विष्णू मुटकुळे,कृष्णा नरोडे,प्राचार्य कृष्णा जाधव,उपप्राचार्य संदीप सोनुने यांनी प्रा. बोराडे यांचे अभिनंदन केले.

# मराठी भाषा गौरव दिनी मिळणार काव्य मेजवानी

आधुनिक केसरी न्यूज

**गोंडपिपरी :** कुसुमाग्रज यांच्या मराठी साहित्याचा गौरव म्हणून त्यांची जयंती 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून साजरी करण्यात येते.यावर्षी प्रथमच चिंतामणी महाविद्यालयाच्या मराठी विभागाने व शब्दांकूर फाउंडेशन तर्फे विद्यार्थ्यांचे कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे.यामध्ये बी.ए. आणि बी.एस.सी.च्या विद्यार्थ्यांना सहभागी होण्याचे आवाहन प्रा. उज्ज्वल त्रिनगरीवार यांनी केले आहे. चिंतामणी कॉलेज ऑफ आर्ट्स अँड सायन्स,गोंडपिपरी व शब्दांकूर फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने संपन्न होणाऱ्या कविसम्मेलनाचे अध्यक्ष प्रा. संतोष बांदूरकर,जनता कनिष्ठ महा.गोंडपिपरी तर उदघाटक म्हणून चिंतामणी प्राचार्य डॉ.आशिष वा.चव्हाण असणार आहेत. अतिथी म्हणून दुशांत निमकर केंद्रप्रमुख केंद्र भंगाराम तळोधी,राजेश्वर अम्मावार सचिव शब्दांकूर फाउंडेशन, देवानंद रामगिरकर विषय शिक्षक,सचिन दळवी मॅजिक बस फाउंडेशन समन्वयक,प्रा.प्रज्ञा बसू हे मान्यवर मंचावर उपस्थित असणार आहे. यात महाविद्यालयातील साहित्याच्या क्षेत्रात पदार्पण करणाऱ्या विद्यार्थ्यांना संधी लाभणार आहे.नवोदित विद्यार्थ्यांना काव्याची मेजवानी इतर विद्यार्थ्यांना मिळणार आहे म्हणून यांचा सर्वांनी लाभ घ्यावा तसेच कविता सादरीकरण केल्यानंतर त्यांना प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार आहे.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन काजल राळेगावकर करणार असून कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी चिंतामणी कॉलेजचे प्राध्यापक, कर्मचारी वर्ग तसेच शब्दांकूर फाऊंडेशनचे पदाधिकारी प्रयत्न करीत आहे.


नवीन वर्षाचा संकल्प करा
आरोग्याची काळजी हा मंत्र खरा
- घाऊक आणि किरकोळ
- किराणा, सुका मेवा, मसाले
- क्रॉकरी, घरगुती उपकरणे
- प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही
- घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि ॲल्युमिनियम

शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट
महावीर
घर संसार

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181
वितरण स्थिती 9021395308 9657398232
घाऊक चौकशी 7620111118 9527111185
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, औरंगाबाद

# लोणार शहरातील प्रभाग एकमधील समस्या दूर करा

आधुनिक केसरी न्यूज

यासीन शेख

**लोणार :** शहरातील प्रभाग क्रमांक १ मधील नाला व रस्त्यावरील घाण दूर करून स्वच्छता करण्याची मागणी लोणार नगर परिषद च्या माजी नगराध्यक्ष तथा विद्यमान नगरसेविका सौ रंजना राजेश मापारी यांनी जिल्हाधिकारी बुलढाणा यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे. या निवेदनात प्रभाग क्र. १ मधील त्याच्या प्रभागात काही ठिकाणी नाला व रस्ते बनलेले नाहीत न. प. प्रशासनला वारंवार विनंती करुन सुध्दा या ठिकाणी रस्ते नाली बनविण्यात आलेली नाही. या ठिकाणी लोक अत्यंत गलिच्छ वातावरणात राहात आहे. या प्रमाणामध्ये मुस्लीम वस्ती मोठ्या प्रमाणात असून त्याच्या घरापुढे नालीची घाण पाणी साचले आहे. या ठिकाणी लेआउट धारकांनी नालीसाठी जागा न सोडल्यामुळे पाणी हे प्रत्येक घरासमोर सांचले आहे यामुळे प्रत्येक घरामध्ये आरोग्याचा समस्या निर्माण होत आहे. घाण पाणी व या ठिकाणी असलेल्या समस्या ७ दिवसांत मार्गी लावण्यात आले नाही तर नगरसेविका रंजना राजेश मापारी व नगर सेविका नसिमबानो मोहम्मद तौफीक कुरेशी यांचे पति मोहम्मद तौफीक मुख्याधिकारी न.पा. लोणार यांच्या दालनात सदर समस्या दुर होई पर्यंत दि.०२/०३/२०२३ रोज शुक्रवार ला ११ वाजे पासुन ठिय्या आंदोलन करणार असल्याचा इशारा देण्यात आला. कायद्या व सुव्यवस्था यांच्या प्रश्न निर्माण झाल्यास न.प.प्रशासन जबाबदार राहील असे या निवेदनात म्हटले आहे.



## नकाणे तलावात पूर परिस्थितीत करावयाचे शोध व बचाव कार्याची रंगीत तालीम

आधुनिक केसरी न्यूज



**धुळे :** जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, धुळे, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल, पुणे आणि राज्य आपत्ती प्रतिसाद दल, धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने आज सकाळी नकाणे तलाव येथे पूर परिस्थितीत करावयाचे शोध व बचाव कार्य याबाबत रंगीत तालीम घेण्यात आली. नैसर्गिक आपत्तीमुळे पूर परिस्थिती उद्‌भवल्यास विविध विभागांच्या समन्वयाने शोध व बचाव कार्य कसे करावे याबाबत प्रात्यक्षिके करून रंगीत तालीम घेण्यात आली. जिल्हाधिकारी जलज शर्मा यांचे आदेशानुसार व निवासी उपजिल्हाधिकारी संजय गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली ही रंगीत तालीम घेण्यात आली. या प्रात्यक्षिकादरम्यान अग्निशमन विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, पाटबंधारे विभाग, राज्य आपत्ती प्रतिसाद दल, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल, होमगार्ड, महसूल, शिक्षण विभाग, वीज वितरण कंपनी, भारत दूरसंचार निगम लिमिटेड, जिल्हा रुग्णालय व इतर विभागांच्या समन्वयातून ही रंगीत तालीम यशस्वी करण्यात आली. यावेळी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी जितेंद्र सोनवणे, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाचे निरीक्षक सुजित कुमार पासवान, अजय कुमार यादव, अंकित कुमार यादव, राज्य आपत्ती प्रतिसाद दलाचे उपविभागीय पोलीस अधिकारी चंद्रकांत पारस्कर, पोलीस निरीक्षक मनोज मोहोळ, दिलीप मांडळ, श्री सोनवणे, पोलीस उपनिरीक्षक श्री जगताप, पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता श्री वट्टेवार, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ स्वप्नील पाटील यांचेसह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

## ममुराबाद येथे ग्रामपंचायतची करवसुली शेतकरी म्हणतात कापूस खरेदी करा

आधुनिक केसरी न्यूज



**ममराबाद :** तालुका खुलताबाद येथे ग्रामपंचायत कडून कर वसुली मोहीम राबविण्यात येत आहे वसुलीसाठी कर्मचारी गेल्यानंतर दरअभावी पडून असलेला कापूस खरेदी करा व कर्जमा करा असे उत्तर शेतकऱ्यांकडून देण्यात येत असल्याचे चित्र आहे कापसाला भाव मिळत नसल्याने कापूस घरातच पडून आहे शेलगाव जानेफळ मोमरोबाद ग्रुप ग्रामपंचायत अंतर्गत सध्या कर वसुली मोहीम सुरू आहे ग्रामपंचायत कार्यकारणी व ग्रामसेवक संयुक्तपणे वसुली मोहिमेसाठी घरोघरी जात आहेत मात्र हाती पैसे नसल्याने व कापूस घरात पडून असल्याने ग्रामपंचायतीने शासनासोबत हमी बाजारभावात कापूस खरेदी व्यवहार करून कराची वसुली करावी अशी अजब मागणी करण्यात येत आहे ग्रामसेवकांनी काय करावे असा प्रश्न पडला आहे एकीकडे प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी यांच्याकडून वसुलीसाठी तकदा तर दुसरीकडे शेतकऱ्यांच्या पैसा नसल्याने कापूस खरेदीचा मागणी यामुळे ग्रामपंचायत कार्यकारणी व ग्रामसेवक हतबल झाली आहे उपसरपंच कृष्णा गावंडे सदस्य दावत पटेल जनार्दन वेताळ ग्रामसेवक अंतराळ कर्मचारी खिल्लारे वाघदरे शेख वसुली मोहिमेत सहभागी आहेत.

## नाथषष्टी यात्रातील रहाटपाळणा बोली २४ लाखांवर

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** यात्रेतील रहाटपाळणा म्हटले की आठवणी येते बालपणाची महाराष्ट्रातील सर्वात मोठी दुसर्या क्रमांकाची यात्रा म्हणून पैठण येथील नाथषष्टी यात्रा कडे पाहीले जाते. या षष्ठी यात्रेत गेल्या शेकडो वर्षापासून बच्चे कंपनी साठी पुर्वीपासून 'रहाटपाळणा' येतो पंधरा दिवस हि यात्रा चालत असल्याने ईथे येणाऱ्या रहाटपाळण्याचे म्हणजे षष्ठीतील मुख्य आकर्षधण. परंतु गेल्या काही वर्षांत या रहाटपाळण्याचे अर्थिक राजकारण फिरत असल्याने या वर्षीची नगर परिषदेने यंदा बोली बोलवली या बोलीत प्रथम रहाटपाळणा चालवण्यासाठी तब्बल २४ लाखावर बोली गेली,त्यात २३ लाख ८८ हजार बोलणाराला नगर परिषदने पैसे भरणा करणासाठी सांगितले. परंतु यापैकी कोणीच पैसा भरला नाही तर बोली लिलाव परत करावा लागतो. या वर्षी प्रथमच रहाटपाळणा साठी मोठ्या रकमेची बोली बोलल्याने पैठण नाथ षष्ठीतील रहाटपाळणा चर्चेत आला आहे.

## वंचिततर्फे तहसील कार्यासमोर कार्यालयासमोर धरणे आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज



**फुलंब्री :** वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष बाळासाहेब आंबेडकर व प्रदेशाध्यक्ष रेखाताई ठाकूर यांच्या सूचनेवरून विभागीय अध्यक्ष मा. अशोक हिंगे पाटील आज 24 फेब्रुवारी 2024 रोजी तहसील फुलंब्री कार्यालय धरणे आंदोलनमहाराष्ट्र शासनाच्या विरोधात निदर्शने करून शेतकऱ्यांच्या सर्वसामान्य हक्कासाठी दोन मागण्या करण्यात आल्या महाराष्ट्र मध्ये कापसाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात झाले आहे शासनाचा हमीभाव सहा हजार रुपये असल्यामुळे खाजगी व्यापारी सुद्धा 60 ते 8000 मध्ये खरेदी करत आहे हा भाव शेतकऱ्यांना परवडत नाही यामध्ये शेतकऱ्यांचा उत्पन्न खर्च सुद्धा निघत नाही 70 ते 80 टक्के शेतकऱ्यांचा कापूस घरामध्ये पडून आहे कापूस पिकला खरा परंतु अजूनही विकला नाही कापसाच्या पिकामुळे खाज येऊन शेतकरी बिमार पडत आहे दिवस रात्र कष्ट करून पांढरं सोनं पिकवलं खरं परंतु बे भाव विकण्याची वेळ आली आहे कापूस शेतकऱ्यांना बस विकणे खूप गरजेचे असून हमीभाव न मिळाल्यामुळे इतर शेतीचे संबंधित प्रश्न निर्माण झाल्यामुळे शेतकऱ्याची आत्महत्या वाढत आहे. नागरिकांना परवडण्या नसून ती संपूर्ण जनतेची दिशाभूल करणारी आहे ती अतिरिक्त वाढ तात्काळ रद्द करावी वरील दोन मागण्यासाठी वंचित बहुजन आघाडी तर्फे कार्यालय फुलंब्री समोर आंदोलन करण्यात आली यावेळी जिल्ह्याचे पूर्व जिल्हाध्यक्ष प्रभाकर बखले जिल्हा महासचिव भैय्यासाहेब जाधव जिल्हा संघटक महेंद्र गडवे, रंगा भुईगड तालुका अध्यक्ष सांडू श्रीखंडे शहराध्यक्ष गुड्डू भाई शेख तालुकाध्यक्ष विकी शेजवळ तालुका महासचिव विनोद कसारे तालुका उपाध्यक्ष संदीप म्हस्के सुनील राजपूत सुरज मस्के प्रदीप हिवराळे पंकज मस्के पंकज वाघुळ अरेफ भाई आदीची उपस्थिती होती.

# अंगणवाडी सेविका व मदतनीसांचे बेमुदत काम बंद आंदोलन !

## प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी प्रयत्न करणार : आमदार निलेश लंके

आधुनिक केसरी न्यूज

**पारनेर :** अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्या अनेक वर्षापासून प्रलंबित असणाऱ्या विविध प्रश्नांसंदर्भात अंगणवाडी सेविका व मदतनीस यांनी यापूर्वीही वारंवार आंदोलने केले आहेत. परंतु त्यांना आज पर्यंत ईश्चित असे यश न मिळाल्यामुळे तालुक्यातील सर्व अंगणवाडी सेविका व मदतनीस यांनी 20 फेब्रुवारी 2023 पासून काम बंद आंदोलनास सुरुवात केली आहे व त्या आशयाचे निवेदन शेकडो अंगणवाडी सेविका मदतनीस माता भगिनींनी पारनेर नगर विधानसभा मतदारसंघाचे राष्ट्रवादीचे आमदार निलेश लंके यांना दिले असून ,माझ्या माता भगिनींची होणारी ससेहोलपट मी पाहत आलो आहे .मीळनार्या मानधनात कुटूंब चालवीनेही आवघड आसताना त्यांना मानधना ऐवजी वेतन मिळावा यासाठी मी प्रयत्नशील राहील व माझ्या माता भगिनींना ते मिळवून देईल असे आमदार लंके यांनी सदर महिलांना आश्वासित केले. शासनाने हे प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न पूर्ण ताकदीने केला नाही त्यामुळे संपाची स्थिती निर्माण झाली आहे, असे खेदाने नमूद करीत आहोत. नाविलाजाने महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी कृती समितीला बेमुदत संपाची घोषणा करावी लागली. अंगणवाडी सेविका मदतनीस या कामगार आहेत असे सर्वोच्च न्यायालायाने नमूद केले आहे. तरीही सरकारने याची दाखल घेऊन त्यांना कर्मचारी म्हणून जाहीर केले नाही. अंगणवाडी सेविका मदतनीस यांना कर्मचारी घोषित करावे अशी अनेक वर्षाची मागणी आहे.अंगणवाडी सेविकांना सुमारे ८५०० मिनी अंगणवाडी सेविकांना ६५००/- तर मदतनीस यांना ४५००/- रुपये मासिक मानधन दिले जाते ते तुटपुंजे आहे. त्यात तातडीने भरीव वाढ करावी व कृती समितीशी वेतनश्रेणीची चर्चा करावी. अंगणवाडी सेविका मदतनीस यांना निवृत्ती वेळी मासिक मिळकतीच्या निम्मी पेन्शन मिळावी, अंगणवाडी सेविका मदतनीस यांना सुप्रीम कोर्ट निर्णया प्रमाणे ग्रॅज्युटी द्यावी, इंधनाचे दर वाढल्याने मुलांना पोषण आहार देण्यासाठीच्या दरात वाढ होणे आवश्यक आहे.तसेच चांगला ताजा सकस आहार मिळाला पाहिजे, ऑनलाईन कामांसाठी चांगले दर्जाचे मोबाईल देणे आवश्यक आहे, तसेच पोषण ट्रॅकर ॲप मराठीत असले पाहिजे. यावेळी अंगणवाडी सेविका संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष नंदा पाचपुते, तालुका प्रतिनिधी अलकाताई नगरे,तालुका अध्यक्ष संगीता विश्वास तालुका उपाध्यक्ष शशिकला औटी, तालुका प्रतीनिधी कल्पना चौरे, तालुका कार्याध्यक्ष अरुणा खळेकर माया मिसाळ यांच्यासह आंगणवाडी सेविका मदतनीस उपस्थित होत्या.





# नाथषष्ठीनिमित्ताने वाळवंटात साफसफाईला सुरवात

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** संत एकनाथ महाराज नाथषष्ठी सोहळा पंधरा दिवसावर येवून ठेपला असून त्या पार्श्वभूमीवर नगर पालीका प्रशासनाने २४ फेब्रुवारी रोजी विलासबापु भुमरे यांच्या हस्ते नारळ फोडून गोदावरीतील साफसफाईला सुरवात करण्यात आली. यावेळी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी संतोष आगळे, सोमनाथ परदेशी, किशोर चौधरी, गणेश मडके, जनार्दन मिटकर, पोपट औटे, मनीष औटे तसेच नगरपालिका कर्मचारी यांची उपस्थिती होती.

## सांगोला नगरपरिषद आरोग्य विभागामार्फत शहरामध्ये प्रतिबंधित प्लास्टिक जप्ती मोहीम

आधुनिक केसरी न्यूज



**सांगोला :** नगरपरिषद आरोग्य विभागामार्फत शहरामध्ये प्रतिबंधित प्लास्टिक जप्ती मोहीम राबविण्यात येत असून याकरता टास्क फोर्स ची नियुक्ती करण्यात आ लेली आहे. शहरामध्ये शासनाने प्रतिबंधित केलेले थर्माकोल, सिंगल युज प्लास्टिक, प्लास्टिक कॅरीबॅगज याचा वापर व्यापारी नागरिक यांनी करू नये. जे नागरिक, व्यापारी प्रतिबंधित प्लास्टिक, थर्माकोल यांचा वापर करतील अशा नागरिकांवर, व्यापाऱ्यावर शासनाने ठरवून दिलेली कारवाई करण्यात येईल. सध्या शहरांमध्ये प्रतिबंधित प्लास्टिक जप्ती मोहीम, शहरांमध्ये घंटागाडीत कचरा न टाकता इतर कचरा टाकणे, सार्वजनिक ठिकाणी थुंकणे, सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता करणाऱ्या वर नगर परिषदेमार्फत कारवाई करण्यात येणार आहे. प्लास्टिक बंदी अंतर्गत शहरातील 89 दुकानांची तपासणी करण्यात आली त्यामधील दोन दुकानावर कारवाई करण्यात आली असून रक्कम रुपये 7400/-दंडा करण्यात आलेला आहे. सदर मोहिमे अंतर्गत आत्तापर्यंत दीडशे किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले आहे. या टीम मध्ये श्री गणेश गळीयल, निलेश कांबळे, अनिकेत चंदनशिवे, आशिष बनसोडे, प्रफुल्ल धनवडे, स्वच्छता निरीक्षक विनोद सर्वगोड हे कर्मचारी आहेत. नगरपरिषदेचे कर्तव्यदक्ष मुख्याधिकारी डॉक्टर सुधीर गवळी यांनी नागरिकांनी , व्यापाऱ्यांनी प्रतिबंधित प्लास्टिक थर्माकोल याचा वापर करू नये, तसेच शहर प्लास्टिक मुक्त ठेवावे असे आवाहन केलेले आहे.



## कारखाना कामगार व ऊसतोड मजुरांच्या आरोग्य तपासणीसाठी आरोग्य शिबिर


आधुनिक केसरी न्यूज

**मंगळवेढा :** तालुक्यातील आवताडे शुगर अँड डिस्टिलरीज प्रा. लि. नंदूर व प्राथमिक आरोग्य केंद्र, मरवडे यांच्या संयुक्त विद्यमाने कारखाना कार्यस्थळावर कामगार व ऊसतोड मजुरांचे आरोग्य तपासणी शिबीर या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सदर शिबिरामध्ये कारखाना कर्मचारी ऊसतोड कामगाराचे एकूण एकुणात्मक ३५२ जणांची तपासणी करण्यात आली. तपासणी करण्यात आलेल्या कामगार व मजुरांची मंगळवेढा मल्टीस्पेशलिस्ट हॉस्पिटल मंगळवेढा येथील डॉ विलास तोंडे पाटील व डॉ अरुण कुमार यांचे मार्फत इ.सी.जी, रक्तदाब, मधुमेह आधी आरोग्य विषयक समस्यांची तपासणी करून उपचारपर मार्गदर्शन करण्यात आले.

पंढरपूर मंगळवेढा विधानसभा कार्यक्षेत्राचे आमदार समाधान आवताडे यांच्या मार्गदर्शनाखाली व कारखान्याचे चेअरमन तथा नामवंत उद्योगपती संजय आवताडे यांच्या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरामध्ये कारखाना कामगार व ऊसतोड मजूर यांची शारीरिक आरोग्य तपासणी करून नामवंत डॉक्टरांनी आरोग्यविषयक मार्गदर्शन केले. यावेळी प्रमोदकुमार म्हमाणे यांनी सांगितले की, ऊसतोड व साखर कारखानदारीमध्ये शारीरिक परिश्रम यांच्याशी सलगी करून रात्रं-दिवस अविरतपणे कष्ट करणाऱ्या कामगारांच्या व ऊसतोड मजुरांच्या स्वास्थ्यासाठी कारखाना प्रशासन नेहमी सजग असते. केवळ व्यावसायिक व व्यावहारिक दृष्टिकोन न ठेवता कारखाना सक्षमीकरणासाठी झटणाऱ्या कामगार व मजुरांच्याप्रती संवेदनशील दृष्टिकोन ठेवून कारखाना प्रशासनाने आयोजित केलेल्या या शिबिराचे सर्वच मंडळींनी कौतुक केले.

## औरंगाबादचे नाव जिल्हा बँकेच्या माध्यमातून राज्यात पोहचविणारे सहकार महर्षी : कै. सुरेश दादा पाटील

आधुनिक केसरी



छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात कन्नड तालुक्यातील डोंगराळ भागात असलेल्या नागद येथे सहकार महर्षी कै. सुरेश दादा पाटील यांचा जन्म झाला, दादांनी कष्टाच्या जोरावर अथक परिश्रम घेऊन कष्टकऱ्यांची मानली जाणारी छत्रपती संभाजीनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळावर वर्चस्व मिळविले आणि गोर गरीब शेतकऱ्यांना जिल्हा बँकेच्या माध्यमातून विविध योजनेतून कर्ज मिळवून देऊन शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्याचे कार्य सुरू केले, जिल्ह्यातील सहकार क्षेत्रात कार्यरत असलेल्या मंडळींनी दादांचे कार्य, जिद्द चिकाटी बघून सर्व सामान्यांसाठी, कष्टकरी शेतकऱ्यांना सुजलाम-सुफ लाम करण्यासाठी दादांनी जिल्हा बँकेचे अध्यक्ष व्हाचे अशी अपेक्षा व्यक्त करून दादांना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अध्यक्ष पदी विराजमान करण्यात आले, आणि दादांनी ही त्यादिवसापसून आपली जिल्हा बँक अधिकारी कर्मचारी आपले कुटूंब समजून महाराष्ट्राच्या सहकार क्षेत्रात बँकेचे नाव कसे मोठे होईल, 100 कोटी पेक्षा जास्त तोट्यात असलेल्या बँकेला नफ्यात आणण्यासाठी कडक शिस्त, वेळेचे बंधन, बँकेच्या कारभाराला शिस्त लाऊन अथक प्रयत्नांनी बँकेला आधुनिकतेची जोड देऊन सत्ताधारी बरोबरच विरोधकांसह कर्मचारी पासून ते अधिकाऱ्यांपर्यंत सर्वांना सोबत घेऊन बँकेला कोट्यवधी रुपये नफ्यात आणून महाराष्ट्रात चांगल्या स्थानी जागा मिळवून छत्रपती संभाजीनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मराठवाड्यातील क्रमांक एकची ठरवून बँकेला सुवर्णकाळ पहावयास मिळाला, बँकेचे कार्य करत असतानाच दिनांक 25 फेब्रुवारी 2019 रोजी वयाच्या 78 व्या वर्षी सहकार महर्षी कै. सुरेश दादांनी शेवटचा श्वास घेतला आणि सहकार क्षेत्राचे एक कुशल प्रशासक हरपले सहकार क्षेत्राचे कधीही भरून न-निघणारे असे नुकसान झाले, दादांच्या प्रेरणेने व आशीर्वादाने आजही माजी आमदार तथा जिल्हा बँकेचे विद्यमान अध्यक्ष नितीन सुरेश पाटील हे उत्कृष्ट कार्य करत आहे.याच बरोबर दादांनी वाड्यावस्त्यातील, तांड्यावरील खेड्या पाड्यातील शेतकऱ्यांच्या गोर-गरीबांच्या लेकरां-बाळांना हजारो रुपये खर्च करून शहरात शिक्षणासाठी पायपीट करावी लागत आहे, असे लक्षात आल्यावर आपण समाजाचे जनतेचे काही देणे लागतो अशी भावना मनात ठेऊन राष्ट्रीय चॅरिटेबल ट्रस्टची स्थापना करून माळरानावर प्राथमिक विद्यालया पासून ते पदवीत्तर पदवी सोबत, औषधनिर्माणशास्त्र शिक्षणाची गंगा कन्नड तालुक्यातील नागद, जैतापूर सह हतनूर मध्ये पोहचवली त्यामुळे आज पालकांचे शहरात खर्च होणारे हजारो रूपये वाचून गावाजवळ शिक्षण उपलब्ध झाल्याने हजारो विद्यार्थी शिक्षण घेऊन स्वतःच्या पायावर उभे राहून आपल्या आई वडिलांचे आधार बनत असून शेकडो शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या कुटुंबांचा उदरनिर्वाह भागत आहे. सहकार महर्षी कै. सुरेश दादा पाटील यांच्या पुण्यस्मरणा निमित्त मी दादांना विनम्र अभिवादन करतो.

**भगुरे दीपक धोंडीराम, ग्रंथपाल, राष्ट्रीय कॉलेज ऑफ फार्मसी हतनूर, ता. कन्नड मो. 9422532333**

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# मुलींना मोफत शिक्षणाचा निर्णय कागदावरच

आधुनिक केसरी न्यूज

**दीपक माळी**

**जत :** 'बेटी बचाव.. बेटी पढाव'चा नारा देणाऱ्या शासनाकडून 'बेटी बचाव'च्या नावाने प्रयत्न होत असला तरीही 'बेटी पढाव'साठी विशेष प्रयत्न होताना दिसत नाही. एक महिला शिकली म्हणजे संपूर्ण कुटुंब शिकते म्हणून संपूर्ण कुटुंबाच्या शिक्षणासाठी तसेच कमी असलेले मुलींच्या शिक्षणाचे प्रमाण वाढावे यासाठी शासनाने मुलींना बारावीपर्यंत मोफत शिक्षण देण्याचा निर्णय तब्बल ३२ वर्षांपूर्वी घेतला आहे. पण, त्याची अद्यापही प्रभावीपणे अंमलबजावणी होताना दिसत नाही. आजही अनेक शाळांकडून विशेष म्हणजे अनुदानित संस्थांना शासनाकडून आर्थिक अनुदान मिळत असतानाही शाळा मुलींकडून शुल्काची वसुली करत असल्याचे पाहणीत आले आहे. मोफत शिक्षणाच्या नावाखाली विकत शिक्षण देणाऱ्या या धंदेवाईक शाळा आणि शिक्षण संस्थांच्या कारभारावर शिक्षण विभागाकडून कोणतीच कारवाई होताना दिसत नाही. आर्थिक परिस्थितीमुळे प्राथमिक शिक्षणानंतरच मुलींचे शिक्षण गळतीचे वाढते प्रमाण लक्षात घेता शासनाने शिक्षणातील मुलींचे प्रमाण वाढविण्यासाठी ६ मार्च १९८६ साली मुलींना बारावीपर्यंतचे शिक्षण मोफत केले. त्यानुसार शासकीय शाळांमध्येच नव्हे तर अनुदानित शाळांमध्येही मुलींकडून कुठलेही शुल्क घ्यावयाचे नाही, असे स्पष्ट आदेशच दिले. अनुदानित उच्च माध्यमिक महाविद्यालयांनी व कनिष्ठ महाविद्यालयांनी मुलींकडून उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा फीखेरीज इतर कुठलेही शुल्क आकारू नये, असे माध्यमिक शिक्षण विभागाकडून दरवर्षी नवे शैक्षणिक वर्ष सुरू होण्यापूर्वीच प्रवेशाच्या नियमावलीसोबतच याचीही माहिती शाळा-महाविद्यालयांना नियमित दिली जाते. पण,




असे असतानाही या संस्थांकडून मात्र सर्रासपणे शुल्काची वसुली केली जाते. 'बिल्डिंग फंड, कॅम्पस डेव्हलपमेंट फंड, गॅदरिंग फी या नावाने शुल्काची वसुली करत शाळा विद्यार्थ्यांची लूट करतात.

पालकांनी त्याबाबत आवाजही काढला तर तुम्हाला द्यावीच लागेल असे स्पष्टही करतात. प्रसंगी थेट मुलींना शाळेतूनच काढून टाकण्यासह तिला जाणीवपूर्वक लक्ष्य करून त्रास दिला जातो. त्यामुळे पालकही त्यास विरोध करण्याऐवजी तोंड दाबून बुक्क्यांचा मार सहन करत आहे. पण, ना शिक्षण विभाग त्याकडे लक्ष देतो ना शासन, वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून तर तक्रारीची अपेक्षा केली जाते. परंतु शासनानेच जर मोफत शिक्षणाचे आदेश दिले आहेत. तर प्रत्येकवेळी पालकांनी तक्रार का करावी? शासन आणि शिक्षण विभागानेच स्वतःहून त्यावर कारवाई का करू नये? नियमित शाळांची तपासणी का करू नये, असे प्रश्न पालकांकडूनच उपस्थित केले जात आहेत.

**शिक्षण उपसंचालकांकडूनही आदेश**

शाळांकडून मुलींना मोफत शिक्षणाच्या आदेशाचे सर्रास उल्लंघन केले जात आहे . यासंदर्भात तक्रार करायची कुठे ? असा प्रश्न अनेकांना पडत आहे . तर काहीजणांनी अशाप्रकारच्या तक्रारी आता थेट शिक्षण उपसंचालकांकडेच दिल्या आहेत .

**विनाअनुदानित शाळांसाठी बंधन :** विनाअनुदानित किंवा कायम विनाअनुदानित संस्थांना जरी हा नियम लागू नसला तरीही मुलींकडून आकारण्यात येणाऱ्या शुल्काबाबत शासनाने नियम ठरवून दिले आहेत . त्यानुसार या शाळांनी मुलींना सवलत देताना अनुदानित शाळांकडून संबंधित इयत्तेत आकारण्यात येणाऱ्या प्रमाणित शुल्काइतकेच शुल्क आकारावयाचे आहे . शासनाकडून प्रतिपूर्तीने मान्य करण्यात आलेले शुल्क वजा जाता उर्वरित शुल्क व उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा फी सोडून इतर कोणतेही शुल्क आकारूच नये, असे स्पष्ट आदेश दिले आहेत . परंतु, विनाअनुदानित शाळा मात्र सर्रासपणे मनमानी पद्धतीने शुल्काची आकारणी करतात .

**अनुदानित शाळांकडून नियम धाब्यावर :** अनुदानित संस्था, शाळांनी विशेषत : माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयांनी मुलींकडून शालांत प्रमाणपत्र परीक्षा फीखेरीज कुठलेही शुल्क आकारू नये, असे आदेश आहेत . तर प्राथमिक शाळांमध्ये शालांत प्रमाणपत्र परीक्षा नसल्याने त्याचेही शुल्क आकारण्याचा संबंधच येत नाही . पण, या शाळाही विनाअनुदानित संस्थांप्रमाणेच मुलींकडून पैसे वसूल करतात . शिवाय शासनाकडूनही पैसे वसूल करतात, नियम धाब्यावर ठेवत दोन्हींचीही दिशाभूल करतात .

**पालक संघही शाळेचाच :** प्रत्येक शाळेत शिक्षण समितीने ठरवून दिलेल्या शुल्कानुसार शुल्काची आकारणी करणे बंधनकारक आहे . खासगी शाळांनाही हा नियम लागू असून, विनाअनुदानित शाळांमध्ये मात्र पालक-शिक्षक संघ या शुल्काचे निश्चितीकरण करतो . परंतु शिक्षण संस्था, शाळा अत्यंत कलात्मकरित्या काही पालकांची निवड करतात . हे पालक शाळांच्याच मर्जीतील असतात . ते सर्वच पालकांचे प्रतिनिधी म्हणून असले तरीही ते शाळेच्याच हिताच्या दृष्टीने शाळा म्हणेल तितके शुल्क अंतिम करतात . पाच टक्के पालक ९५ टक्के पालकांची फसवणूक करत असल्याचे अनेक प्रकरणांतून उघडही झाले आहे .

**पगार बिलांसोबतच विद्यार्थ्यांकडून वसूल केलेली बिलेही सादर करण्याचे आदेश**

अनुदानित शाळांना वेतन तसेच वेतनेतर अनुदान शासनाकडून मिळते . पण, वेतनासाठी मात्र दर महिन्याची वेतन बिले शासनाकडे सादर करावी लागतात . त्यामुळे १९८६ च्या शासननिर्णयातच शासनाने विद्यार्थ्यांकडून घेण्यात येणारे शुल्क त्यांच्या संख्येसह बँकेत सादर करावे, असे स्पष्ट केले आहे . त्यात मुलींकडून शुल्क वसूल करता येणार नसल्याने त्यांची संख्या नमूद करत त्यांचे किती शुल्क होते ? ती रक्कम कागदावर नमूद करून तितके वजा जाता इतर शुल्काची रक्कम स्पष्ट करावी . ही गतवर्षीच्या एकूण वसूल शुल्काच्या ( १/१२ )इतकी रक्कम शाळांनी सहकारी बँकेत भरावयाची आहे . पुरावा म्हणून त्याचे प्रमाणपत्र दर महिन्याच्या पगार बिलासोबत जोडावयाचे आहे .



# स्त्री पुरुष समानता म्हणजे एकमेकांचा आदर

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** मराठी साहित्यात पुरातन काळापासून स्त्री-पुरुष समानतेचा धागा सापडतो. स्त्री आणि पुरुषाने एकमेकांना त्यांची त्याची स्पेस देणे आणि दोघांनी एकमेकांचा आदर राखणे, हीच खरी स्त्री-पुरुष समानता आहे', असा सूर दोन दिवसीय परिसंवादात उमटले सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि शंकरराव भेलके महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित स्त्री - पुरुष समानता या विषयावर दोन दिवसीय परिसंवादाच कार्यक्रमाचे २३ व २४ फेब्रुवारी रोजी आयोजन करण्यात आले होते.

श्रीमती सुवर्णाताई गोखले विभाग प्रमुख ज्ञानप्रबोधिनी - स्त्री शक्ती प्रबोधन पुणे या कार्यक्रमाचे अध्यक्षा म्हणून लाभल्या तसेच श्रीमती.साधनाताई सेठिया, श्रीमती. समृद्धी देशमुख यांनी विशेष मार्गदर्शन केले.

२१ व्या शतकात आज आपली वाटचाल सुरू झाली आहे. परंतु अजूनही स्त्री-पुरुष समानतेचे दर्शन दिसत नसल्याचे मत श्रीमती. सुवर्णाताई गोखले यांनी व्यक्त केले. त्यांनी सांगितले. जोपर्यंत समाज स्त्रियांना पारंपरिक मानसिकतेतून पाहणं सोडत नाही , तोपर्यंत स्त्री-पुरुष समानता आली, असे मानता येणार नाही. स्त्रियांचा अपमान करणारे काही विशिष्ट वाक्प्रचार, उल्लेख जोपर्यंत चलनात आहेत तोपर्यंत पूर्ण समानता आली असे म्हणता येणार नाही, असा मुद्दा त्यांनी मांडला. आज भारतात स्त्री पुरुष प्रमाण हे ९३५/१००० असं आहे. मुलींच्या प्रमाणात पुरूषांच्या तुलनेत घट दिसून येते आहे. तसेच ज्या राज्यात विकासाचे प्रमाण जास्त आहे त्याच राज्यात स्त्रीयांचे प्रमाण कमी होते आहे. हीच अजूनही आपल्या देशातील एक शोकांतिका आहे अस मतं त्यांनी व्यक्त केले. तसेच महिलांवरील अत्याचारांच्या घटनांमध्ये वाढ होत आहे. महाविद्यालयीन स्तरावर मुलींच्या तक्रार निवारणासाठी विशाखा समिती स्थापन केली आहे. मुलींनी न घाबरता त्यांना भेडसावणाऱ्या तक्रारी त्या समितीला कळविल्या पाहिजे असे सुचवले.

श्रीमती. साधनाताई सेठिया यांनी, 'स्त्री आणि पुरुषांमध्ये समानता आहे, मात्र आपण ती स्वीकारायला तयार नाही', असा मुद्दा मांडला. तसेच वेगवेगळ्या कृतीतून विद्यार्थ्यांसोबत परिसंवाद साधला. कार्यक्रमाचे आयोजन प्रा डॉ हिमालया सकट व प्रा. जाधवर दयानंद यांनी केले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ. हिमालया सकट यांनी केले. या कार्यक्रमासाठी प्रा. महेश कोळपे, प्रा. माउली कोंडे, प्रा. ऋतुजा साळुंखे, प्रा. सीमा कांबळे उपस्थित होते. आभार प्रा. संदीप लांडगे यांनी मानले..



# संगमेश्वर महादेव मंदिरावर नवीन ट्रस्ट स्थापन्याचा डाव

आधुनिक केसरी न्यूज

**जामनेर :** तालुक्यातील पहूर येथील दि २४/२/२३ रोजी देवळी आणि गोगडी या पवित्र नद्यांच्या संगमावर वसलेल्या श्री क्षेत्र संगमेश्वर महादेव मंदिर येथे १७ वर्षांपासून ट्रस्ट अस्तित्वात असताना अनधिकृत स्वयंघोषित आरती समितीच्या माध्यमातून काही लोकांनी नवीन ट्रस्ट स्थापन करण्याचा डाव रचल्याचे उघड झाल्याने पहूर येथे प्रचंड खळबळ उडाली असून भाविक संतप्त झाले आहेत. श्रीक्षेत्र संगमेश्वर महादेव मंदिर हे पहुर येथून शेंदुर्णी मार्गावर दोन किलोमीटर अंतरावर वसलेले भाविकांचे श्रद्धास्थान आहे . गेल्या ४० वर्षांपासून येथे शिवभक्त रंगनाथ महाराज पुजारी म्हणून सेवा करत आहेत . त्यांच्या अथक परिश्रमाद्वारे या मंदिराचा विकास आणि जिर्णोद्धाराचे कार्य लोक सहभागातून होत आहे .या मंदिरावर २००६ मध्ये ट्रस्ट स्थापन करण्यात आली असून ई १०८६ असा नोंदणी क्रमांक प्राप्त झाला आहे . शिवभक्त रंगनाथ महाराज हे अध्यक्ष म्हणून यशस्वीरित्या धुरा सांभाळत आहेत . तथापी गावातील काही लोकांनी ट्रस्टची कुठलीही परवानगी न घेता अनधिकृत रित्या स्वयंघोषित आरती समिती स्थापन करून मंदिराच्या नावात फेरबदल करून एकाच मंदिरावर नवीन ट्रस्ट स्थापन करण्यासाठी धर्मदाय आयुक्त कार्यालय जळगाव येथे प्रस्ताव दाखल केल्याचे उघड झाले आहे . त्यामुळे आरती समितीचे पितळ उघडे पडले असून नेमका मंदिरावर व मंदिर परिसरात असलेल्या खुल्या भूखंडावर कब्जा मिळवणे हा तर समितीचा विचार नाही ना ? असा सवाल संतप्त भाविक करीत आहेत. याप्रकरणी ट्रस्टतर्फे धर्मदाय आयुक्त जळगाव यांना लेखी निवेदन सादर करण्यात आले असून या निवेदनाच्या प्रती जिल्हाधिकारी , जिल्हा पोलीस अधीक्षक , जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सादर करण्यात आल्या आहेत. या प्रकरणामुळे पहूर परिसरात धार्मिक वर्तुळात संताप व्यक्त होत आहे.

# 'आयसीएआय' पुणेच्या अध्यक्षपदी सीए राजेश अग्रवाल

## उपाध्यक्षपदी सीए अमृता कुलकर्णी, सचिवपदी सीए अजिंक्य रणदिवे, खजिनदारपदी सीए ऋषिकेश बडवे, 'विकासा'च्या अध्यक्षपदी सीए सचिन मिणियार यांची निवड

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** दि इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया ( आयसीएआय ) पुणे शाखेच्या अध्यक्षपदी सीए राजेश अग्रवाल यांची निवड झाली. उपाध्यक्षपदी सीए अमृता कुलकर्णी, सचिवपदी अजिंक्य रणदिवे, खजिनदारपदी सीए ऋषिकेश बडवे यांची, तर 'विकासा' या विद्यार्थी शाखेच्या अध्यक्षपदी सीए सचिन मिणियार यांची निवड झाली आहे. २०२३-२०२४ या वर्षासाठी नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. नवनिर्वाचित अध्यक्ष सीए राजेश अग्रवाल यांनी मावळते अध्यक्ष सीए काशिनाथ पठारे यांच्याकडून पदभार स्वीकारला. कार्यकारिणी सदस्य सीए प्रणव आपटे, सीए प्रितेश मुनोत, सीए मोशमी शहा काम पाहतील. यावेळी केंद्रीय समितीचे सदस्य सीए चंद्रशेखर चितळे, ज्येष्ठ सनदी लेखापाल सीए ( डॉ. ) एस. बी. झावरे, विभागीय समिती सदस्य आणि वेस्टर्न इंडिया रिजनल कौन्सिलचे उपाध्यक्ष सीए यशवंत कासार, विभागीय समिती सदस्या सीए ऋता चितळे, माजी अध्यक्ष सीए अभिषेक धामणे आदी उपस्थित होते. शाखेच्या वतीने तसेच वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी नवनिर्वाचित कार्यकारिणीचे अभिनंदन केले. सीए काशिनाथ पठारे यांनी गेल्या वर्षभरात केलेल्या कामांविषयी तसेच राबविलेल्या योजनांविषयी माहिती दिली. या वर्षात आयसीएआय पुणे शाखेला विभागीय स्तरावर दुसऱ्या क्रमांकाचे, तर 'विकासा' विद्यार्थी शाखेला केंद्रीय आणि विभागीय स्तरावर प्रथम पारितोषिक मिळाल्याची माहिती त्यांनी दिली. तसेच सर्व सहकारी व कर्मचारी यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली. सीए राजेश अग्रवाल म्हणाले, "गेल्या अनेक वर्षांपासून देशातील सर्वात मोठ्या शाखांपैकी एक असलेल्या पुणे शाखेला यशाची मोठी परंपरा आहे. अनेक पारितोषिके या शाखेने पटकावले आहेत. पुणे शाखेच्या ६१ व्या वर्षात अध्यक्ष म्हणून काम करण्याची



संधी मिळतेय, याचा आनंद आहे. भारतातील सर्वात मोठ्या शाखेपैकी एक असलेल्या शाखेच्या अध्यक्षपदाची जबाबदारी माझ्यावर विश्वासाने दिल्याबद्दल सर्व सनदी लेखापाल सदस्यांचा आभारी आहे. येत्या काळात सीए सभासद व विद्यार्थ्यांसाठी अनेक चांगले उपक्रम राबविणार आहोत. आयसीएआय पुणे शाखेची सुरुवात १९६२ मध्ये झाली. आज पुणे शाखेचे १०,००० पेक्षा अधिक सभासद आहेत. तर २५००० पेक्षा जास्त विद्यार्थी पुणे शाखेशी संलग्नित आहेत. बिबवेवाडी येथील आयसीएआय भवन येथे अत्याधुनिक सोयीसुविधांनी युक्त असलेल्या संस्थेत सनदी लेखापालांसाठी अनेक उपक्रमांचे आयोजन वर्षभर केले जाते. त्यामध्ये कार्यशाळा, चर्चासत्रे आदी गोष्टींचा समावेश आहे, सीए चंद्रशेखर चितळे यांनी नमूद केले.

# पर्यटकांना वाट दाखवणारे फलकच नसल्याने पैठण नगरीत पर्यटकांना "वाट" दिसेना!

आधुनिक केसरी न्यूज

**दादासाहेब घोडके**

**पैठण :** गेल्या कित्येक वर्षांपासून पैठण शहरात आलेल्या भाविक तथा पर्यटकाना येथील ईतिहास खुना दिशादर्शक फलक नसल्याने वाट दिसेना असे म्हटलं तर वावगे वाटु नये. सध्याच्या काळात अशिया खंडातील सर्वात मोठे मातीचे धरण, मुळ पैठणी साडीचा ईतिहास ,तिर्थ खाब,तसेच जवळपास तिनशे एकरवर संत ज्ञानेश्वर जगप्रसिद्ध उद्यान आहे,तसेच ईतरही ठिकाण पाहण्यासाठी पर्यटकाची रोज गर्दी असतेच परंतु यापैकी कुठलेही स्थळ नेमके कुठ आहे या बाबतचा दिशादर्शक फलकच गेल्या कित्येक वर्षांपासून पर्यटकाना "वाट" दाखवत नसल्याने येणारा भाविक व पर्यटक नागरिकांना वाट व स्थळ विचारुनच पैठण नगरीत आपले मार्गक्रमण करतात हि अत्यंत खेदाची बाब आहे. पैठण शहरात प्राधिकरणातुन तसेच नगरपालिका प्रशासनाच्या माध्यमातून कोट्यावधीचे कामे झाली. परंतु पैठण शहरात येण्याची प्रमुख तिन मार्गावर तसेच कोठून कुठे जावे हे ठिकाण ईकडे असा कुठलाही मार्गदर्शक फलक नसल्याने पैठण नगरीत पर्यटकांना "वाट" दिसेना असाच पैठण नगरीत आल्यावर वाटते.